म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
RLFBK-0019717

वाङ्मयांत आईच्या प्रेमाची अशी ओळख...

येईल गुरुजी म्हणत, 'माझ्यांत जें काहीं चांगलें आहे, तें माझ्या आईचें ... जगाकडे प्रेमळपणें बघावयास माझ्या आईनें मला शिकविलें. माणसांवरच नव्हे तर गाईगुरांवर, फुलपांखरावर, झाडांमाडावर प्रेम करावयास तिनें मला शिकविलें. तिनें माझ्या जीवनात अत्तर ओतलें आणि माझ्या जीवनाला सुवास दिला.' 'श्यामच्या आई' मध्यें गुरुजींनीं आपल्या आईची गोष्ट सांगितली आहे. 'श्याम' म्हणजे गुरुजी. कोंकणातल्या एका खेडेगावामधील गरीब वाळबोध आणि प्रेमळ कुटुंबातील एक आई आपल्या लहान मुलाला माणुसकीची नि चांगुलपणाची शिकवणूक देऊन मातृभूमीच्या सेवेसाठीं कशी सिद्ध करते ह्याची ही एक ... नि हृदयगम गोष्ट आहे. आपल्या जुन्या महाराष्ट्रीय जीवनात जे... जेवढें म्हणून काहीं चांगले नि सुंदर आढळून येत होतें त्याचें ... उ...ज्वल चित्र गुरुजींनीं ह्या गोष्टीमध्यें रंगविलें आहे. भावनेचा जिव्हाळा नि भाषेचा साधेपणा ह्या दोन गुणामुळें एखाद्या अभिजात लोककथेची अवीट गो...डी ह्या गोष्टींत उत्पन्न झाल्याचा प्रत्यय येतो. कितीहि वेळां जरी ती काढलेली ...

...हेत; तीं अशीं

...या आहेत,

...ड किंवा पश्चिमेक...

...नाळ लावून, ती दिशा न बदलतां पुनः त्या... ... ते परत आले ... गोलाकृतीचे जे अनेक प्रकार आहेत, त्यांतील जर पृथ्वीचा एक ... दा नसता, तर असें येतां आलें नसतें.

आपण जर एकाद्या उंच ठिकाणावर चढू लागलों, तर ज... सजसें वर जावें, तसतसा आपल्यास आसमंतातील पृथ्वीचा पृष्ठभाग जास्त जास्त दिसू लागतो; आणि तारू किनाऱ्यावर येऊ लागलें ह्मणजे, प्रथम शिडें दिसतात, नंतर खालचा भाग दिसतो. पृथ्वी जर गोलाकार नसती तर असें झालें नसतें; कारण पृथ्वीचा फुग... लेला भाग, आपली दृष्टि आणि गलबताचा अथवा दुसऱ्या पदार्थां... चा खालचा भाग ... मध्यें आड ये...

... त्याला ...

परंतु ... अक्षांश ... ... कोणतेंही ... उघड आहे

वाङ्मयांत आईच्या प्रेमाची अशी ओजस्वी गोष्ट

येईल गुरुजी म्हणत, 'माझ्यात जें काहीं चांगलें आहे, तें माझ्या आईचें आहे. जगाकडे प्रेमळपणें बघावयास माझ्या आईनें मला शिकविलें. माणसांवरच नव्हे तर गाईगुरांवर, फुलपाखरावर. झाडामाडावर प्रेम करावयास तिनें मला शिकविलें. तिनें माझ्या जीवनात अत्तर ओतलें आणि माझ्या जीवनाला सुवास दिला.' 'श्यामच्या आई'मध्यें गुरुजींनीं आपल्या आईची गोष्ट सांगितली आहे. 'श्याम' म्हणजे गुरुजी. कोंकणातल्या एका खेडेगावामधील गरीब बाळबोध आणि प्रेमळ कुटुंबातील एक आई आपल्या लहान मुलाला माणुसकीची नि चांगुलपणाची शिकवणूक देऊन मातृभूमीच्या सेवेसाठीं कशी सिद्ध करते ह्याची ही एक उदात्त नि हृदयंगम गोष्ट आहे. आपल्या जुन्या महाराष्ट्रीय जीवनात जेवढें जेवढें म्हणून काहीं चांगले नि सुंदर आढळून येत होतें त्याचें अत्यंत उज्ज्वल चित्र गुरुजींनीं ह्या गोष्टीमध्यें रंगविलें आहे. भावनेचा जिव्हाळा नि भाषेचा साधेपणा ह्या दोन गुणांमुळें एखाद्या अभिजात लोककथेची अवीट गोडी ह्या गोष्टींत उत्पन्न झाल्याचा प्रत्यय येतो. कितीहि वेळा जरी ती

ग्रंथ क्र. ... न. १६२७

# भूगोलविद्या.

१८९९

भूगोलविद्या ह्मणजे पृथ्वी, तिजवरील देश, व त्या देशांतील लोक यांचें वर्णन.

पृथ्वी वाटोळी असून दोन्ही ध्रुवांकडे थोडी चपटी आहे; परंतु ...काशावर तिची आकृति बहुधा पूर्णगोलाप्रमाणेंच काढलेली असते. तिच्या वाटोळेपणाविषयीं तीन स्वल्प प्रमाणें आहेत; तीं अशीं.-

नावाडी लोकांनीं वारंवार पृथ्वीप्रदक्षणा केल्या आहेत, त्या ... का, कोणत्याही एकाद्या ठिकाणाहून पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे नाळ लावून, ती दिशा न बदलतां पुनः त्याच ठिकाणीं ते परत आले. गोलाकृतीचे जे अनेक प्रकार आहेत, त्यांतील जर पृथ्वीचा एकादा नसता, तर असें येतां आलें नसतें.

आपण जर एकाद्या उंच ठिकाणावर चढू लागलों, तर जसजसें वर जावें, तसतसा आपल्यास आसमंतांतील पृथ्वीचा पृष्ठभाग जास्त जास्त दिसू लागतो; आणि तारूं किनाऱ्यावर येऊं लागलें ह्मणजे, प्रथम शिडें दिसतात, नंतर खालचा भाग दिसतो. पृथ्वी जर गोलाकार नसती तर असें झालें नसतें; कारण पृथ्वीचा फुगलेला भाग, आपली दृष्टि आणि गलबताचा अथवा दुसऱ्या पदार्थाचा खालचा भाग, ...मध्यें आड येतो ... त्याला ...

परंतु ... अक्षांश ... चंद्रग्रहणांत ... कोणतेंही स्थ... उघड आहे.

जेव्हां चंद्रग्रहण होतें तेव्हां पृथ्वी, चंद्र आणि सूर्य यांजमध्यें येत्ये, आणि तिची छाया चंद्रावर पडून तो काळा दिसू लागतो, व तो काळा झालेला भाग नेहेमी वाटोळा असतो.

पृथ्वीला दोन गति आहेत, एक ती आपल्या आसाभोंवती दिवसांतून एकदा फिरत्ये, आणि एक वर्षानें एकवेळ सूर्याभोंवती फिरत्ये. पहिल्या गतीस दैनंदिन, आणि दुसरीस वार्षिक गति असें ह्मणतात. सूर्य प्रातःकाळीं उगवून सायंकाळीं मावळतो, असें साधारण बोलण्यामध्यें लोक ह्मणतात, व तो पृथ्वी भोंवता फिरतो असें दिसतें; परंतु हा भास पृथ्वी फिरल्यानें होतो. ती पश्चिमेक-डून पूर्वेकडे जात्ये, तेणेंकरून सूर्योदय आणि सूर्यास्त ह्मणजे रात्र-दिवस होतात. पृथ्वीच्या वार्षिक गतीमुळें निरनिराळे ऋतु होतात, ह्मणजे, मुख्यत्वें करून थंडी आणि उष्णता यांच्यामध्यें फारफेर पडतो.

पृथ्वीचा विस्तार बहुधा लाहान गोळाच्या पृष्ठ भागावर अथ-वा नकाशावर काढून, त्यावर सर्व देशाचीं ठिकाणें दाखविलीं अस-तात; व तिजवर कांहीं प्रकारच्या रेषा आहेत असें कल्पितात. या-च्या योगानें कोणतें ही ठिकाण सहज समजतें.

नकाशाच्या अथवा गोळाच्या वरच्याकडे उत्तर, खालच्या-कडे दक्षिण, उजव्याकडे पूर्व, व डाव्याकडे पश्चिम असें जाणावें

पृथ्वीच्या मध्यबिंदूंतून एक रेषा जात्ये अशी कल्पना कर-तात. या रेषेला आंस आणि तिच्या दोन टोंकास उत्तरध्रुव व दक्षिणध्रुव असें ह्मणतात. या दोन ध्रुवांपासून सारखे अंतरावर, पृथ्वीच्या पृष्ठ भागावरून पूर्वपश्चिम जी एक कल्पित रेषा काढले-ली असत्ये, [illegible] पृथ्वीचे [illegible] सारखे [illegible] होतात तिला विषु-ववृत्त अ[illegible] ह्मणतात. [illegible] इच्यार्शी समां

तर अशा पुष्कळ रेषा काढलेल्या असतात, त्यांना **अक्षवृत्तें** ह्मणतात; आणि **मध्यरेषेच्या** उत्तरेस किंवा दक्षिणेस जीं स्थळें आहेत त्यांस, उत्तर किंवा दक्षिण अक्षांशांतील स्थळें असें ह्मणतात. **मध्यरेषे-पासून** अंतर अंशानीं मोजतात. एका अंशांत सुमारें ६९ मैल असतात. एका अंशाच्या साठ कळा, व एक कळेच्या साठ विकळा.

**उत्तरध्रुववृत्त, दक्षिणध्रुववृत्त, कर्कवृत्त,** आणि **मकर-वृत्त** हीं चार अक्षवृत्तांपैकीं मुख्य आहेत. ध्रुववृत्तें, ध्रुव स्थानापासून २३ अंश आणि २८ कळा इतक्या अंतरावर आहेत; व **कर्क** आणि **मकर** हीं मध्यरेषेपासून तितक्याच अंतरावर आहेत. उत्तरे-कडच्यास **कर्क** आणि दक्षिणेकडच्यास **मकर** असें ह्मणतात. यारे-षांनीं पृथ्वीचे पांच मोठे भाग होतात, त्यास **कटिबंध** असें ह्मणतात. त्यांचीं नांवें त्यातील हवेच्या स्वरूपावरून दिलीं आहेत. कर्क आणि मकर वृत्त यामधील प्रदेशास **उष्णकटिबंध** असें ह्मणतात, व त्यापासून दोही बाजूस त्रेचाळीस अंश जो प्रदेश आहे, त्यास **समशीतोष्णकटिबंध** असें ह्मणतात; उत्तरेकडेस जो आहे त्यास उत्तर, आणि दक्षिणेकडे जो आहे त्यास **दक्षिण, समशीतोष्णक-टिबंध** ह्मणतात. उत्तरध्रुवस्थानाच्या आसमंतात जो साडेतेवीस अंश प्रदेश आहे, त्याला **उत्तरशीतकटिबंध** असें ह्मणतात; आणि त्याचप्रमाणें दुसऱ्या ध्रुवस्थानाच्या आसमंतात जो प्रदेश आहे, त्यास **दक्षिणशीतकटिबंध** असें ह्मणतात.

ध्रुवस्थानाशीं एकच होणाऱ्या, व अक्षवृत्तांवर लंबरूप अशा ज्या रेषा काढलेल्या असतात, त्यांना **याम्योत्तरें** अथवा **मध्यान्ह-रेषा** असें ह्मणतात. त्यांचे भाग अक्षरेषा प्रमाणेंच केले आहेत. कोणत्याही ठरविलेल्या मध्यान्ह रेषेपासून जें अंतर त्याला **रेखांश** असें ह्मणतात. रे व अक्षांश समज[illegible]ल्या, कोणतेहि स्थळ सहज

आहेत हीं. इंग्रज व कांहीं इतर लोक, रेखांश लंडन शहराज-वळ ग्रीनिच एथें जी वेधशाळा आहे, तिजवरून जाणाऱ्या याम्यो-त्तरापासून पूर्वपश्चिम मोजतात. हिंदु ज्योतिषी लंकेवरून जाणा-ऱ्या रेषेपासून मोजीत असतात.

पृथ्वीच्या पृष्ठभागाचे, पाणी आणि जमीन असे दोन मुख्य भाग आहेत. पाण्याच्या सपाटीवर जी जमीन दिसत्ये तिचे पा-ण्यानें तरतऱ्हेचे आकार झाले आहेत. त्यांस त्यांच्या स्वरूपाप्रमाणें निरनिराळीं नावें दिलीं आहेत.

## जमीनीचे भाग.

पाण्यानें झालेले जे जमीनीचे भाग त्यास खंड, बेट, द्वीप-कल्प, संयोगिभूमि, भूशलाका, आणि भूशिर असें ह्मणतात.

खंड ह्मणजे ज्या एका जमीनीच्या मोठ्या प्रदेशात अनेक देश असून ते पाण्यानें निराळे झाले नसतात, तो प्रदेश. उदाहरण एशियाखंड

बेट ह्मणजे जो भूमीचा भाग सर्व बाजूंनीं पाण्यानें वेष्टिले-ला असतो तो. सिंहलद्वीप हें एक बेट आहे.

द्वीपकल्प ह्मणजे जो जमीनीचा भाग पाण्यानें बहुतेक वेष्टि-लेला असतो तो. हिंदुस्थान हें एक द्वीपकल्प आहे. कारण उत्तर खेरीज करून त्याच्या सर्व बाजूंनीं पाणी आहे.

संयोगिभूमि ह्मणजे जो जमीनीचा अरुंद भाग दुसऱ्या दोन मोठ्या प्रदेशांस जोडतो. उदाहरण, सुएझची संयोगिभू-मि ही एशिया आणि आ... या दोन खंडे... प्रदेशांस जोडत्ये

भूशलाका ह्मणजे ...चा अरुं... द भाग पाण्यामध्यें

लाब जाता तो; उदाहरण मलाक्का. भूशलाकेच्या टोकास भूशिर असें ह्मणतात.

## पाण्याचे भाग.

पाण्याचें भाग जमीनीच्या भागाचे अगदीं उलट आहेत. ते, महासागर, अथवा सागर, समुद्र, सरोवर, उपसागर, सामुद्रधुनी, आखात आणि खाडी असे आहेत.

जमीनीनें न विभागलेला असा जो पाण्याचा मोठा विस्तार त्यास **महासागर** असें ह्मणतात; उदाहरण, **हिंदीमहासागर**.
समुद्र सागरा प्रमाणेंच असतो, परंतु त्यापेक्षा फार लहान असतो.

**सरोवर** ह्मणजे चोंहोंकडून जमीनीनें वेष्टिलेला पाण्याचा भाग; उदाहरण, एशियामधील **क्यासपियनसरोवर**, हिमालय पर्वतावरील **मानससरोवर**.

आखात ह्मणजे बहुत करून जमीनीनें वेष्टिलेला पाण्याचा भाग; जसें, **इराणी** आखात, **सिंहलद्वीपाच्या** वायव्ये कडील **मानारचें** आखात. आखाताचें तोंड रुंदअसलें ह्मणजे त्यास **उपसागर** ह्मणावें; उदाहरण, **बंगालचा** उपसागर.

जो पाण्याचा अरुंद भाग दुसऱ्या दोन भागास जोडतो, त्यास **सामुद्रधुनी** असें ह्मणतात; उदाहरण, **हिंदुस्थान** व **सिंहल-द्वीप** यांमधील पालक सामुद्रधुनी, ही **बंगालचा** उपसागर व **मानारचें** आखात यास जोडते.

फार लहान व अरुंद आखात असेल त्यास **खाडी** ह्मणतात.

डोंगर किंवा उंच जमीन किंवा सरोवर, यांतून निघालेला जो गोडपाण्याचाप्रवाह त्याला नदी असें ह्मणतात.

माहित होतें. इंग्रेज व काहीं इतर लोक, रेखांश लंदन शहराजवळ ग्रीनिच एथें जी वेधशाळा आहे, तिजवरून जाणाऱ्या याम्योत्तरापासून पूर्वपश्चिम मोजतात. हिंदु ज्योतिषी लंकेवरून जाणाऱ्या रेषेपासून मोजीत असतात.

पृथ्वीच्या पृष्ठभागाचे, पाणी आणि जमीन असे दोन मुख्य भाग आहेत. पाण्याच्या सपाटीवर जी जमीन दिसत्ये तिचे पाण्यानें तरतऱ्हेचे आकार झाले आहेत. त्यांस त्यांच्या स्वरूपाप्रमाणें निरनिराळीं नांवें दिलीं आहेत.

## जमीनीचे भाग.

पाण्यानें झालेले जे जमीनीचे भाग त्यांस खंड, बेट, द्वीपकल्प, संयोगिभूमि, भूशलाका, आणि भूशिर असें ह्मणतात.

**खंड** ह्मणजे ज्या एका जमीनीच्या मोठ्या प्रदेशात अनेक देश असून ते पाण्यानें निराळे झाले नसतात, तो प्रदेश. उदाहरण एशियाखंड

**बेट** ह्मणजे जो भूमीचा भाग सर्व बाजूंनीं पाण्यानें वेष्टिलेला असतो तो. सिंहलद्वीप हें एक बेट आहे.

**द्वीपकल्प** ह्मणजे जो जमीनीचा भाग पाण्यानें बहुतेक वेष्टिलेला असतो तो. हिंदुस्थान हें एक द्वीपकल्प आहे. कारण उत्तर खेरीज करून त्याच्या सर्व बाजूंनीं पाणी आहे.

**संयोगिभूमि** ह्मणजे जो जमीनीचा अरुंद भाग दुसऱ्या दोन मोठ्या प्रदेशांस ज्या दोन खंडांस [illegible], सुएझची संयोगिभूमि ही एशिया आणि आफ्रिका अरुं[illegible]ंस जोडत्ये.

**भूशलाका** ह्मणजे [illegible] भाग पाण्यामध्ये

लाब आता तो; उदाहरण मलाका. भूशलाकेच्या टोकास भूशिर असें ह्मणतात.

## पाण्याचे भाग.

पाण्याचे भाग जमीनीच्या भागांचे अगदीं उलट आहेत. ते, महासागर, अथवा सागर, समुद्र, सरोवर, उपसागर, सामुद्रधुनी, आखात आणि खाडी असे आहेत.

जमीनीनें न विभागलेला असा जो पाण्याचा मोठा विस्तार त्यास **महासागर** असें ह्मणतात; उदाहरण, **हिंदीमहासागर**. समुद्र सागरा प्रमाणेंच असतो, परंतु त्यापेक्षा फार लहान असतो.

**सरोवर** ह्मणजे चोहोंकडून जमीनीनें वेष्टिलेला पाण्याचा भाग; उदाहरण, एशियामधील **क्यासपियनसरोवर**, हिमालय पर्वतावरील **मानससरोवर**

**आखात** ह्मणजे बहुत करून जमीनीनें वेष्टिलेला पाण्याचा भाग; जसें, **इराणी** आखात, **सिंहलद्वीपाच्या** वायव्ये कडील **मानारचें** आखात. आखाताचें तोंड रुंद असलें ह्मणजे त्यास **उपसागर** ह्मणावें; उदाहरण, **बंगालचा** उपसागर.

जो पाण्याचा अरुंद भाग दुसऱ्या दोन भागास जोडतो, त्यास **सामुद्रधुनी** असें ह्मणतात; उदाहरण, **हिंदुस्थान** व **सिंहलद्वीप** यांमधील पालक सामुद्रधुनी, ही **बंगालचा** उपसागर व **मानारचें** आखात यास जोडते.

फार लहान व अरुंद आखात असेल त्यास **खाडी** ह्मणतात.

डोंगर किंवा उंच जमीन किंवा सरोवर, यांतून निघालेला जो गोडेपाण्याचा प्रवाह त्याला नदी असें ह्मणतात.

## खंड.

एशिया, यूरोप, आफ्रिका आणि अमेरिका अशीं पृथ्वीचीं चार खडें आहेत. पासिफिक महासागराच्या दक्षिण भागांतील जीं अनेक बेटें त्या सर्वांस ओशियानिया असें ह्मणतात, आणि तें पांचवें खड असें कधींकधीं मानतात.

## महासागर.

सर्व पृथ्वीवरील पाण्याचे पांच भाग केले आहेत. उत्तर-महासागर उत्तरध्रुवाजवळ आहे; दक्षिणमहासागर दक्षिणध्रुवाजवळ आहे; आतलांतिकमहासागर यूरोप व आफ्रिका यांच्या पश्चिमेस, आणि अमेरिकेच्या पूर्वेस आहे; हिंदीमहासागर एशियाच्या दक्षिणेस व आफ्रिकेच्या पूर्वेस आहे; आणि पासिफिक महासागर अमेरिकेच्या पश्चिमेस व एशिया आणि आस्त्रेलिया यांच्या पूर्वेस आहे.

## एशिया.

हें खड प्राचीन काळापासून प्रख्यात आहे. मनुष्याची वस्ती प्रथम यांत झाली, असा इतिहासज्ञांनीं सिद्धांत केला आहे. पूर्वीं येथील कांहीं लोक इतर खंडांतील लोकांपेक्षां विशेष सुधारलेले होते, व एथील कांहीं राज्यें इतकीं मोठीं व बलाढ्य होऊन गेलीं कीं, तेणें करून यास्खडास विशेष महत्व आलें होतें. याच्या उत्तरेस उत्तरमहासागर; पूर्वेस पासिफिकमहासागर; दक्षिणेस हिंदीमहासागर; आणि पश्चिमेस ता[illegible]समुद्र, सुएझची संयोगिभूमि, भूमध्यसमुद्र, मार्मोराच्यासमुद्र, तुर्कीसमुद्र, काकेशसपर्वत, क्यासपियनसमुद्र, युरल[illegible] व युरलपर्वत हीं आहेत.

एशिया हें पृथ्वीमध्यें सर्वांत मोठें खंड आहे; आणि एथील

पर्वत, नद्या, व सपाट प्रदेश फार मोठ मोठाले आहेत. याच्यामधून पर्वताची एक लांब रांग आहे, तिजमधील कित्येक शिखरें सर्व पृथ्वींत उंच आहेत. हिनें व इच्याशीं समांतर जी उत्तरेस रांग आहे तिनें एशियाचे, उत्तर, मध्य, आणि दक्षिण असे तीन भाग झाले. [illegible] वर्णनांत त्यांजकडे लक्ष दिलें नाहीं.

या खंडांत खालीं लिहिलेले देश आहेत, त्यांचें पुढें अनुक्रमानें वर्णन केलें आहे. एशियांतील तुर्की, तारतरी, एशियांतील रुशिया, चिनीतारतरी, चीन, तिबेट, जपान, पूर्वेकडाच्यास-मूह, मलाया, सयाम, कोचिनचीन, ब्रह्मराज्य, हिंदुस्थान, अफगाणिस्थान, बलुचिस्थान, इराण आणि आरबस्थान.

## एशियांतील तुर्की अथवा तुर्कस्थान.

तुर्की लोकांचा मुख्य पादशाहा ज्यास सुलतान असें म्हणतात त्याचा अमल याखंडांत, एशियामैनर, बहुतेक आरमीनिया, कुर्दिस्थान, इरकआरबिया, आणि [illegible] प्रांतांवर आहे.

हा देश बहुधा डोंगरी आहे. एशियामैनर प्रांत समुद्राच्या सपाटीपेक्षा उंच आहे. ही उंची पूर्वे कडच्या बाजूस अधिक होत गेली आहे. यामध्यें तारस हा मुख्य पर्वत आहे. या पर्वताच्या आणि तुर्कीसमुद्राच्या मध्यें एक जमीनीची अरुंद पट्टी आहे, तींत रान पुष्कळ आहे. या देशांतील हवा फार उष्ण व फार शीत नसून आनंदकारक आहे. फळ फळावळ सर्व ठिकाणीं चांगली, पुष्कळ, व मेहेनत नकरतां होते. एथील लोकांचें लक्ष कृषिकर्माकडे नाहीं. परंतु गुरें पाळण्याकडे आहे. एथील मेंढ्याची व बकऱ्यांची लोंकर लांब व रेशमासारखी असते, तिचीं चांगलीं जाड वस्त्रें करतात.

आनातोलिया, कारमानिया, आणि सिवास असे तीन भाग आहेत, त्यांत आनातोलिया हा पश्चिमेकडील. यात मुख्य शहर स्मर्ना हें आहे. एथें व्यापार पुष्कळ चालतो, आणि एथून सुकवलेलीं फळें वगैरे इतर देशांत पुष्कळ जातात. ब्रूसा, कोनिये, व सिवास हीं अंतरभागीं मोठीं शहरें आहेत. सिनोप हें तुर्की लोकांचें तुर्की समुद्रावरील बंदर आहे.

आरमीनिया प्रांत तुर्की समुद्राच्या आग्नेयीस आहे, त्यातील कांहीं भाग इराणाचा, कांहीं रुशियाचा, व बहुतेक तुर्कीचा आहे. परंतु याच्या सीमा पक्क्या ठरलेल्या नाहींत. जो भाग तुर्की पैकी आहे तो फार डोंगरी आहे, आणि सर्व प्रदेश समुद्राच्या सपाटी पेक्षा उंच आहे. हवा इतकी कठीण आहे कीं, बहुतकरून बारा महिने बर्फ जमीनीवर असतें, आणि सर्व शेतीभाती उन्हाळ्या चार महिन्यांत करतात.

यांत आरारात पर्वताचें शिखर फार सुंदर आहे. यावर सदोदित बर्फ असतें. ख्रिस्ती शास्त्रा प्रमाणे ज्यावेळेस जलप्रलय झाला, त्यावेळीं नोवा व त्याचें सर्व कुटुंब ज्या तारवांत बचावलें गेलें, तें तारू पाणी मागें हटल्यावर या किंवा याच्याजवळच्या एका शिखरावर राहिलें होतें. याप्रांतात, समुद्राच्या सपाटीपासून साडेपाच हजार फूट उंचीवर वान ह्मणून एक खारेपाण्याचें सरोवर आहे.

यामध्ये अर्झीरूम हें त्याचनावाच्या परगण्यात मुख्य शहर आहे. कार्स एथें सन १८५५ इसवींत तुर्कीलोक, इंग्रेज व हंगरी ह्यालोकांच्या मदतीनें रुशियाच्या फौजे बरोबर मोठ्या पराक्रमानें लढले. त्रेबिझांद हें बंदर आलीकडे मोठें वाढत चाललें आहे. आरमीनिया प्रांतातील बहुतेक लोक ख्रिस्ती आहेत. कुर्दिस्थान

यामध्यें वान, मोसल, दायरबकर हे परगणे आहेत. प्राचीनकाळीं **असिरीयन** ह्मणून एक एथें मोठें बलाढ्य राज्य होऊन गेलें, त्याची **निनिवे** नावाची मोठी राजधानी होती, ती सांप्रतच्या **मो-सल** शहराजवळ होती. ती फारच विस्तीर्ण असून जमीनीखालीं गडून गेली होती. ती १८४६ सालीं **लेयर्द** नावाच्या एका **इंग्रजी** प्रवाशानें शोधून काढली. तेथील राजमंदिरें, देवळें, व मूर्ति ह्या, डा-**क्तर** लेयर्द याणीं, दोन हजारांहून जास्ती वर्षे पुरून गेल्या नंतर, उघडिकेस आणिल्या. **इरकआरबिया** हा देश त्रिकोणाकृति अ-सून **इराण** व **आरबस्थान** यांमध्यें आहे. तो पिकाऊ आणि सुखी आहे. यातून **तैग्रीस** व **यूफ्रेतीस** अशा दोन मोठ्या नद्या वा-हतात. यांतील मुख्य शहर **बगदाद** हें **तैग्रीस** नदीवर आहे. एथें व्यापार फार चालत असतो. **आरबस्थान, इराण,** आणि **सिरिया** यांमधील खुसकीचा व्यापार या शहराच्या मार्गानें होतो ज्यावेळीं **मुसलमानांच्या** राज्याचा उत्कर्ष होता, त्यावेळीं **खलीप** ह्मणून जो त्यांचा बादशाहा व मुख्य धर्माधिकारी तो एथें राहात असे. प्राचीन काळचें यूफ्रेतीस नदी वरील मोठें बलाढ्य व चम-त्कारिक **बाबिलन** ह्मणून जें शहर तें याचे ताब्यांत होतें. त्याचा काहीं अंश अद्याप आहे; परंतु तेथें आलीकडे कोणीही राहात नाहीं; आणि तें अगदीं ओसाड होऊन गेलें आहे. **बसरा** हें इराणी आखातावर तैग्रीस आणि यूफ्रेतीस या नद्यांच्या मुखा-जवळ मोठें व्यापाराचें ठिकाण आहे. तेथून आंतील मुलखाशीं व्या-पार एकाप्रकारचे *लमाण लोक चालवितात. ते पश्चिमेकडच्या -शास जातांना बहुधा **आलेपो** आणि **बगदाद** एथें उतरतात.

---

*एथें ओझें बैलांवर न लादतां [illegible] लादतात. आणि शेकडों व्यापारी मिळू-न एकदम जातात. यांस क्यारेवान [illegible] ह्मणतात

सिरिया प्रांत भूमध्यसमुद्राच्या पूर्वकांठी आहे. यामध्यें लेबानन पर्वत आहे. त्यावर देवदाराचें रान आहे, परंतु तें प्राचीन काळीं सांप्रतच्या पेक्षा फार होतें. यांतील शहर दमास्कस एथें वाकड्या तरवारी चांगल्या होतात, व एक प्रकारचीं कापसाचीं व रेशमी वस्त्रें चांगलीं होतात; त्यांना दमास्क हेंच नाव आहे. हें शहर बरेंच सुंदर आहे. याच्या सभोंवतीं बगीचे व झाडें बहुत आहेत. एथील सर्व व्यापार बिरूत या बंदरानें होतो.

आलेप्पो हीं सिरियाची राजधानी. एथें व्यापार फार चालतो. आंतियाक, प्राचीन काळचें सर्वोत्कृष्ट शहर; हें आलेप्पो पासून सुमारें पंचवीस कोशांवर आहे; परंतु तें आतां भग्न मोडलें आहे. बालबेक आणि पालमीरा हीं प्राचीन काळीं फार सुशोभित शहरें होतीं, तीं लबानन आणि दमास्कस याजवळ होतीं; परंतु तेथें आतां जुन्या सुंदर देवळाचे शवभाग मात्र राहिले आहेत. याचप्रमाणे तायर आणि सैदन ह्मणून भूमध्यसमुद्रावर फार मोठ्या व्यापाराच्या जागा होत्या, त्या ठिकाणीं आतां फक्त दोन दरिद्री गांव मात्र उरले आहेत.

सिरियाच्या दक्षिण भागास पालेस्तैन ह्मणतात. या परगण्याचा विस्तार फार लहान आहे. एथें येशूख्रिस्त तेहेतीस वर्षे राहात होता. पूर्वी हा भाग पिकाऊ आणि सुखी होता, आतां तेथें हयगयी मुळें लागवड फार थोडी होत्ये. हा सर्व प्रदेश डोंगरी आहे. कारमल हा यांतील मुख्य पर्वत; व जार्दन ही मुख्य नदी. ती मृतसमुद्रास जाऊन मिळत्ये; मृतसमुद्रांतील पाणी कडू व खारट आहे. त्याचा किनारा ओसाड व उतरता आहे. त्यांत किंवा त्याच्या आसपास कोणी प्राणी राहात नाहींत. मृतसमुद्र जेथें आहे, तेथें पूर्वी एक सुंदर [illegible] तें, या परगण्यांतील मुख्य

शहर यरुशालेम, हें याच्या दक्षिणभागीं आहे. एथ आतां बहुधा तुर्की व आरब लोक राहतात. यांतील पूर्वींचे यहुदी लोक सर्व पृथ्वीवर पसरले आहेत. याशिवाय एकर हें एक यांत मोठें शहर आहे; तेथें आलीकडे पुष्कळ लढाया झाल्या आहेत.

**सैप्रसबेट** सिरियाच्या पश्चिमेस व भूमध्य समुद्राच्या एका कोनात आहे. हें तुर्कस्थानाच्या अमलात आहे. एथील बहुतेक लोक **ग्रीक** आहेत. त्यांजवर त्यांचे मुसलमान यजमान फार जुलूम करतात; तेणेकरून जमीनीची लागवड बरोबर होत नाहीं. एथें रान बरेंच आहे, आणि द्राक्षें पुष्कळ होतात. याचें मुख्य शहर **निकोशिया** हें मध्यभागीं आहे.

तुर्कस्थानांत मुख्य नद्या **तैग्रीस** व **युफ्रेतीस** या आहेत. त्या मुखाशीं एकत्र होऊन इराणी आखातास मिळतात. यांखेरीज **किझिलइरमक** ही एशियामैनरांत आहे.

एथील लोक तरतऱ्हेच्या जातींचे व धर्मांचे आहेत; त्यांतील मुख्य तुर्की. यांचा धर्म **महमदी** आहे.

## तारतरी.

तारतरी देशाच्या उत्तरेस **सिबीरिया**; पूर्वेस **चिनीतारतरी**; दक्षिणेस इराण व **अफगाणिस्थान**; आणि पश्चिमेस **क्यासपियन** समुद्र, व **यूरल** नदी हीं आहेत.

हा देश फारच सपाट आहे. **तिबेट** व **मोंगोलिया** आणि **तारतरी** यांच्यामध्यें **बेलूर** ह्मणून जी पर्वताचीरांग आहे, तिजपासून तों क्यासपियन समुद्राच्या पूर्व किनाऱ्यापर्यंत, पश्चिमेकडे उतरतें असें एक मैदान आहे. हा प्रदेश बहुधा भणभणीत व ओसाड असून, कोठें कोठें लहान लहान झाडें व थोडें थोडें गवत

डोंग

खेरीज दुसऱ्या वनस्पति एथें मुळीं नाहींत परंतु यक्षू नदी-जवळचे परगणे पिकाऊ व चांगले आहेत. या नदीचे आसपास माणकें, वैडूर्य व सोनें हीं सापडतात.

गहू, भात व दुसरीं धान्यें, वसाहतहोण्यासारखे जे या देशाचे भाग आहेत तेथें होतात. . यांखेरीज तेथील लोक घोडे व इतर गुरें बाळगतात. हे घोडे फार मौल्यवान असतात; आणि केवळ लादण्यासच उपयोगीं पडतात असें नाहीं; परंतु हे लोक त्यांचें मांस ही खातात, व दूध पितात. यांचा व्यापार बहुधा चीन, रशिया व यांचे आसपासचे देश यांजबरोबर आहे. हा व्यापार लमाण करितात. चहा हा व्यापाराचा मुख्य जिन्नस आहे.

यांतील लोक दोन प्रकारचे आहेत; एक घरेंदारें बांधून एका ठिकाणीं स्थाइक राहातात, व एक सर्व देशभर भटकत असतात. हे दुसऱ्या प्रकारचे लोक बहुधा उत्तरेस व मध्यभागीं असतात. यांना बहुतकरून किरजी असें ह्मणतात. ते घोड्यावर बसण्याचे कसबांत फार कुशळ आहेत.

या देशांतील बोखारा हा जो दक्षिणेकडील परगणा, तेथील लोक इतरांपेक्षा विशेष सुधारलेले आहेत. याचें मुख्य शहर बोखारा हें मोठें आहे, व यात वस्ति पुष्कळ आहे. समरकंद एथे तैमूरलंग ह्मणून जो प्रख्यात व दुष्ट मुसलमान देशजिंकणारा होऊन गेला तो राहात असे. किवा हें यक्षू नदीच्या दक्षिणेस आहे एथें या देशांतील खान राहात असतो.

यक्षू (आकसस) अथवा अमू, व सिहान ह्या या देशात मुख्य नद्या आहेत. पहिली हिंदुकूश पर्वतांतून निघून पश्चिमवाहिनी होऊन आरलसमुद्रास जाऊन मिळते, व दुसरी ही त्याच समुद्रास जाते. क्यासपियन व आरल हीं एशियांत सर्वांपेक्षा

मोठी सरोवरें आहेत. आरल याच प्रांतांत क्यास्पियन्‌च्या साखेच आहे. याच्याकाठची जमीन खोल व ओसाड आहे, व तेथें कोणी लोक राहात नाहींत. हीं दोन्ही सरोवरें समुद्राचे सपाटीपेक्षा शंभरफूट खालीं आहेत. या देशाला स्वतंत्रतारतरी असें ही म्हणतात.

## एशियांतील रुशिया.

**सिबीरिया** म्हणून जो या खंडाच्या सर्व उत्तर भागास प्रदेश आहे, व **जार्जिया** या नांवाचा **काकेशस** पर्वताच्या दक्षिणेस व क्यास्पियन समुद्राच्या किनाऱ्यावर प्रांत आहे तो, असे दोन प्रांत मिळून एशियांतील रुशिया झाला आहे. जार्जिया व **सरक्याशिया** यामध्यें **काकेशस** पर्वत आहे. हा प्रांत जरी डोंगरी आहे तरी सुपीक व पिकाऊ आहे. एथील हवा शांत आणि आरोग्यकारक आहे. लहान लहान नद्या यांमधून पुष्कळ वाहतात, आणि काकेशस पर्वताचा आश्रय असल्यामुळें उत्तरेकडील थंड वाऱ्यापासून उपद्रव होत नाहीं. यापर्वतामध्यें **शाहएलबुर्झ** हें उंच शिखर आहे. सरक्याशिया व जार्जिया या दोन्ही प्रांतांतील लोक शूर आहेत, व स्त्रिया फार सुंदर आहेत. तिफ्लिस हें यांचें मुख्य शहर सिबीरिया हा थंड सपाट व ओसाड परगणा आहे. हें एकूलपर्वतापासून तो पासिफिक महासागरा जवळ जवळ पर्यंत थंड साड व लांबच लांब मैदान आहे. याच्या दक्षिणेस व पर्वत आलताई पर्वत आहे. हा याच्या व मोंगोलिया यांच्यामध्यें आहे. सिबीरिया प्रांतात फारच थंडी असल्यामुळें दक्षिण भागांमात सुमारें एक तृतीयांश जमीनींत कृषिकर्म होतें. एथें बेकल म्हणून सरोवर आहे, आणि त्याचे किनाऱ्याजवळ फारच रमणीय आहे

असे लागतात. उत्तरेकडेस कोठें कोठें दाट रानें आहेत, व कोठें कोठें मोठालीं ओसाड मैदानें आहेत, त्यांला स्तेप्स असें ह्मणतात.

या प्रांतात खनिजपदार्थ बहुत उत्पन्न होतात; त्यांत सोनें हें मुख्य. लोंकर हा यातील व्यापाराचा मुख्य जिन्नस.

एथील लोक अनेक जातींचे आहेत, त्यांत तारतर पुष्कळ आहेत. काहीं चागल्या चागल्या ठिकाणीं युरोपांतील लोकांनीं येऊन वसाहात केली आहे. हे व राजद्रोहावरून ज्या लोकास रुशियाचा पादशाहा एथें आणून टाकतो, त्यांखेरीज दुसरे युरोपियन लोक यात नाहीत.

या प्रातांत तोबालस्क हें पश्चिमेकडे व इर्कुतस्क हें पूर्वेकडे अशीं दोन मोठीं राज्यें आहेत. यांच्या राजधान्या त्याच नावांच्या आहेत. येनिशी, ओबी, इरतीश, व लीना ह्या या प्रांतांत मुख्य नद्या आहेत. त्या सर्व उत्तर महासागरास जाऊन मिळतात.

कामस्चातका हें द्वीपकल्प याच्या पूर्वेस आहे. एथें थंडी फार व रानटी जनावरें बहुत आहेत. त्यांची लोंकर तेथील लोक इतर देशांत पाठवितात, व कातड्यांचा वस्त्राप्रमाणें उपयोग करितात; आणि थंडीचे दिवसात जमीनीखालीं झोंपड्या बाधून राहतात. यांचें पाळण्याचें मुख्य जनावर कुत्रा हें आहे. त्यांना हे साहा किंवा आठ मिळून गाडीला लावतात.

पासिफिक महासागरांतील याचे पूर्वेची अल्यूशियन बेटें आणि दक्षिणेची क्यूराईल बेटें हीं रुशियाचीं आहेत. अमूर नदी चीनच्या राज्यांतील मांचूरिया प्रांतामधून जाते. इच्या मुखाजवळ एक नवीन रुशियन संस्थान बनत आहे.

## [illegible]

हें एशियाच्या पूर्वेस व ह. चिनीतारतरी, चीन

तिबेट असे याचे तीन भाग आहेत. चिनीतारतरी व तिबेट या-जमध्यें क्यूएनलन आणि त्याच्या व सिबीरिया यामध्यें आलतै, व पूर्वभागीं खिंगान असे पर्वत आहेत. सर्व प्रांत समुद्रापेक्षां तीन हजा-रांपासून चारहजार फूट उंच असून तारतरी प्रमाणें ओसाड, नि-रूपयोगी, व फार थंड आहे. गोबी अथवा शामू ह्मणून एक मोठें वाळवंट आहे, तें या बहुतेक प्रदेशावर पसरलेलें आहे. चिनीतारतरीचे तीन भाग आहेत, मांकूरिया, मोंगोलिया अथवा मोंगल लोकांचा देश, आणि लहान बुकारिया एथील लोक स्थाईक घरें न करता फिरून बहुधा घोडे व गुरें यांजवर आपला उदरनिर्वाह करितात. सर्व जातीचे लोकांवर एक एक खान आहे; तो चीनाच्या बादशाहास काहीं खंडणी देऊन अमल चा-लवितो. हे लोक नेहेमी फिरते असल्यामुळें यादेशात शहरें फार नाहींत. यारकंद आणि क्याशगर हीं दोन पश्चिमेकडे आहेत, आणि तोलानूर पिकिनाच्या उत्तरेस आहे.

आमूर अथवा साघालियन ही नदी मांकूरिया मधून जाते. साघलियन नावाचें एक तारतराच्या पूर्वेस बेटही आहे.

चीन देशांत पर्वत पुष्कळ आहेत, व याचे प्रांत वेगवेग-ळाल्या प्रकारचे आहेत. हे पर्वत हिमालय पर्वतास लागून आहेत. त्यांतून मुख्याचें नाव यूंगालिंग, हा वायव्ये पासून नैर्ऋत्येकडे जातो. याशिवाय बहुधा एकमेकास समांतर अशा पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणाऱ्या दुसऱ्या चार रांगा आहेत. त्यांपैकीं सर्वांत उंच व दक्षिणेकडील इचें नाव नानलिंग.

चीनची हवा फार बदलणारी आहे. थंडीच्या दिवसांमध्यें थं-फार, व उष्णकाळीं उष्णता फार असते. एथील कृषिकर्म चांगल्या रीतीनें होतें, व ह्मणून वनस्पति पुष्कळ आहेत इतकेंच

नाहीं, परंतु पर्वताच्या बाजू नीटकरून तेथे ही लागवड करतात. यामुळें सर्व जातीचा फळ यांत उत्पन्न होतात; आणि गहूं व भात वगैरे धान्य पुष्कळ होतें. परंतु चहा हें एथील मुख्य उत्पन्न. हें झाड झुडपाप्रमाणें असून दाट असतें याची उंची साडेतीन हातांपासून तों साडेचार हातांपर्यंत असते. याचीं पानें काढून सुकवितात, आणि मग आधणांत घातलीं ह्मणजे याचा अर्क निघतो तो पितात. इतर देशाशीं व्यापाराचा मुख्य माल हाच आहे. हा देऊन ते अनेक तऱ्हेचा माल आपल्या देशांत आणतात. त्यांत हिंदुस्थानांतील अफूही मुख्य.

हे लोक मोठे उद्योगी व कुशळ आहेत. मातीचीं भांडीं एथें फार उत्कृष्ट होतात. रेशमाचीं फुलें, साटिन व दुसऱ्या जातींचीं रेशमी व कापसाचीं वस्त्रें चांगलीं होतात दिलेल्या नमुन्या प्रमाणें नकल उतरण्यांत हे फार हुशार आहेत. कोणतीही वस्तु त्यांस दाखविली तशी हुबेहूब करून देतात. परंतु यांचें कौशल्य आतां पूर्वीपेक्षां कमी होत चाललें आहे असें दिसतें. प्राचीन काळीं हे लोक इतर लोकांशीं तुलना करून पाहिलें असता फार सुधारलेले होते. परंतु एकदा सुरू केलेल्या गोष्टींमध्यें फारफेर करण्यांत फार नाखुषी असल्यानें, व इतरांपासून प्राप्त झालेलें ज्ञान निरुपयोगी असें मानल्यानें यांची सुधारणूक बहुत वर्षें अगदीं वाढली नाहीं. आपल्याशिवाय दुसरे लोक रानटी असें ते मानतात.

यांच्या रीतिभाती चमत्कारिक आहेत. स्त्रियांचे पाय बारीक असणें यांत यांस फार सौंदर्य वाटतें; व तसें होण्यासाठीं मुली लहान असतांना आई त्यांचे पाय घट्ट बांधते. नंतर त्या वाढल्या ह्मणजे अगदीं लंगड्या होऊन विलक्षण रीतीनें चालतात. यांचें खाणेंही विलक्षण आहे. घुशी, उंदीर, कुत्र्यांचीं पिलें, व

नर, पोटानें चालणारीं जनावरें व काहीं पक्ष्याचे घरटे हीं सर्व त्याच्या नेहेमीच्या भक्ष्यापैकीं आहेत.

चिनामध्यें राज्य चालविणारा बादशाहा आहे. त्याच्या इच्छेस अडथळा आणणारा कोणी नाहीं. याची उत्पत्ति देवापासून आहे असें त्याची प्रजा मानते. या देशांत पदव्या वंश परंपरेनें चालत नाहींत; परंतु जे मोठे विद्वान व हुशार होतील त्यानाच मिळतात.

एथील बहुतेक प्रजा बुद्ध धर्माची आहे. परंतु पुष्कळ लोक, त्यांत, मुख्यत्वें करून थोर, कनफ्यूशियस म्हणून ख्रिस्ती शकाच्या साहाव्या शतकामध्यें एक ज्ञानी होऊन गेला त्याचे अनुयायी आहेत. ह्याच्या धर्मांत एक ईश्वर मानला आहे.

चिनांतील सांप्रतचा पादशाहा तारतर जातीचा आहे. दोनशें वर्षांपूर्वीं मांकुरिया एथून एका खानानें येऊन हा देश जिंकून राज्य मिळविलें. याचे पूर्वींही त्या आंगून ते लोक येऊन या देशावर स्वाऱ्या करीत असत; त्या बंद करण्यासाठीं चिनी लोकानीं उत्तरेच्या आगारास एक मोठा मजबूद तट बांधिला आहे. त्याची लांबी पांचशें कोशाहून जास्त आहे.

याची राजधानी पिकिन एथें बादशाहा राहतो. हें शहर श्रीमंत लोकांनीं भरलेलें आहे. नांकिन ही पूर्वीची राजधानी. या दोन शहरास जोडणारा एक लांब कालवा आहे. नांकिन एथ एक चमत्कारिक चिनी भांड्याचा बुरुज बांधलाआहे. आमेयीस कंतान हें सर्व चिनांत मोठें बंदर आहे. याठिकाणा खेरीज परकी लोकाना दुसरीकडे कोठें जाण्याची परवानगी नव्हती, ती हल्लींकडेसच सुरू झाली आहे. एथें एक चमत्कार असा आहे कीं हजारो लोक नेहेमी लहान्या गलबतांत राहतात. या गलबो-

स तरेंं शहर असें ह्मणतात कॆंतान नदीच्या तोंडी मकाव ह्मणून एक बेट आहे, त्यांत त्याच नावाचें एक शहर आहे; तें पोर्तुगाल लोकांचे अमलात आहे. आणि त्याचेच जवळ हांगकांग बेट आहे, तें इंग्रेजांचें आहे. या बेटाचे उत्तर भागीं विकतोरिया नामक शहर आहे, तेथें चांगलें बंदर आहे.

होआंगहो व यांगसिकांग ह्या चिनात मोठ्या नद्या आहेत. पहिली पीतसमुद्रास जाऊन मिळत्ये, आणि दुसरी नाकिन शहराजवळ पासिफिक सागरास जाऊन मिळत्ये. या नद्यांचा उगम तिबेटात आहे असें ह्मणतात. एशियातील सर्व नद्यांत यांची लांबी विशेष आहे.

तिबेट हा चीनच्या राज्याचा नैर्ऋत्य भाग आहे. याच्या उत्तरेस क्यूएनलन व दक्षिणेस हिमालय हे पर्वत आहेत. या दोहोंच्यामध्यें हा एक मोठा उंच प्रदेश आहे. समुद्राच्या सपाटीपेक्षा याची उंची १०,००० फूटांहून अधिक आहे, ह्मणून याच्या इतका उंच देश पृथ्वींत दुसरा कोणता नाहीं. याचा कांहीं भाग ओसाड आहे, आणि कांहीं बराच पिकाऊ आहे. एथें गहूं, द्राक्षें व पुष्कळ प्रकारचीं फळें होण्यासारखीं आहेत एथील मुख्य धान्य व अन्न एका जातीचे काळे सातू हें आहे. सर्व देश उंच आहे यामुळें हवा थंड आहे; परंतु याच्या सभोंवतीं पर्वत आहेत, व उत्तरेकडील थंड वारा क्यूएनलन पर्वतामुळें अटकला जातो, या कारणानें दुसऱ्या कित्येक सखल ठिकाणांपेक्षा एथें थंडी कमी आहे; परंतु पर्वतांतून जाण्याच्या कांहीं वाटा आहेत, तेथील हवा थंड व रोगी आहे.

चिनीतारतरी व तिबेट याजमध्यें कोकोनूर अथवा निळा समुद्र या नावाचा दोनशें कोस किंवा जास्ती परिघाचा पाण्या

भरलेली जागा आहे. तिचें पाणी कडू व खारट आहे आणि त्याला भरती ओहोटी येत्ये.

तिबेटामधील पर्वतांत सोनें, रुपें, शिसें,व तांबें हीं सापडतात, परतु यांतील मुख्य उत्पन्न मौल्यवान गुरें हें आहें. बैल, बोकड, व मेंढे हीच तिबेटी लोकांची मोठी संपत्ति. एथें बकरे व मेंढे फारच चांगले व मोठे होतात. त्यांना ओझें वाहण्यासही लावतात. मेंढ्याची लोंकर लांब व रेशमासारखी आहे. ती काश्मिरांत जाऊन तेथें तिच्या शाली होतात. एथें कस्तूरिकामृग ही फार आहेत. हा सुवासिक पदार्थ पुरुष जातीच्या मृगाच्या बेंबीमध्यें असतो. एथें याक ह्मणून एक जनावर आहे, तेंही फार मौल्यवान आहे. याचें शेपूट मोठें झुबक्या सारखें असल्यामुळें त्याच्या चवऱ्या व अनेक दुसऱ्या वस्तु होतात. याला मराठी भाषेंत वनगायी असें ह्मणतात.

हे लोक बुद्ध धर्म पाळतात. त्या धर्माचा मुख्य गुरू व राज्याचा अधिकारी याजला तालीलामा असें ह्मणतात. तो बुद्धाचा अवतार असें हे लोक समजतात. या देशाचें राज्य चिनाच्या अमलाखालीं आहे.

एथील राजधानी लासा ही दक्षिणेकडे आहे. या शहरचा मुख्य भाग चांगला आहे. परंतु दूरदूरच्या गल्या फारच मलीन आहेत. एथील कांहीं घर फक्त शिंगाचीं बांधेललीं आहेत. तीं सुंदर रीतीनें चित्रवलेलीं असतात, परतु आत फार मलीन असतात तालीलामा हा या शहराच्या जवळच एक पर्वतात राहातो. या देशात सांपू ही मोठी नदी आहे.

केरीयाचें द्वीपकल्पहें, पीतसमुद्र व जपानचा समुद्र याज मध्यें व चिनाइ तारतरीच्या पूर्वेस आहे. हें चिनाच्या राज्यांत मोडतें. चिनाचा राजा व ... ...णी आहे, आहे, परतु

दुसरा पहिल्यास खंडणी देतो. या सर्व प्रांतभर एकपर्वत आहे. याचा उत्तरेकडील भाग ओसाड आहे, परंतु दक्षिणेस जमीन बरीच पिकाऊ आहे, व गुरें हीं चांगलीं आहेत. याचें मुख्य शहर किकीतव हें किनाऱ्यापासून दूर आहे.

चिनाच्या जवळील फोरमोसा, लुकू, ल्यूझान, व हेनान हीं सर्व बेटें चिनाच्या अंमलांतील आहेत. पहिल्यामध्यें ज्वालामुखी आहेत.

## जपानचें राज्य.

यामध्यें निफान, जेस्यू, सिकाक्फ, व किस्यू हीं चार मोठीं व आणखी कित्येक लहान अशीं बेटें आहेत. त्याच्या आणि चीनमांकूरिया यांच्यामध्यें जपानचा समुद्र आहे.

या बेटांत बहुत भयंकर, कठीण व दगडांनीं भरलेले असे पर्वत आहेत. त्यांतून कित्येक ज्वालामुखी आहेत. यातील खोरीं पिकाऊ आहेत, व त्यांत पुष्कळ उपयुक्त पदार्थ होतात. जमीनीपासून उत्पन्न करण्यास लोक फार मेहनत करतात. एथें सोनें, रुपें, लोखंड, तांबें व चांगला कोळसा हे पदार्थ सांपडतात.

एथील मुख्य धर्माधिकाऱ्याकडे सर्व धर्मप्रकरणीं व राज्यप्रकरणीं अधिकार आहे. परंतु वहिवाटीप्रमाणें सर्व ऐहिक अमल बादशाहा चालवतो. परकी लोक आपल्या देशांत येऊं न देण्याविषयीं हे लोक चिनी लोकांपेक्षांहीं अधिक सावधागिरी ठेवतात; आणि यांच्या देशाला व्यापाराच्या सोयी जरी बहुत आहेत तरी शेंकडों वर्षे पर्यंत ते दच लोकां खेरीज दुसऱ्या कोणत्याही लोकांचीं तारवें आपल्या देशांत येऊं देत नसत. आलीकडे मात्र दुसरे लोक जाऊं लागले आहेत.

हे लोक दोनशें कोस किवा हेत. एथें रोगण दिलेल्या जि

नसा, मातीचीं भांडीं, रेशमी व कापसाचीं वस्त्रें आणि पोलादाचें काम हीं होतात. मायाको या शहरीं मुख्य धर्माधिकारी राहातो, ह्मणून तेथील लोक त्यास मुख्य शहर असें मानतात. एथें एक काशाची मूर्ति एवढी मोठी आहे कीं तिचें एक बोटही वेंगेमध्यें सांपडत नाहीं. जद्दो शहर निफान बेटाच्या किनाऱ्यावर आहे. एथें बादशाहा राहातो. वास्तव हेंच मुख्य शहर मानलें पाहिजे. याखेरीज किस्यू बेटात नागासकी आणि ओस्सो यामध्यें हाकोदादी हीं मोठीं शहरें आहेत.

पूर्वेकडीलबेटांचासमूह अथवा आरकीपेलेगो या नावाखालीं एशियाच्या आग्नेयीस जीं सर्व लहानमोठीं बेटें आहेत तीं येतात. ह्यांत अडाणी व रानटी लोकाची वस्ती आहे. परतु युरोपियन लोक अलीकडे काहीं काहीं ठिकाणी येऊन राहिले आहेत.

हीं सर्व उष्णकटिबंधांत आहेत, तथापि यांत नद्या पुष्कळ आहेत, तेणेंकरून हीं फारच सुपीक व मौल्यवान झाली आहेत.

यांतून जपानच्याजवळ जीं आहेत त्यास फिलिपैन अथवा मानिला असें ह्मणतात. त्यांतील सर्वांहून मोठ्याचें नाव लुझान. हीं स्पेनाच्या ताब्यात आहेत.

ह्यामध्यें वनस्पति पुष्कळ व मोठमोठया झाडांनी भरलेलीं अटव्यरानें बहुत, आणि सोन्या रुप्याच्या कांहीं खाणी हीं आहेत. यातील मुख्य शहर मानिला हें लुझान बेटात आहे. एथें तंबाकूच्या विडया फार चागल्या होतात, व त्या एथील एक मोठा व्यापाराचा जिन्नस आहे.

याच्या दक्षिणेस मालुका व बांदा हीं बेटें आहेत. या दोन्ही समुदायास मसाल्याचीं बेटें असें नांव आहे, कारण जायफळें, लवगा आणि दुसरे मर [illegible] नेक होतात

तितके दुसरे कोठें होत नाहींत. आंबायनाबेटांत लवंगा फार होतात. बांदा यांत जायफळें पिकतात. हीं सर्व बेटें दच लोकांच्या ताब्यांत आहेत.

मसाल्याच्या बेटाच्या पश्चिमेस **सिलिबीस** म्हणून एक वाकडें तिकडें बेट आहे. हें हीं दच लोकाच्या ताब्यात आहे. एथून ते, तादूळ, चंदन, कापूस आणि गोडी मिरीं हे जिन्नस नेतात- **मकासर** हें एथील मुख्य शहर. याबेटांतील लोकांस इतर बेटांतील लोकांपेक्षां व्यापाराची गोडी फार आहे, व ते हुशार व धैर्यवान आहेत.

याच्या पश्चिमेस **बोर्निओ** हें आहे. हें **आस्त्रेलिया** खेरीजकरून सर्व पृथ्वींत मोठें बेट आहे. हें पिकाऊ व डोंगरी आहे परन्तु यांतील हवा वाईट आहे. याच्यामधील प्रदेशाची फारशी माहिती नाहीं. कारण तेथें फार दुष्ट रानटी लोक आहेत. ते **युरोपियन** लोकांना आंत जाऊं देत नाहींत. एथें सोनें व हिरे सांपडतात. व वनस्पतिही पुष्कळ आहेत. यांत सागूच्या दाण्याचें झाड हें फार आहे.

**ओरांगोतांग** (रानमाणुस) म्हणून जें सर्व वानर जातींत मोठें व काहीं प्रकारें माणसा सारखें जनावर तें एथें सांपडतें. **सर ज्येम्सब्रूक** म्हणून एक साहशी इंग्रेज आहे, त्याणें या बेटाचा पुष्कळ शोध लावला आहे, व एथें चाचेलोक फार आहेत. ते काहीं अंशीं कमी करण्या विषयीं तो फार झटला आहे. यांतील वायव्ये कडील **साराबक** म्हणून जो एक परगणा व शहर आहे तें त्याच्या ताब्यांत आहे; आणि यावरून याला **राजाब्रूक** असें नाव मिळालें आहे. [illegible] ला उत्तरेस **लाबूअन** म्हणून एक लहान बेट आहे [illegible] ची दोनशें कोस किं[illegible].

जावा हें बेट बोर्निओच्या दक्षिणेस आहे. त्याच्या व याच्यामधें समुद्राचा फांटा आहे, त्याला जावासमुद्र असें ह्मणतात. एशियाच्या आसपास जीं सर्व बेटें आहेत, त्यांपैकीं हें उत्कृष्ट व श्रीमान् आहे वनस्पत्योत्पन्न पदार्थ एथें फार होतात; त्यांतून मुख्य भात, सागू, साखर, मिरीं, कापूस व काफी हीं आहेत.

यामधें उच्च पर्वताची एक रांग जात्ये, तींत कित्येक ज्वालामुखी आहेत याशिवाय यामध्यें मोठमोठालीं रानें पसरलीं आहेत; त्यामध्यें पुष्कळ सागवान उत्पन्न होतो. एथें दच लोकांचें मुख्य शहर बतेविया आहे, त्यांत संपत्ति पुष्कळ आहे, व व्यापार फार होत असतो. हिंदी महासागरांतील वगैरे जीं दच लोकांचीं संस्थानें आहेत त्या सर्वांची ही राजधानी आहे.

**सुमात्राबेट** जावाच्या वायव्येस व त्याच्या व मलाया द्वीपकल्पाच्या मध्यें आहे या द्वीपकल्पाच्या व सुमात्राच्यामध्यें जो समुद्राचा भाग आहे त्याला **मलाकाचीसामुद्रधुनी** असें ह्मणतात. याचे विषुववृत्तानें दोन बहुधा सारखे भाग जाहले आहेत. या सर्व बेटांमधून पर्वतांची एक रांग जात्ये; यांपैकीं कांहीं ज्वाला मुखी आहेत. या सर्वांत उच्च जो **आफिर** पर्वत तो समुद्राच्या सपाटीवर तेराहजार आठशें फुटांपेक्षा जास्ती उच्च आहे. हे पर्वत या बेटाच्या पश्चिमभागीं आहेत. यामुळें यांतील नद्या पूर्ववाहिनी आहेत.

याच्या मध्यभागीं मोठीं मोठीं पुष्कळ रानें आहेत; व यांत वनस्पत्योत्पन्न पदार्थ बहुत होतात. त्यांत कापूर व मिरीं हे मुख्य-एथें मौल्यवान धातु ही पुष्कळ होतात. याच्या पूर्व किनाऱ्यावर बांका ह्मणून जें लहानसें बेट आहे तेथें कथील पुष्कळ होतें. या बेटाच्या वायव्य टोंकाशीं एचीन ह्मणून परगणा आहे, तेथे चांगले तट्टू होतात.

सुमात्राच्या दक्षिणभागीं दचलोक येऊन राहिले आहेत. त्यांचें मुख्य ठिकाण बेंकूलन हें आहे. परंतु उत्तरेकडे मलाय वगैरे पुष्कळ रानटी लोक राहातात. या सर्व बेटामध्यें मलाय लोक आढळतात.

## मलाया.

सुमात्राच्या समोर एशिया खंडांत मलायाचेंद्वीपकल्प आहे. ही एक जमीनीची लांब व अरूंद पट्टी आहे; व ती वायव्येपासून आग्नेयीकडे जात्ये. तीमध्यें एक पर्वतांची रांग आहे, तिजवर रान पुष्कळ आहे. या देशांत अनेक जातीचे लोक राहातात. तेप्थर आडाणी आहेत; व नेहेमीं सर्व देशभर फिरत असतात. मलाय लोक सुमात्रा बेटांतून एथें आले. आतां ते या बहुतेक देशाचे मालक होऊन राहिले आहेत.

या देशांत **सिंगापूर, मलाका, पिनांग,** आणि **वेलस्ली प्रांत** हे आहेत. एथें इंग्रेज लोक राहातात. सिंगापूर हें एक लहानसें आग्नेयीकडील टोंकाजवळ बेट आहे. यांतील बंदर सुरक्षित व चांगलें आहे. मलाकाच्या सामुद्रधुनींतून ज्या आगबोटी चिनेला जातात त्यांना वरवा करण्यास हें फार चांगलें ठिकाण आहे. मलाका हें शहर पाश्चिम किनाऱ्यावर आहे. पिनांग अथवा प्रिन्सआव्वेल्स बेट याच्यावर आहे. आणि वेलस्लीप्रांत पिनांगाच्या समोर एशियांत आहे. **मांगोस्तीन** (रातांबा) ह्मणून जें एक स्वादिष्ट फळ तें मलाकाच्या सामुद्रधुनींतून येतें.

## सयाम (सुल्ल).

सयाम, याच्या पूर्वेस कोचिनचीन व शान; दक्षिणेस सयामचें आखात; पाश्चिमेस इंग्रेजाच्या अमलांतील तेनासेरिम व पीगू हेप्रांत

आहेत. हा सर्व देश एक पिकाऊ खोरें आहे असें ह्मटल्यास चिंता नाहीं. याच्या दोन बाजूस पर्वताच्या उंच रांगा आहेत; व यामधून मानाम नदी वाहत्ये.

एथें मुख्यत्वें करून भात, साखर, व काळामिरीं हीं होतात. उत्तरेकडील बाजूस मौल्यवान खनिज पदार्थ सांपडतात. एथील अरण्यांत मोठे व पांढरे हत्ती असतात. त्यांजवर हे लोक फार ममता करतात, व त्यांची पूजाही करतात.

या देशांत राजा राज्य चालवतो. पूर्वी हा राजा ब्रितिस लोकास तेथें व्यापार करण्यांत फार अडचणी आणी, परंतु हल्लींच्या राजानें त्यांजबरोबर व्यापार करण्याविषयीं, राजधानी जवळ राहण्याविषयीं, व तारवें बांधण्याविषयीं वगैरे तह केला आहे.

या देशाची राजधानी बान्काक ही मिनाम नदीच्या मुखापासून थोडे अंतरावर आहे. या शहरांत मोठा चमत्कार हा आहे कीं, लांकडाच्या ताफ्या करून त्यांजवर बांधून नदींत तरंगत ठेवलेलीं घरें हजारों आहेत. तीं नदीमध्यें मजबूत खांब पुरून त्यांस बांधलेलीं असतात. एथील जुनी राजधानी युदीया ही त्याच नदीवर आंत आहे.

## कोचिनचीन.

गंगेच्या पलीकडील हिंदुस्थान अथवा पूर्वहिंदुस्थान असें ज्या द्वीपकल्पास ह्मणतात त्याच्या सर्व पूर्व किनाऱ्यास कोचिनचीन हें नाव आहे. याला कधींकधीं आनाम असें ही ह्मणतात. याच्या मर्यादा पूर्वेस चिनीसमुद्र, दक्षिणेस चिनीसमुद्र व सयामाचें आखात; पश्चिमेस सयाम आणि शान देश; आणि उत्तरेस चीन. या सर्व देशांतून दक्षिणेकडे जाणाऱ्या दोन पर्वतांच्या रांगा आहेत; व हा सर्व देश त्याच्या फांट्यांनीं झालेला आहे.

शांत मोठ मोठालीं रानें आहेत; व वनस्पत्योत्पन्न पदार्थ पुष्कळ होतात, त्यांत रेवाचिनीच्या शिरा, दालचिनी (हा जिन्नस पूर्वी एथें झाला ) काड्याची लाख व पूर्वेकडील शेतांत पिकणारे साधारण जिन्नस, हे मुख्य आहेत.

या देशांत दोन जातींचे लोक राहतात; एक स्वदेशीय, व दुसरे **आनाम**. पूर्वी चिनी लोकांनीं हा देश जिंकून घेऊन आंत वसाहत केली; त्यांपासून झालेली जी प्रजा तिला आनाम असें ह्मणतात. एथील स्वदेशीय लोक डोंगराच्या आसमतात राहतात. सुमारें मागील शतकाच्या अखेरीस **कांगशांग** याणें हा सर्व देश जिंकून एक राज्य केलें. याला कांहीं युरोपियन लोकाची मदत मिळाली होती. त्यांच्या आश्रयानें याणें आपल्या फौजेला कवाईत शिकविली, आरमार तयार केलें, व युरोपियन लोकाच्या रीतिप्रमाणें किल्ले ही बांधले.

कोचिनचीन देशांत चांगले व पुष्कळ गृहपक्षी होतात. यांतून एकजात अलीकडे युरोपांत नेली आहे. तिची संतति तेथें चांगली होत चालली आहे.

यांतून **डोनाई** व **क्यांबोडिया** या नद्या वाहतात. यांपैकीं दुसरी ही फार चांगली आहे. पहिलीवर **सायगांव** बंदर आहे.

या देशाचें राजधानीचें नाव **ह्यू**. हें शहर सायगांवाच्या इतकें मोठें किंवा महत्वाचें नाहीं. उत्तरेकडे **कशू** ह्मणून बरेंच मोठें शहर आहे.

## शानदेश.

चीन, कोचिनचीन **सयाम** व ब्रह्मदेश याच्या मध्यें शान लोकाचा देश आहे. यांत फारजातींचे लोक राहतात. यांतून कांहीं स्वतंत्र आहेत, व कांहीं वर सांगितलेल्या राजांचे अमलांत आहेत.

त्यातून एक जातीला लेआस असें ह्मणतात; व यावरून सर्व दे-शाला कधींकधीं हें नाव लावतात. हा देश डोंगरी आहे. यांत रानें रत्नें व धातु पुष्कळ आहेत असा अदमास आहे; परंतु या देशाची युरोपियन लोकास अद्यापि पक्की माहिती नाहीं.

शान लोक, शूर व कुशळ आहेत. रोगणाच्या पेट्या व रेशमी जिनसा करण्यामध्यें ते मोठे कसबी आहेत. ज्यांना इकडे पेगू तट्टू असें ह्मणतात, ते या देशचे. हे लोक त्याना पेगू व ब्रह्म या देशांत आणतात, आणि तेथून मग ते हिंदुस्थानांत येतात.

## ब्रह्मदेश.

ब्रह्मदेश, चीन आणि शान यांच्या पश्चिमेस आहे. याम-ध्ये लहान लहान टेंकड्या आहेत आणि टोंकाशीं मात्र कांहीं डों-गर आहेत. इरावती ही सुंदर नदी यामधून वाहत्ये. ही दक्षिण वाहिनी होऊन रांगून याच्या थोडीशी खालीं समुद्रास मिळत्ये.

यादेशांत खनिज पदार्थ पुष्कळ निघतात; त्यांत शिलारस हामुख्य. हा रोगणासारखा दाट असुन कोळशाच्या जवळच्या ख-ड्कांतून बाहेर थबथबून निघतो. ब्रह्मी लोक याला तेला प्रमाणें दिव्यांत जाळतात, अगर राखेंत अथवा मातींत मिसळून चुलींत सर्पणा प्रमाणें जाळतात. सोनें, रुपें, लोखंड, शिसें, कथील आ-णि सुर्मा या धातू ब्रह्म देशात सांपडतात उत्तर प्रांतांत पुष्करा-ज, नीळ वगैरे रत्नें सांपडतात. अमीरपूर राजधानीजवळ संगमर वरी दगडाच्या खाणी आहेत. आणि कित्येक ठिकाणीं कोळसा ही सांपडतो. यांतील मोठया रानांत सागवानही पुष्कळ आहे, तो तारवें बांधण्यास फार उपयोगी पडतो.

ब्रह्मी लोक कुशळ आहेत. रेशमाचीं वस्त्रें व सुंदर भा-

दोळे रोगण दिलेले करडे हे करतात; परंतु शान लोकासारखे हे नाहींत. ते शूर आणि चपल आहेत. आपल्या लढाऊ तारवांच्या कामात हे हुशार आहेत. हीं तारवें इरावती नदीवर नेहेमी पुष्कळ असतात.

ब्रह्मी लोक बुद्ध धर्माचे आहेत. एथें राज्य, राजा आपले इच्छे प्रमाणें करतो. या देशातील कांहीं मोठमोठाले परगणे आलीकडे इंग्रेजांच्या अमलांत आले आहेत.

याची राजधानी **अमरपूर** ही एका लहान द्वीपकल्पांत इरावती नदी आणि एक मोठें सरोवर यांच्यामध्यें आहे. हें शहर दुरून फारच चांगलें दिसतें. याच्या दोन प्राचीन राजधान्या आवा आणि **सागेन** ह्या होत्या. पहिली आता अगदी मोडून तेथें कांहीं देवळें, बागा व रानें हीं मात्र आहेत. सागेन इरावती नदीवर आहे. तिजवरील आलीकडचें आवा शहर याला ही राजधानी ह्मटल्यास चिंता नाहीं, कारण ब्रह्मी लोक, कधीं आवा याला आणि कधीं अमरपूर याला राजधानी असें मानतात.

## ब्रह्मदेशाजवळील इंग्रेजीराज्याखालचे परगणे.

पेगू, **आराकान**, **आसाम** आणि **तेनासेरिमप्रांत** हे परगणे इंग्रेजांच्या अमलांत आहेत. आराकान आणि आसाम यांमध्यें बंगालइलाख्याचा कांहीं भाग आहे.

समुद्र आणि सयाम देश यांमधील जी अरुंद जमीनीची पट्टी तिला तेनासेरिमप्रांत असें ह्मणतात. याच्या आणि पेगूच्या मध्यें **सालवीन** अथवा **मार्तबान** ही नदी आहे. हा देश डोंगरी आहे, व यांत रानें फार आहेत, यामुळें शहरा शहरांमधील व्यवहार जळ मार्गानें होतो. तांगितई, ...राय, ये, आणि मार्गी-

**बान** हे परगणे आहेत. **मुलमेन** हें यातील मुख्य शहर; हें या भागांतील इंग्रेजाच्या फौजेचें ही ठाणें आहे.

पगूप्रांत ब्रह्म लोकापासून इंग्रेजांनीं १८५२ त घेतला. हा वरील प्रांताच्या उत्तरेस आहे. त्याच्या व याच्यामध्यें सालवीन नदी आहे. हा पिकाऊ देश आहे, व पुष्कळ प्रकारें आवाराच्या प्रमाणेंच आहे. अलभागी लहान लहान डोंगर आहेत; आणि इरावती नदी उत्तरेकडून दक्षिणेस या सर्व देशांतून जात्ये. यातील मुख्य शहर **रांगून** हें इरावती नदीच्या एका मुखावर मोठें बंदर आहे. **प्रोम** इरावतीवर आहे, आणि **तांगू** हें **सितांग** या नदीवर आहे. **पेगू** ही नावाची राजधानी आहे, परंतु हें काहीं मोठें शहर नाहीं. **बासीन** इरावतीच्या एका मुखाजवळ आहे.

बासीनपरगण्याच्या उत्तरेस **आराकान** प्रांत आहे. ही लांब व अरुंद जमिनीची पट्टी आहे. हा प्रांत आणि पेगू व ब्रह्म यांच्यामध्यें दाट रानानें भरलेले उच पर्वत आहेत. या पर्वताच्या आणि बंगालच्या उपसागरामधील प्रदेश रानानें भरलेला आहे. त्यामुळें दळण वळण नद्यांनीं ठेवावें लागतें. आराकान ही यांतील पूर्वीची राजधानी होती; परंतु **आकिआब** ही हल्लीं झाली आहे. आकियाब व **कियकफियु** एथें इंग्रेजांच्या छावण्या असतात. आराकान प्रांतामध्यें मुख्यत्वें करून **मग** लोक राहतात

आसाम ब्रह्म देशाच्या ईशान्येस आहे हा पिकाऊ आहे. यामधून ब्रह्मपुत्रा नदी वाहत्ये. याच्या चोहीं बाजूस बहुतकरून डोंगर आहेत.

या परगण्यात वनस्पत्यात्पन्नपदार्थ पुष्कळ होतात, त्यांत सर्वांचें झाड, कापूस आणि चहा हीं मुख्य. यांतील नद्यांच्या वाळूमध्यें सोनें सांपडतें. रेशमी नक्षे करण्याचे एथें पुष्कळ कारखा-

ने आहेत. एथून बंगाल्यात सोनें पुष्कळ जातें. ओरकान आणि रंगपूर हीं यात मुख्य शहरें आहेत.

## हिंदुस्थान.

यादेशाकडे आपणास इतर देशांपेक्षा विशेष लक्ष दिलें पाहिजे, कारण हा आमचा देश व आह्मी यांत राहतो.

**हिंदुस्थान** किंवा **इंदिया** हा देश **हिंदीमहासागर** यांतील एक मोठें द्वीपकल्प आहे; व या सागरास हें नाव यावरूनच पडलें आहे. याच्या उत्तरेस **हिमालय** पर्वताची रांग आहे. या रांगेंत सर्व पृथ्वीमध्यें उंच उंच असे डोंगर आहेत. पूर्वेस **आसाम, ब्रह्मा, आराकान,** आणि **बंगालचाउपसागर** आहे; दक्षिणेस **हिंदीमहासागर;** पश्चिमेस तो व **सिंधुनद, आफगाणिस्थान** व **बलुचिस्थान** हीं आहेत. हिंदुस्थानाचा उत्तरभाग त्रिकोणाकृति असून कांहींसा एशिया खंडांत गेलेला आहे; परंतु **गंगेच्या** मुखापासून तो **सिंधूच्या** मुखापर्यंत बहुतेक सर्व भाग वर सांगितल्या प्रमाणें द्वीपकल्प आहे. **सिंहलद्वीप** हें सुंदर बेट, याच्या दक्षिणेस व **मदुरा** व **तिणवली** प्रांताजवळ आहे.

**विंध्याद्रि** पर्वतानें या देशाचे दोन भाग झाहले आहेत. उत्तरेच्या भागास कधीं कधीं **हिंदुस्थान** असें विशेषे करून ह्मणतात, व दक्षिणेच्या भागास **दक्षिण** असें ह्मणतात, परंतु हें नाव कधीं कधीं **विंध्याद्रि** पर्वत व **कृष्णा** नदी यामधील प्रदेशालाच लावतात. हिंदुस्थानाच्या उत्तर सीमेचे डावे आंगचे **हाला** व **सोलिमान** पर्वत, मधील **हिमालय** पर्वत, व उजवेकडील **आसाम** व **चितगांगचे** पर्वत असे मिळून एक अर्ध वर्तुळहोतें. हें अर्धवर्तुळ व इतर बाजूचा समुद्र येणेंकरून हा सर्व देश पृथ्वीच्या इतर भागापासून निराळाच होऊन गेला आहे.

हिमालयाच्या शिखरावर सदोदित बर्फ असतें; परंतु त्याच्या बाजूंवरील वनस्पति व सर्व रचना विशाळ व फारच शोभायमान आहे. हा पर्वत पूर्वी सांगितल्या प्रमाणें सर्व पृथ्वींत उंच आहे यांतील कंचिनगंगा हें शिखर समुद्राच्या पृष्ठभागापासून २८१७७ फूट उंच आहे; व एवरेस्त अथवा चिमलागिरी ह्मणन जें आलीकडे मोजलेलें शिखर तें २९००० फूट उंच आहे.

उत्तर हिंदुस्थानांत, सिंधु व गंगा या नद्यांचे कांठाचे सपाटीचे प्रदेश, सिंधूच्या पूर्वेचें मोठें रेतीचें मैदान, व जिच्या दक्षिणेस विंध्याद्रि पर्वत आहे ती उंच जमीन अशीं आहेत. सिंधु नदाच्या दोहीं कांठांवर पंजाब अथवा पांच नद्यांचा मुलूख व सिंध हे प्रांत आहेत. यापैकीं सिंध हा बलूचिस्थान व हिंदुस्थान याच्यामध्यें आहे

गंगेच्या तीरचा सपाट प्रदेश हा सर्व हिंदुस्थानांत सुपीक आहे. हिंदूलोक वायव्येकडून येऊन प्रथम येथें राहिले असें इतिहासावरून कळतें; यामध्यें त्यांच्या धर्मांतील पुष्कळ पवित्र स्थानें व मुख्य नद्या आहेत; आणि सांप्रत इंग्रेजी राज्याची राजधानी व सुखीप्रांत यांतच आहेत.

सिंधदेशाच्या पूर्वेस मोठें ओसाड मैदान आहे. विंध्याद्रि पर्वताच्या उत्तरेकडील ह्मणजे मध्यहिंदुस्थानातील डोंगराचे माथ्यावरील सपाट प्रदेशाची हवा, त्याच्या सभोंवतीं जे प्रांत आहेत त्यापेक्षां, थंड व आरोग्य कारक आहे.

दक्षिण हें एक डोंगराचे माथ्यावरील मोठें मैदान आहे. याच्या सर्व बाजूंस पर्वत आहेत. पूर्वेच्यास पूर्वघाट आणि पश्चिमेच्यास पश्चिमघाट असें ह्मणतात हा दुसरा पर्वत, पश्चिम किना

-याशीं समांतर असून कोठें कोठें फारउच आहे; आणिपहिला कृष्णा नदीपासून मद्रासेच्या अक्षांशा पर्यंत पूर्वेकडे किंवा ज्यास कारोमांदल असें ह्मणतात त्या किनाऱ्याशीं समांतर जातो; नंतर पश्चिमेकडे वळून नीळगिरीशीं पश्चिमघाटास मिळतो. एथें या पर्वताची उंची सर्व ठिकाणापेक्षा अधिक आहे. कृष्णेपासून उत्तरेकडे कटक पर्यंत एक टेंकड्यांची रांग जात्ये; ती पूर्वघाटाप्रमाणें वाकडी तिकडी व मधून मधून तुटलेली अशी आहे.

घाट आणि समुद्र यांमध्यें जो या देशाचा सखल भाग आहे तो बहुधा पिकाऊ आहे. पश्चिम किनाऱ्या जवळ जी सपाट पट्टी आहे ती अरुंद व खडकाळ आहे, परंतु पूर्वेकडील मोठी आहे. तिचे कर्नाटक आणि उत्तरसरकार्स हे दोन परगणे झाले आहेत.

दक्षिणेमधुन मोठाल्या नद्या पुष्कळ वाहतात. त्या बहुतेक पूर्व वाहिनी आहेत. गोदावरी, भीमा, कृष्णा, पिन्नार आणि कावेरी या त्यापैकीं मोठ्या आहेत; नर्मदा व तापी ह्या त्यांचा इतरेस आहेत. त्या पश्चिम वाहिनी होऊन खंबायतच्या आखातास जातात.

हिंदुस्थानाचा हवा बहुधा फार उष्ण आहे; परंतु उंच डोंगरी प्रदेशांतील सखल परगण्यापेक्षा बरी असत्ये. उन्हाळा बहुधा फाल्गुनापासून ज्येष्ठ अखेर पर्यंत असतो; परंतु या देशाचा विस्तार फार मोठा असल्यामुळें पाऊस सर्व प्रांतात एकदम पडूं लागत नाहीं, तेणेंकरून ऋतु एकाच काळीं सर्व ठिकाणीं सुरू होत नाहींत. पावसाळा व त्याजबरोबरील नैर्ऋत्ये कडून वाहणारा वारा बहु[illegible] व तो वैशाखाच्या सुमारास सुरू होतो; परंतु [illegible] बहुतेक पाऊस अश्विन व

कार्तिक या दोन महिन्यांत, जेव्हां ईशान्येकडून वारा सुरू होतो, तेव्हा लागतो. पावसाळ्यात हवा बहुधा थंड असत्ये, परंतु कधीं कधीं घाम येऊन उष्मा होऊं लागतो. हिंवाळा सुखावह व आनंदकारक असतो, परंतु डोंगरमाथा व उत्तरेकडील परगणे खेरीज करून बाकीच्याठिकाणीं थंडीफार नसत्ये. कधीं कधीं कित्येक दिवस पर्यंत सारखा वारा वाहतो; त्यावेळीं जी उष्णता होत्ये ती फारच व्याकूल करित्ये. किनाऱ्यावरील प्रांतात वारवार हा उष्णवारा, सुटल्यानंतर समुद्राकडून गार हवा सुरू होत्ये ती उष्णवाऱ्याच्या पाठीमागून लागलीच आल्यानें फारच सौख्य दायक वाटत्ये.

हिंदुस्थानामध्यें वनस्पत्योत्पन्न पदार्थ फार व मौल्यवान आहेत. आह्मीं ऐथें फक्त मुख्य मुख्य मात्र सांगतो. नारळ, सागू व त्याच जातीचीं अनेक झाडे यादेशात बहुत आहेत. नारळाचे अनेक उपयोग होतात;- फळ खातात, व त्यापासून तेल ही चांगलें निघतें, नरोट्याचीं भांडीं करतात, काथ्याच्या दोऱ्या चांगल्या होतात, आणि [illegible] धरांस [illegible] पन्हळ, व कोठिंबे वगैरे होतात.
सल्यास

या देशात रानें पर्वतावर किंवा त्यांच्या पायथ्याशीं मात्र असतात. सागवान पुष्कळ होतो; तो तारवें बांधण्यास उपयोगीं पडतो. अनूस, चंदन व शिसवी यांचें सुशोभित लांकडी सामान ही होतें. याखेरीज मसाल्याचे पदार्थ, सुवाशिक चीक, व औषधीवनस्पति ह्या पुष्कळ होतात. पुष्कळ अरण्यें, त्यांत मुख्यत्वें करून पर्वताच्या पायथ्यावरील, अगदीं अगम्य आहेत; व तीं अशीं असण्याचें विशेष कारण हें कीं, वृक्षाच्या खालीं लहान लहान झुडपें, व बांबू आणि येत वगैरे यांच्यावेली फार दाट असतात. ज्या ज्या

ठिकाणीं वस्ती आहे तेथें तेथें आंबा, चिंच, अथवा माड वगैरे झा-झाच्या राया छायेसाठीं अथवा फळांसाठीं केलेल्या असतात. यां-खेरीज उत्पन्न होणारीं अशी लहान मोठीं झाडें पुष्कळ आहेत. त्यातून केळ, शिताफळ, नारिंगी, अननस, आणि लिंबी हीं बहुत करून सर्व परगण्यात असतात. प्रत्येक प्रांतात जीं झाडें विशेषें करून असतील, तीं त्या प्रांताचें वर्णन करत्येवेळीं सांगितलीं जातील.

हिंदुस्थानात शेतीच्या उत्पन्नापैकीं भात हें एक मुख्य आहे; बहुतेक देशांत सुखी लोकाचें मुख्य अन्न हेंच आहे. गरीब लोक गहू, जोंधळा, बाजरी वगैरे खाऊन राहतात. व तांदूळ सर्व प्रांतांत सारखेंच खातात असें नाहीं; कांहीं प्रांतांत कमी खातात कांहीं प्रांतांतजास्ती खातात. याशिवाय हरभरे, मका, व नाग हीं धान्यें होतात.

एथें नीळ, ऊस व कापूस हे जिन्नस चांगले होतात, कारण एथील हवा त्यांना जशी पाहिजे तशी आहे. हे एथील व्यापारांतील फायद्याच्या जिनसां[illegible]पैकीं आ[illegible]

मसाल्याचें सामान, [illegible] मौल्यवान धातु, व उत्तम कापड, हे जिन्नस मुख्यत्वें करून फार प्राचीन काळीं एथून बाहेर जात असत. आणि शेकडों वर्षें पर्यंत यादेशाशीं व्यापार करणें हा किफायतीचा धंदा असे. ज्या ज्या गावातून हा माल जाई ते ते येणेकरून मातबर व बलाढ्य होऊन गेले. हा व्यापार अजूनही उत्पन्नाचा आहे, परंतु आतां तो मुख्यत्वें करून अफू, नीळ, तांदूळ, कापूस, व साखर याचा आहे. हे दोन शेवटचे जिन्नस सांप्रत दुसऱ्या देशात एथच्या पेक्षां पुष्काळ व चांगले होतात.

या देशांतील खनिजपदार्थ पुष्कळ व मौल्यवान आहेत. एथें केव्हां केव्हां मोठे मोठे व फार [illegible]काशिन हिरे सापडतात.

माणीक, पुष्कराज, व इतर रत्ने, व नद्यांच्या रेतीमध्यें सान्यारु-प्याचे कण हे सांपडतात. परंतु एथील मुख्य व फार उपयोगी धातु लोखंड ही आहे. उत्तम प्रकारचा कोळसा बंगाल्यांत रांणीगज शहराजवळ सांपडतो; व याखेरीज इतर ठिकाणींही तो पुष्कळ आहे असा अदमास आहे.

पेट्या, करंड्या व इतर सुंदर दिसणारे सामान करण्यांत हिंदूलोक कुशळ आहेत. मलमल, शाली व इतर प्रकारचीं वस्त्रें करण्याविषयीं प्राचीनकाळापासून यांची प्रख्याति आहे. परंतु यंत्रें नसल्यामुळें हीं तयार करण्यास मेहेनत फार पडत्ये; यामुळें यांचा व्यापार जितका व्हावा तितका होत नाहीं. एथें तंबाकू पुष्कळ होतो; व त्याच्या चांगल्या विड्या करतात.

हिंदुस्थानांतील लोक **हिंदू** व **मुसलमान** असे दोन जातींचे आहेत असें ह्मटल्यास चिंता नाहीं. याशिवाय दुसऱ्याजातीं-चे अनेक लोक एथें येऊन राहिले आहेत, परंतु त्या सर्वांवि-षयीं एथें सांगणें अशक्य. या दुसऱ्या पैकीं सर्वांत फार व वजनदार असे इंग्रेज आहेत. यांचे हातांत राज्य आहे, परंतु एथील हवा त्यांचे प्रकृतीस मानत नसल्यामुळें ते एथें बहुधा घरें दारें करून राहत नाहींत.

हिंदू हे जरी एथील अगदीं प्रथमचे राहणारे लोक नव्हत, तथापि इतिहासामध्यें यांचेंच वर्णन प्रथम आढळतें. यांचा प्राचीन इतिहास जरी आपणाला फार थोडा माहित आहे, तरी त्या थोडक्या वरून असें कळतें कीं, एका कालीं सर्व एशियांत, यहुदी लोक खेरीज करून, हे मोठे सुधारलेले, सुखी व प्रौढ दशेस आलेले लोक होते. युरोपांत जे मोठे प्रख्यात लोक झाले ते उदयास येण्याच्या पूर्वीं, हे लोक दगड कोरणें, शिल्पविद्या व कवि-

ना यात, यांच्या आसमतांतील इतर लोकापेक्षा, फारच शाहाणे होते. परंतु यादेशाचें ठिकाण इतर देशापासून एकीकडे आहे, व या लोकाच्या सर्व रीतिभाती व स्वभाव इतर लोका बराबर मिसळण्या सारखा नाहीं, येणेकरून त्याबरोबर यांचा व्यवहार फारसा राहिला नाहीं; आणि हे जसे होते तसेच राहिले. प्राचीन काळीं हा देश पाहिलेला कोणी परकी मनुष्य आता येऊन जर पाहील, तर ज्या ज्या गोष्टी पूर्वी होत्या त्याच गोष्टी तशाच अद्याप आहेत असें त्याला दिसेल. परकी लोकानीं जें याचें पूर्वी वर्णन करून ठेविलें आहे तें अद्यापि तसेंच नजरेस येतें. जेथें कांहा फारफेर झाला आहे तो किंबहुना वाईटच झाला आहे.

यालोकात थोड्या, मोठ्या व पुष्कळ किरकोळ जाती झालेल्या आहेत; या जाती फार प्राचीन काळापासून आहेत. जे अनेक व्यवहार मनुष्यें एकमेकांच्या उपजीवनासाठीं किंवा सौख्यासाठीं करतात, ते सर्व एकेकाच्या जातीमध्यें राहिले आहेत, तेणेकरून याच्या कामात सुधारणा होत नाहीं; परंतु हें सर्व पालटण्यास आलीकडे आरंभ झाला आहे.

मुसलमान प्रजेपैकी बहुतेक प्रजा, इराण व अफगाणिस्थान एथून जे मुसलमान राजे हिंदुस्थानावर स्वाऱ्या करीत गेले, त्यांजबराबर जे लोक होते, त्याचीं वंशज, अगर त्या राजांची वंशज आहे. या लोकानी बहुतकरून सर्व देश आपल्या अमलांत आणून मोठें राज्य स्थापन केलें, आ. त्याची उत्तर हिंदुस्थानात दिल्ली ही राजधानी होती.

साम्प्रत यादेशाचें राज्य इंग्रेज लोकाच्या हातीं आहे. या राज्यातील सर्व हुद्याच्या जागा, जमाबंदी व न्याय करण्याची व्यवस्था, व इतर सर्व कारभार त्याचे हातीं आहे; व हें सर्व राज्य त्रि-

लायलेची जी राणी आहे तिच्या राज्याचा एक भाग आहे. परंतु तें आरंभीं त्या देशातील एका व्यापारी मंडळीनें मिळविलें-

या सर्व राज्याचे पांच मोठे इलाखे केले आहेत ते गवरनर व लेफतिनंतगवरनर याचे अमलाखालीं ठेविलेले आहेत. यां खेरीज कांहीं मोठाले प्रांत कमीशनर ह्मणून मोठे हुद्देदार आहेत त्यांच्या ताब्यात आहेत. बंगाल, वायव्यप्रांत, व पंजाब एथे लेफतिनंतगवरनर आहेत; मद्रास आणि मुंबई एथें गवरनर आहेत; अयोध्या, निजामाकडून कर्जाबद्दल मिळालेला मुलूख, नागपूर, सिंध, व बंगालच्या पूर्वेकडील पेगू व तेनासेरिम वगैरे प्रांतात कमिशनर आहेत. एकदर सर्व राज्यावर गवरनर जनरल आणि वाईसराय ह्मणून एक मोठा हुद्देदार आहे. वाईसराय व गवरनर याना मसलत देण्यासाठीं कौंसलदार आहेत.

प्रांतांतील कच्चा कारभार करण्यांस कलेकतेर व माजिस्त्रेत अगर यांजसारखे दुसरे हुद्देदार नेमले आहेत. न्याय करण्यास न्यायाधीश किंवा जज्ज आहेत, या सर्वांच्या मदतीस नवीन आलेले तरूण इंग्रेज लोक ठेविले आहेत. प्रत्येक कलेकतराचा एका लहान परगण्यावर अमल असतो. त्या परगण्याचे कित्येक भाग करून त्यांवर एतद्देशीय कामगार नेमले आहेत, त्यांस तेहेशिलदार अथवा मामलेदार असें ह्मणतात; व त्याच्या हाताखालीं प्रांताच्या विस्तारा प्रमाणें अगर जमाबंदी प्रमाणें दुसरे लहान कामगार ठेविले आहेत. या प्रांतांखेरीज पुष्कल लहान लहान जाहागिरी व संस्थानें वगैरे आहेत, तीं एतद्देशीय लोकाच्या ताब्यात आहेत ते इंग्रेज सरकारास कांहीं खंडणी देऊन आपले ताब्यातील वसूल वगैरे आपणच करतात.

इंग्रेजांच्या राज्यांत **कलकत्ता**, **मद्रास** व **मुंबई** हीं तीन मुख्य शहरें आहेत. कलकत्ता हें गंगेच्या पश्चिमेकडील तिच्या **हुगळी** नामक शाखेवर समुद्रापासून सुमारें पंनास कोशावर आहे. मद्रास पूर्वकिनाऱ्यावर दक्षिणेस आहे. मुंबई पश्चिम किनाऱ्यावर उत्तरेकडे त्याचनावाच्या एका बेटावर आहे.

वर सांगितलेल्या राज्याखेरीज पुष्कळ राज्यें इंग्रेजांचे आश्रया खालीं आहेत; व **नेपाळ** आणि **भुतान** हीं अगदीं स्वतंत्र हीं आहेत. आश्रयाखालचे राज्यांत काहीं मुसलमान व काहीं हिंदू राजे आहेत. यांच्यादरबारीं इंग्रेजाकडील एक एक **रसिदेंत** असतो. अशा प्रकारच्या राज्यांतील मुख्य **हैदराबाद** अथवा **निजामाचें राज्य**, **ग्वाल्हेर** अथवा **शिंद्यांचें राज्य**, **महिसूर**, **त्रावणकोर**, **काश्मीर** आणि **गुजरात** अथवा **गाइकवाडाचें राज्य** हीं आहेत.

पूर्वीं या देशांत फ्रेंच याचा पुष्कळ अमल होता. त्यांचे ताब्यांत अद्याप यःकश्चित् काहीं ठिकाणें आहेत. त्यांत मद्रासेच्या दक्षिणेस **पांदेशरी** हें मुख्य आहे. याशिवाय कलकत्या जवळ **चंद्रनगर**, **राज्यमंद्रि** परगण्यांत **यानाम**, **तंजावरांत** **कारीकल** आणि पश्चिम किनाऱ्यावर **तेलीच्यरीजवळ** **महो** हीं आहेत.

मद्रास व मुंबई इलाख्यांच्या सीमेशीं पश्चिम किनाऱ्यावर **गोवें** हें **पोर्तुगाल** लोकाचें आहे. पूर्वीं हें यालोकाच्या या देशातील संस्थानाचें मुख्य शहर व व्यापाराचें मोठें ठिकाण होतें. परंतु आता यापसून त्यालोकास विशेष फायदा होत नाहीं. मुंबईच्या उत्तरेस **दमण** आणि गुजरातेजवळ एका लहानशा बेटांत **दीव** हीं ही त्याच्याच ताब्यांत आहेत. [ आ-

विंध्याद्रि पर्वतानें हिंदुस्थानाचे दोन भाग झाले आहेत, असें जरी आह्मी वर सांगितलें आहे, तथापि कित्येक भूगोल लिहिणारे याचे चार भाग करतात; ते असे; **उत्तरहिंदुस्थान** ह्मणजे अगदीं उत्तरेकडील भाग, **मध्यहिंदुस्थान** ह्मणजे **गंगा** व **सिंधुनद** यांच्या किनाऱ्यावरील सपाटीचा प्रांत, **दक्षिण** ह्मणजे विंध्याद्रि पर्वत व कृष्णा नदी यांमधील प्रदेश. आणि **दक्षिणहिंदुस्थान.** हे चार भाग मानले असतां, कच्चें वर्णन करण्यास सुलभ पडेल ह्मणून पुढील वर्णनामध्यें तसेच मानले आहेत.

## उत्तरहिंदुस्थान.

यामध्यें हिमालयाच्या पायथ्याजवळ, **बुतान**, **सिकीम**, **नेपाळ**, **कमाऊन**, **गरवाळ**, **सिरमूर** आणि **काश्मीर** हे परगणे आहेत, व यांत कांहीं त्या पर्वताचा भागही येतो.

**बुतान** हें बंगालच्या उत्तरेस एक लहानसें डोंगरी राज्य आहे. येथील राजास देवराज ह्मणतात. त्यावर इंग्रेजांचा अम्मल अगदीं नाहीं. येथील लोक बळकट आहेत. हे कृषिकर्म करण्यामध्यें फार मेहेनत घेतात, आणि यांचा व्यापार **बंगाल** व **तिबेट** या बरोबर पुष्कळ चालतो. यांतील राजधानीचें नाव **तासीसुदन**, हें पश्चिमे कडे आहे.

**सिकीम** हें बुतान व नेपाळ यांणीं बहुत करून वेष्टिलेलें एक लहानसें राज्य आहे. हिमालयाचीं कांहीं कांहीं उच्च शिखरें यांत आहेत. एथील राजा इंग्रेजांचे आश्रया खालीं आहे. सिकीम हीच एथील राजधानी **तमलांग** एथें राजा राहतो. **दारजलिंग** एथील हवा फार चांगली आहे सबब बंगाल्यामधून पुष्कळ युरोपियन लोक एथें [illegible] राहतात.

**नेपाळ** सिकीमाच्या पश्चिमेस आहे. ही एक लांब, अरुंद व डोंगरी जमीनीची पट्टी आहे. येथील राजा इंग्रजापासून अगदीं स्वतंत्र आहे; व त्याचे मुलखांत जे अनेक लहान लहान रजवाडे आहेत त्यांजवर याचा पूर्ण अधिकार आहे. एथील लोक निरनिराळ्या जातींचे व बळकट आहेत; त्यांत **गुरखे** हे मुख्य असून मोठे शूर आहेत. राजाही यापैकींच आहे. एथील सखल जमीन हिमालयाच्या पायथ्यापासून **अयोध्या** व **बहार** पर्यंत पसरली आहे. हींत उत्पन्न चांगलें होतें; आणि उंच ठिकाणच्या खोऱ्यामध्यें गहूं वगैरे थंड हवेंतील जिन्नस होतात. एथील अरण्यें दाट व मोठीं आहेत.

नेपाळांतील मेंढ्याची जात चांगली आहे. **तिबेटामध्यें** जाण्याच्या पहाडी वाटांवरून ओझीं वाहाण्यास यांना लावतात.

**काठमांडू** हें येथील मुख्य शहर. याच्या पश्चिमेस **गुरखा** शहर आहे. हीं पूर्वीं गुरखे लोकांची राजधानी होती. **मकवानपूर** ह्मणून एक शहर आहे, तेथें इंग्लिशांची व नेपाळी लोकांची मोठी लढाई झाली होती.

**कमाऊन** हा नेपाळच्या पश्चिमेस लहान व फार डोंगरी मुलुख आहे, हा इंग्रजांच्या ताब्यात आहे. एथें चहा चांगला होतो व आपोआपही रुजतो. एथील मुख्य शहराचें नाव **आलमोरा** आहे,

**गरवाळ** अथवा **श्रीनगर** हा प्रांत कमाउनाच्या ईशान्येस व पूर्वेस आहे. याचा दक्षिण भाग ज्यास **देरादून** असें ह्मणतात, तो पिकाऊ आहे. याखेरीज बाकी सर्व प्रांत खडकाळ, डोंगरी व भणभणीत असा आहे. याची पूर्वींची राजधानी **श्रीनगर** होती, परंतु आतां **बगाहत** ही आहे. **देरादून** खेरीजकरून बाकी सर्व प्रांत एका राजाच्या स्वाधीन आहे.

**लांडूर** आणि **मिसूरी** हीं हिमालयामधील फार चांगल्याहवेचीं ठिकाणें आहेत. तेथें पुष्कळ **युरोपियन** लोक येऊन राहतात.

**गंगा** आणि **यमुना** या दोन नद्यांचा उगम **गरवाल** प्रांतांत आहे.

यांच्या पश्चिमेस **सिरमूर** ह्मणून एक परगणा आहे, तो एका राजाकडे आहे. त्याची राजधानी **नहान** शहर आहे.

**सिमला** नामक जें चांगल्या हवेचें प्रख्यात ठिकाण तें या परगण्यात आहे. हें समुद्रापेक्षां ७८६६ फूट उंच आहे. एथें फार **युरोपियन** लोक येऊन राहतात.

**काश्मीर** ही एक पंजाबाच्या उत्तरेस पिकाऊ खिंड आहे. तेथील हवा व ठिकाण सर्व हिंदुस्थानामध्यें उत्कृष्ट आहे असें ह्मटल्यास चिंता नाहीं. ती नेहमी समशीतोष्ण असत्ये, व तींत फळें आणि पुष्पें विपुल होतात; त्यांत गुलाबतर फारच चांगला होतो.

ही सर्व खिंड उंच पर्वतांनीं वेष्टिलेली आहे, व प्राचीन काळच्या एका सरोवराचा हा तळ होता असें दिसतें. पर्वताच्या बाजू तरतऱ्हेच्या झाडांनीं व दाट रानानीं आच्छादलेल्या असतात. या रानांत अक्रोडाचीं झाडें फार आहेत.

काश्मिरी लोक चिटें व दुसरीं वस्त्रें विणण्यांत कुशळ आहेत; व तिबेटांतील मेंढ्याच्या लांब व रेशमासारख्या लोंकरी यांच्या शाली विणण्यात त्यांची प्रख्याती विशेष आहे. एथील स्त्रिया गोऱ्या व सुंदर आहेत. यातील राजधानीस **काश्मीर** अथवा **श्रीनगर** ह्मणतात. हें **जहिलम** नदीजवळ अनेक सरोवरांचे मध्यें आहे. यांत चमत्कारिक तरते बाग आहेत. ते असे कीं लाकडाच्या त[illegible]ड्या बांधून त्य[illegible]तात, आणि तींत कलिंगडाचे वगैरे

बेळ लावून त्या ताट्या सरोवरांत सोडल्या ह्मणजे ते खालच्या द्र-वाशानें वाहतात. याच नदीच्या काठीं याच्या उत्तरेकडे इस्लामबाद आहे. एथें कृनीनें केलेल्या जिनसा पुष्कळ होतात.

या सुंदर देशामध्यें दिल्लीचे मुसलमान बादशाहा उष्णकाळीं येऊन राहत असत. येथें मुख्यत्वें करून शीक लोक राहतात.

## मध्यहिंदुस्थान.

यांत पंजाब, दिल्ली, मिरत, रोहिलखंड, आग्रा, प्रयाग, काशी, अयोध्या, बाहार, बंगाला, अजमीर, सिंध, कछ, आणि गुजरात, हे प्रांत आहेत.

पंजाब हा हिंदुस्थानाच्या वायव्येस मोठा प्रांत आहे. पंज (अथवा पंच) पांच, आणि आब (अथवा आप) पाणी या दोन शब्दावरून यास हें नाव पडलें आहे. कारण जहिलम, चिनाब, रावी, बिआ अथवा ब्यास आणि सतलज ह्या ज्या सिंधु नदाच्या पांच मुख्य शाखा त्या यामधून जातात.

याचे उत्तरेकडील भाग डोंगराळ अथवा खडकाळ आहेत. परंतु खालचाभाग पिकाऊ व सपाट आहे; आणि हिंदुस्थानांत होणारे साधारण जिन्नस यांत होतात. जहिलम आणि सिंधु यांचेमध्यें वायव्ये कडेस खाणींचें मीठ निघतें.

पंजाबांत पुष्कळ जातीचे लोक राहतात, त्यांत शीक हे मुख्य यांणीं गेल्या शतकाच्या मध्याच्या सुमारास एथें वर्चस्व मिळवून एक बळाढ्य राज्य स्थापन केलें. यांणीं लाहोर ही आपली राजधानी केली होती. अमृतसर हें यांचें पवित्र स्थान आहे; मुलतान व याच्या दक्षिणेस भावलपूर ही यांत दुसरी मोठीं शहरें आहेत.

सिंधुनद व **सोलिमान** पर्वत यांजमध्यें एक जमीनीची लांब चिरटोळी आहे; तीही पंजाबाचाच भाग असें मानलें आहे व ती इंग्रेजांचेच ताब्यांत आहे. याच्या दक्षिणभागास **देराजात** व उत्तर भागास **पेशावर** असें ह्मणतात. याचें मुख्य शहर **पेशावर** आहे. त्याच्या दक्षिणेस सिंधुनदाच्या कांठीं **कालाबाग** ह्मणून एक फार चमत्कारिक शहर आहे. **क्षीर** ह्मणून जो उंच पर्वत आहे त्यांतून हा नद एथें वाहत येतो. या पर्वताच्या दरी लाल भडक माती व सैंधव याच्या आहेत. त्या दरी खणून एकावर एक अशा उंच रांगा करून त्यांवर गांव वसलेला आहे, व रस्ते ही सैंधव फोडून केलेले आहेत.

पंजाबाच्या आग्नेयीस **दिल्ली** प्रांत आहे. हा पश्चिमेच्या अंगाला ओसाड व वालुकामय आहे; परंतु बहुधा जिकडे पाण्या चे कालवे आहेत तिकडे बराच पिकाऊ आहे. यमुना नदी या मधून वाहते. एथील मुख्य शहर **दिल्ली** हें या नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे. पूर्वीं हीं मुसलमानी राज्याची राजधानी होती. हल्लीं येथे शाली व जवाहीर चांगलें होतें. या शहराच्या भरभराटीचे काळीं तयार झालेलीं कामें अजून पुष्कळ नजरेस पडतात. त्यांपैकीं **जुमामस्जिद**, **हुमायून** (बादशाहाची कबर) व **कुतुबमिनार** ह्मणून एक २६० फूट उंचीचा फार चांगला व डोलदार मनोरा हीं मुख्य आहेत. याचे शिखरांवर संगमरवरी दगडाचा घुमट आहे. या शहरांत मागील बंडामध्यें शिपायांनी पुष्कळ युरोपियन लोक, त्यांच्या स्त्रिया व मुलें यांची निर्दय पणें कत्तल केली. **हस्तनापूर** ह्मणून जें हिंदूचें प्राचीन काळचें शहर तें हेंच.

**पानपत** दिल्लीच्या उत्तरेस आहे. एथें सन इसवी १५२८

त एक व १७६१ यामध्यें एक अशा दोन प्रख्यात लढाया झाल्या. **मिरत** हा प्रांत दिल्लीच्या जवळ आहे. एथील मुख्य शहर **मिरत**, येथें मागील बंडांत **युरोपियन** लोकांस येथील तीन बंगाली पलटणींनीं मारिलें. **हरिद्वार** येथून **गंगा** पर्वतांतून बाहेर निघत्ये आणि तेथून मोकळी वाहूं लागत्ये. या ठिकाणीं वर्षास मोठी जत्रा भरत्ये. **रुर्की** येथें इंजनेर काम शिकविण्यासाठीं सरकारानें एक मोठें विद्यालय स्थापिलें आहे.

**रोहिलखंड** गंगेच्या पूर्वेस आहे हा व मिरत हे दोन्ही प्रांत पूर्वीं दिल्लीमध्येंच मोडत असत. याचें मुख्य शहर **बारेली**; येथें लांकडी व धातूचें सामान चांगलें होतें.

**आग्रा** प्रांत दिल्ली व रोहिलखंड यांच्या दक्षिणेत आहे. यामधून गंगा, **यमुना** व चंबळा अथवा **चमेली** या नद्या जातात. पहिल्या दोहोंमधील मुलखास **दुआब** किंवा **अंतर्वेद** असें ह्मणतात. (दु, दोन आणि आब, पाणी). सुकी जमीन जी धान्यास लागत्ये ती बहुधा येथें पेरतात, नीळ, तंबाकू, सातू आणि गहूं ही पिकें पुष्कळ होतात.

यमुनेच्या कांठीं **आग्रा** येथें पूर्वीं लेफ्टनेंट **गवरनर** राहत असे; परंतु त्याचें ठाणें आतां **प्रयाग** येथें गेलें आहे. **शाहाजान** बादशाहानें आपली प्रियकर राणी **नूरमहल** इच्या कबरेवर एक संगमरवरी दगडाची इमारत एथें बांधली आहे, ती सर्वोत्कृष्ट आहे. इच नाजूक कारीव काम, सुंदर स्तंभवगैरे फारच पाहवा करण्या सारखे आहेत इची बरोबरी करण्यास सर्व पृथ्वींत इमारती फारशा सांपडणार नाहींत. आग्र्याचे जवळ तीनकोशांवर **शिकंदरा** एथें **अकबर** ह्मणून जो सर्व दिल्लीच्या बादशाहापैकीं उत्तम बादशाहा याची कबर आहे. तीही संगमरवरी दगडाची

असून उत्कृष्ट आहे. मथुरा जी हिंदूंची प्राचीन नगरी ती याचे उत्तरेस यमुनेवरच आहे.

भरतपूर आग्र्याच्या पश्चिमेस सत्रा कोश आहे. हें एका लहान हिंदू राजाचें मुख्य शहर आहे. एथें पूर्वीं फार मजबूद किल्ला होता, तेथें इंग्रेजांचा मोठा पराजय झाला; परंतु शेवटीं त्यांनीं तो फार मेहेनतीनें सनइसवी १८२६त घेऊन मोडून टाकिला.

प्रयाग (अलाहाबाद) हा हिंदुस्थानांतील एक फार पिकाऊ व सुखी प्रांत आहे. गहूं, कापूस नीळ, ऊंस, व अफू हे जिन्नस एथें फार उत्पन्न होतात. बहुतेक प्रांत सपाट आहे; परंतु बुंदेलखंडाकडे ह्मणजे दक्षिणेस व नैर्ऋत्येस डोंगरी आहे. प्रयाग व कानपूर हीं दोन यांतील मुख्य शहरें आहेत. प्रयाग, गंगा व यमुना यांच्या संगमाजवळ आहे. हें स्थान हिंदूलोक फार पवित्र मानतात. कानपूर हें उत्तरेस गंगेवर आहे. प्रयाग एथें सांप्रत वायव्यप्रांताचा लेफ्टिनेंटगवरनर राहतो.

काशी ही फार पिकाऊ परगणा आहे. यामधून गंगा वाहत्ये. खसखस (ज्यापासून अफू होत्ये) नीळ व गहूं हीं एथें फार उत्पन्न होतात. या प्रांतांतील बहुतेक शहरांत सन्नेजा, मलमल व इतर कापसाचीं वस्त्रें यांचे कारखाने फार चालले आहेत. काशी जीस पुराणांतरीं वाराणशी आणि मुसलमानीन बनारस असें ह्मणतात ती यांतील मुख्य शहर आहे. हें हिंदू धर्माप्रमाणें सर्व क्षेत्रांत पवित्र आहे. एथें वस्ती पुष्कळ आहे, परंतु ही सदोदित सारखी नसत्ये. कारण, इतर प्रांतांतून यात्रेकरू एथें फार येत असतात. एथील रस्ते अरुंद व मलीन आहेत. गंगेच्या कांठीं दोहीं बाजूस मोठे मोठाले व लांब लांब घाट आहेत, त्यांवर सर्वकाळ हीं माणसाची दाटी असत्ये.

काशिजवळ च्यूनार ह्मणून उच खडकावर बांधलेला किल्ला आहे. मिरझापूर एथें व्यापार फार होतो.

अयोध्याप्रांत, अलाहाबाद व काशी यांच्या उत्तरेस आहे. हा पिकाऊ आहे, व यांत पाणी पुष्कळ आहे. भात, गहूं, नीळ व अफू हीं एथें चांगलीं पिकतात. येथील मुख्य शहर लखनौ हें गोमती नदीच्या कांठीं आहे. याच्या पूर्वेस अयोध्या व फैजाबाद ह्या (पूर्वीच्या राजधान्या) आहेत.

बहार यामधून गंगा व तिला मिळणाऱ्या नद्या वाहतात. हा प्रांत उत्तरेस सपाट व दक्षिणेस आणि पूर्वेस डोंगरी असून फार पिकाऊ आहे. खसखस, गहूं, नीळ, ऊंस व भात हे जिन्नस यांत होतात; परंतु खसखस विशेष होते. एथें गुलाबी वगैरे पुष्कळ प्रकारचीं अत्तरें काढतात, व चांगला सोरा ही तयार करतात, कापसाचीं वस्त्रें हीं एथील लोक काढून विकतात.

एथील मुख्य शहर पाटना. येथें इंग्रेजांच्या राज्याच्या आरंभीं पुष्कळ लढाया झाल्या. बक्सार येथें मीरकासीम व इंग्रेज यांजमध्यें मोठी लढाई झाली. गया जें हिंदूचें मोठें यात्रेचें स्थान, आणि मोंघीर जें मीरकासीम याचें मुख्य शहर होतें तें अशीं या प्रांतात आहेत.

बंगालप्रांत बंगालच्या उपसागराचे उत्तरेस आहे. यामधून गंगा, ब्रह्मपुत्रा व त्यांस मिळणाऱ्या नद्या वाहतात. गंगेला एथें पुष्कळ फांटे फुटतात, व ती जसजशी समुद्राजवळ जाते तसतसे हे फाटे अधिकाधिक होत जातात. या फांट्याच्या मध्यें पुष्कळ दलदलींचीं बेटें झालीं आहेत, त्यांना सुंदरबन असें ह्मणतात. हा बहुतेक प्रांत एक मोठें मेदान आहे, आणि नद्यांमधून वाहून आलेली माती एथें जमल्या मुळे तें फार पिकाऊ झा

आहे. भाताचें यात मुख्य पीक होतें. नीळ, अफू, कापूस, ऊस व तंबाकू हींही होतात. एथें रेशीम तयार करतात; आणि रेशमी किड्यास खाण्या साठीं तुतीचीं झाडें सर्व देशभर लावतात.

हिंदुस्थानाची राजधानी **कलकत्ता** ही या प्रांतात **हुगळी** ह्मणून गंगेचा जो फांटा त्याच्या पूर्व किनाऱ्यावर आहे. याची लांबी सुमारें अडीचकोस होईल, व एथें सर्व जातींचीं मिळून चार लक्षांहून जास्ती वस्ती आहे. ही **हिंदुस्थान** व **बंगाला** एथील सरकारच्या गादीची जागा आहे. **गवरनरजनरल** साहेब एथें राहतात. सर्व हिंदुस्थानांत सांप्रत एथें विशेष व्यापार होतो.

कलकत्याच्या जवळ पुष्कळ शहरें आहेत; त्यात **शिराम-पूर** (पूर्वीचें डच लोकांचें) हें मोठें आहे. **मुरशिदाबाद** ही पूर्वीची **बंगाल्याचानबाव** याची राजधानी. एथें अजून ही पुष्कळ जिनसाचे कारखाने आहेत. यापासून कांहीं अंतरावर **प्लासी** हें खेडें आहे. एथें **कर्नल** (पुढें **लार्ड**) **क्लाईव** याणें बंगाल्याचा नबाब **सुराजउद्दवला** याच्याशीं लढून सनइसवी १७५७त जूनच्या तेविसाव्या तारखेस मोठा जय मिळविला; तेव्हापासून हिंदुस्थानातील इंग्रेजांचे राज्याचा आरंभ झाला. **कासिमबाजार** रेशमी जिनसा विषयीं प्रख्यात आहे. याच्या पूर्वेस **धाका** एथें पूर्वीं सर्वोत्कृष्ट मलमल होत असे; परंतु ती आता तितकी चांगली होत नाहीं.

**चितेगांग** हें बंगाल्याच्या आग्नेयीस बंदर आहे. एथें मिठाचा व लांकडाचा पुष्कल व्यापार होतो.

**माळवाप्रांत** हें एक उंच मैदान आहे. एथील हवा थंड सुखावह आहे. यात **शिंदे**, **होळकर** व **भोपाळचानबाब** हांचीं राज्यें आहेत. यापैकीं **शिंद्यांचा** मुलूख पुष्कळ आहे. हा-

प्रांत फार पिकाऊ आहे. एथें तबाकू, कापूस व अफू हे मुख्य जिन्नस होतात. शिंद्यांचें राज्य **माळवा, आग्रा** व **खानदेश** या प्रांतांमध्यें आहे. याची राजधानी **ग्वाल्हेर.** एथें एक मजबूद किल्ला आहे. **उज्जनी** अथवा **अवंती** हें प्रांत फार प्राचीन शहर आहे. **विक्रम** ह्मणून जो पूर्वी प्रख्यात हिंदू राजा होऊन गेला, तो एथें राहत असे व एथें **महांकाळेश्वर** ह्मणून एक ज्योतिर्लिंग आहे.

होळकर **इंदूर** एथें असतो. **महिदपूर** उज्जनीच्या उत्तरेस होळकर याच्या मुलखांत आहे. इंदूराजवळ **महु** एथें मोठी छावणी आहे.

**भोपाळचें** राज्य लहान आहे व तें इंग्रजाचे आश्रया खालीं आहे. यातील मुख्य शहरास **भोपाळच** ह्मणतात.

**अजमीर** ह्मणजे **रजपूतस्थान** हें माळव्याच्या वायव्येस आहे. यांत कांहीं डोंगरी मुलूख व कांहीं वाळवटें आहेत, तथापि एथें पाणी पुष्कळ आहे. हिंदुस्थानांतील जें मोठें रेतीचें मैदान तें यातच आहे; ह्मणून हा प्रांत पश्चिमेस व उत्तरेस भणभणीत व वालुकामय आहे; परंतु दक्षिणेस व पूर्वेस बराच पिकाऊ असून एथें बरीच वस्ती आहे. उन्हाळ्यामध्यें वाळवेच्या मैदानांत आगी सारखा वारा सुटून रेती वर उडत्ये, तेणेंकरून यांतून जाणें येणें बहुधा अशक्य होतें. यात कोठें कोठें भिकार खेडीं आहेत.

एथील लोक बहुत करून **रजपूत** व **जाट** हे आहेत. रजपूत लोक सर्व हिंदुस्थानांतील लोकांपेक्षां चांगले व फार शूर आहेत परंतु जाट हे वाईट आहेत. रजपूत लोकांच्या राज्यकारभाराच्या व व्यवहाराच्या रीतीभाती इतर हिंदूलोकांच्याहून भिन्न आहेत दिल्लीच्या पादशाहास या लोकांस जिंकण्यास फार कठिण गेलें, व ते त्याच्या अमलांत पक्के असे कधींच आले नव्हते.

उदेपूर जोदपूर, जयपूर, जसलमीर, बिकानेर, व कोटा,हीं मुख्य रजपूत संस्थानें आहेत. यांचा एकमेकांशीं संबंध नाहीं, व हीं सर्व इंग्रेजाच्या आश्रया खालीं आहेत.

जयपूर, अजमीर, चित्तूर, उदेपूर आणि जोदपूर हीं या परगण्यांत मुख्य शहरें आहेत. जयपूर हें शांदार रीतीनें बांधलेलें शहर आहे. चित्तूर हें प्राचीन काळीं संपत्तिवान व बळाढ्य असे.

सिंध हा प्रांत सिंधूनदाच्या मुखाजवळ दोहीं बाजूंस आहे. पूर्वेकडे हा सपाट व ओसाड आहे, कारण मोठ्या रेतीच्या मैदानाची सीमा याच्या पूर्वेकडील भागास येऊन मिळत्ये. परंतु नदींस मधून मधून पूर येतो यामुळें तिचे जवळील भाग पिकाऊ आहे. पश्चिमेस बलुचिस्थान याजवळ हा प्रांत डोंगरी आहे. सर्व प्रांताचे उत्तर आणि दक्षिण असे भाग केलेले आहेत. उत्तर भागाची हवा दक्षिण भागापेक्षां थंड आहे.

भात हें यांत मुख्य पीक होतें; परंतु याखेरीज साखु, गहूं, नीळ वगैरे जिन्नस बरेच उत्पन्न होतात.

कराची हें यांत मुख्य शहर आहे. हें सिंधूनदाच्या पश्चिम मुखाजवळ आहे, व एथें व्यापार पुष्कळ होतो. याखेरीज ठठा ऊर्फ नगरठठा, शिकारपूर व हैदराबाद हीं मोठीं शहरें आहेत. उमरकोट एथें अकबर बादशाहा जन्मला.

कच्छ हें द्वीपकल्प सिंधच्या दक्षिणेस रण्ण व कच्छचे आखात यामध्यें आहे. रण्ण हें एक मोठें खाजण आहे. उन्हाळ्यामध्ये हें रेतीचें मैदान व मधून मधून कोंडलेलें पाणी असें असतें व त्या रेतीवर मिठाचा पातळ पापडा धरलेला असतो, परंतु पावसांत हें सर्व जळमय होतें, व कच्छच्या आखाताचा व याचा संबंध होतो.

हें द्वीपकल्प भणभणीत आहे, व यांत पीक बरोबर होत नाहीं. एथें चांगले घोडे होतात, व एके प्रकारचे रानटी गाढव यातील ओसाड भागात आढळतात.

एथील राजास राव असें ह्मणतात, तो इंग्रेजांचे आश्रयाखालीं आहे.

एथील मुख्य शहर भूज हें याच्या मध्यभागीं आहे, व मांडवी हें यांत बंदर आहे. एथून हे लोक आरबस्थान व आफ्रिका यांच्या किनाऱ्याशी व्यापार चालवितात. कच्छ प्रांतात कर्नेलियन ह्मणून सुंदर दगड होतात ते चिनामध्यें फार खपतात.

कच्छचें आखात व खंबायतचें आखात यांमधील काठेवाड हें द्वीपकल्प व हिंदुस्थानांतील त्या जवळील कांहीं भाग मिळून गुजरात प्रांत झाला आहे. काठेवाड डोंगरी व ओसाड आहे; परंतु बाकीच्या भागांत नीळ, भात, कापूस व इतर जिन्नस पुष्कळ होतात. गुजरातेच्या राजास गाइकवाड ह्मणतात. हा इंग्रेजांचे आश्रयाखालीं आहे; व दक्षिणभाग प्रत्यक्ष यांच्याच अमलात आहे. एथील लोक बहुत जातींचे आहेत, त्यांत भिल्ल वगैरे फार रानटी लोक ही आहेत.

गाइकवाडाच्या राज्याचें बडोदें हें मुख्य शहर. इंग्रेजांचे राज्यांत तापीचे मुखाजवळ सुरत हें मोठें शहर आहे, एथें पूर्वी व्यापार फार होता आणि इंग्रेज व पोर्तुगाल या लोकांच्या मोठ मोठाल्या वखारी होत्याः परंतु हा सर्व व्यापार आतां मुंबई एथें आला आहे.

भडोच नर्मदेच्या मुखाजवळ बंदर आहे. सोमनाथ एथें फार प्रख्यात व श्रीमान देऊळ होतें, तें गिझनीच्या महमदानें मोठ्या प्रयत्नानें काबीज करून त्यांतील लिंग फोडून टाकिलें. हें काठेवाडाच्या टोंकाजवळ आहे.

खंबायतच्या आखाताच्या टोंकाशीं खंबायत आहे. खंबायतचा नवाब ह्मणून एक मुसलमान राजा आहे तो एथें असतो.

## दक्षिण.

दक्षिणेंत खानदेश, औरंगाबाद, विजापूर, हैदराबाद, बेदर, वऱ्हाड, गोंडवण, ओढिया व उत्तरसरकार्स हे प्रांत आहेत. बहुतेक मुंबई इलाखा दक्षिणेचा पश्चिम भाग होतो.

खान देशांत इंग्रेज, शिंदा व होळकर यांचीं राज्यें आहेत. इंग्रेजांचें राज्य पश्चिम भागीं आहे. हा फार डोंगरी व ओसाड आहे. यांत द्राक्षें जशीं होतात तशीं हिंदुस्थानांत दुसरे ठिकाणीं कोठें होत नाहींत. सुमारें १०० वर्षांपूर्वीं यांत वस्ती पुष्कळ होती, परंतु आतां ती फार कमी झाली आहे.

यांत बऱ्हाणपूर व हुसंगाबाद हीं दोन मोठीं शहरें आहेत. अशीरगड हा मोठा मजबूद किल्ला आहे. सन इसवी १८१९ त इंग्रेजांनीं मराठ्या बराबर जी लढाई केली तींत हा किल्ला अगदीं शेवटीं जिंकिला. मालेगांव एथें इंग्रेजी छावणी असत्ये; व धुळें ही जिल्ह्याची मुख्य जागा आहे.

औरंगाबादेचा बहुतेक भाग इंग्रेजांकडे आहे व पूर्वेकडील कांहीं निजामाकडे आहे. हा बहुतकरून डोंगरी प्रांत आहे. यांत फळें चांगलीं होतात. यांत औरंगाबाद, दौलताबाद व जालना हीं मोठीं शहरें आहेत. पाहिलें औरंगजेब पादशाहानें वसविलें; एथें त्याच्या मुलीच्या थडग्यावर संगमरवरी दगडांची इमारत बांधली आहे. दुसरा फार अडचणीचा किल्ला आहे. महम्मदतगलख यानें दिल्ली मोडून ही मुसलमानी राज्याची राज-

धानी करण्यास आरंभ केला होता. जालना एथें इंग्रेजांची छावणी आहे.

**विजापूरप्रांत** औरंगाबादेच्या दक्षिणेस आहे. पूर्वी यांत एक बलाढ्य मुसलमानी राज्य होतें. पूर्णे हें यांत मुख्य व मोठें शहर आहे. एथें मोठी छावणी आहे, व हें याच नावाच्या जिल्ह्याचें हुजूर ठिकाण आहे. ही **पेशवे** यांची राजधानी होती. **सातारा** एथें थोड्या वर्षांपूर्वी **शिवाजी** याच्या वंशांतील **मराठा** राजा राहत असे; परंतु आतां एथें इंग्रेजांचे अंमलदार असतात. विजापूर हें पूर्वी मोठें मजबूद व सुंदर शहर होतें; परंतु आता ते मोडलें आहे. यांत कांहीं **मुसलमानी** इमारती उत्कृष्ट आहेत.

**हैदराबाद** हा निजामाच्या राज्याचा मुख्य प्रांत आहे. **निजाम** हा इंग्रेजांचे आश्रयाखालीं सर्वांत मोठा राजा आहे. **हैदराबाद** प्रांत उंच असल्यामुळें एथील हवा बरीच थंड आहे आणि एथें समशीतोष्ण प्रदेशांतील पदार्थ होतात. जमीन पिकाऊ आहे, परंतु राज्यांत स्वस्थता आणि चोर व लुटारू लोकांपासून निर्भयता हीं नसल्यामुळें कृषिकर्म जसें चालावें तसें चालत नाहीं, आणि लोक नेहेमीं हत्यारबंद घराबाहेर पडतात.

यांतील मुख्य शहर **हैदराबाद** हें मोठें आहे, व यांत **मुसलमान** वस्ती फार आहे. रस्ते वाईट रीतीनें बांधलेले, अरुंद व मळीण असे आहेत. यांत बेबंद लोक फार यामुळें नेहेमीं दांडगाई व तंटेबखेडे होत असतात. इंग्रेजी छावणी याच्याजवळ **शिकंदराबाद** व **बोलारम** (अलवाल) एथें असते. रेसिडेंट हैदराबादेजवळच राहतो. **गोवळकोंडें** पूर्वीच्या एका मोठ्या मुसलमानी राज्याची राजधानी ही याच्याजवळ आहे. एथें पूर्वी हिरे फार सांपडत असत, व अजून ही कांहीं सांपडतात.

बेदर हैदराबादेच्या दक्षिणेस व पश्चिमेस आहे. हा प्रांत निजामच्या राज्यात आहे. हा डोंगरी व ओसाड आहे. यांत वस्ती थोडी आहे, आणि शेतीभाती फार हयगयीची होते. यांतील मुख्य शहर बेदर याचें महत्व आलीकडे गेलें आहे, परंतु तेथें अजून पोलादी सामान व मिन्याचें काम फार चांगलें होतें.

वऱ्हाड सन १८५४ पर्यंत निजामाकडे होतें, परंतु तेव्हापासून इंग्रेजांनीं कर्जाबद्दल आपलेकडे लाऊन घेतलें आहे. हा प्रांत डोंगरी आहे, परंतु यांतील खोरीं फार पिकाऊ आहेत. एथें जितका कापूस होतो तितका हिंदुस्थानात दुसरीकडे कोठेंच होत नाहीं.

इलिचपूर हें यांत मोठें शहर आहे. असई एथें इंग्रेजांनीं मराठ्यांवर सन १८०३ त मोठा जय मिळविला. गाविलगड एथें मोठा मजबूत किल्ला आहे, हा इंग्रेजांनीं घेतल्यापासून भोसले याचें स्वातंत्र्य गेलें.

गोंडवण हा मोठा प्रांत वऱ्हाडाच्या पूर्वेस आणि हैदराबादेच्या वायव्येस आहे. महानदी व गोदावरी यांच्या पुष्कळ शाखा यामधून जातात. हा बहुतकरून डोंगरी व रानानें भरलेला मुलूख आहे. गहू व सागवान हें यांतील मुख्य उत्पन्न आहे.

यांतील मुख्य शहर नागपुर हें पश्चिमभागीं असून मोठें आहे; परंतु एथील हवा फार रोगी आहे. इंग्रेजी फौज याचे जवळच कामती एथें असते. नागपूर व कामती याच्यामध्यें सिताबलदी म्हणून एक लहानसा पर्वत आहे, तेथें नागपूरचा आपासाहेब याचा थोड्याशा इंग्रेजी फौजेनें मोठा पराजय केला. यांत गोंड लोक राहातात, व यावरून या प्रांतास गोंडवण असें नाव पडलें. हिंदू येण्याच्या पूर्वी हे लोक व यांजसारखे दुसरे डोंगरा-

त व रानांत राहणारे लोक हिंदुस्थानांत राहत होते असा अद-मास आहे.

ओढिया बंगाल प्रांताजवळ आहे, व त्यांतील बहुतेक भाग त्याच इलाख्यांत जातो. समुद्र किनाऱ्याजवळील भाग खोल व नापीक आहे; परंतु दूरदूरचा प्रदेश पिकाऊ आहे, व त्यांत नद्या पुष्कळ आहेत. पश्चिमेकडे डोंगर व अरण्य फार आहे, व त्यांत रानटी लोक फार राहतात. या अरण्यांतील झाडापासून मौल्यवान लांकडें, चीक व रंगाचे पदार्थ हे होतात.

एथील मुख्य शहर कटक हें महानदीच्या एका फांट्या-वर आहे. सोन्याचें व रुप्याचें फिलाग्री काम एथें सुंदर होतें. याच्या किनाऱ्यावर दक्षिणेस चिलक्याच्या सरोवराजवळ औढ्याजगन्नाथ याचें मोठें स्थान आहे. बेलासोर हें एक लहानसें बंदर आहे.

गंजाम, विझागापट्टन, राजमंद्री, मछलीपटन, आणि गंतूर हे जे मद्रास इलाख्याचे उत्तरेकडील पांच प्रांत त्यास उत्तरसरकार्स असें ह्मणतात. यांत व्यापार फार होतो. तांदूळ व इतर धान्य, कापूस, साखर व तंबाकू हे व्यापाराचे मुख्य जिन्नस आहेत. अस्का, बिमलीपट्टण आणि राजमंद्री एथें युरोपियन लोकाचे साखरेचे मोठे कारखाने आहेत. राजमंद्री परगण्यात चांगला तंबाकू होतो.

विजागापट्टण हें, सुंदर करंडे व चांगलें दिसणारें हस्तीदंती, शाळ शिंताचें व शिंगाचें सामान व सोन्याचें आणि रुप्याचें फिलाग्रीकाम याविषयीं प्रख्यात आहे. हें सामान इंग्लंदांत फार पसंत पडतें. राजमंद्री व मछलीपट्टण परगण्यांत उत्तम कापड व चिटें होतात.

उत्तरसरकार्स इंग्रेजांच्या ताब्यांत आहे, परंतु यामध्यें स्वतंत्र जमीनदार पुष्कळ आहेत. ते इंग्रेज सरकारास कांहीं नियमित कर देतात. या जमीनदारांपैकीं विजानग्रमचा राजा फार मोठा आहे.

उत्तरसरकार्स या मध्यें गंजाम, चिकाकोल, विजगापट्टन, राज्यमंद्री, मछलीपट्टन व गंतूर हीं मोठीं शहरें व कालिंगपट्टन, कोकोनादा आणि कोरिंगा हीं मोठीं बंदरें आहेत.

गोदावरी व कृष्णा या नद्या उत्तरसरकर्स यांतून जातात. गोदावरी सह्याद्री पर्वतात त्रिंबकेश्वराजवळ निघत्ये; आणि औरंगाबाद व बेदर या परगण्यांतून व हैदराबादेच्या उत्तरेकडून जाऊन मोठ मोठाल्या उभ्या कड्यांतून राजमंद्री प्रांतांत येथे. दौलेश्वर येथें हिचे दोन फांटे होतात; तेथें फार मेहनतीनें व कौशल्यानें इतर ठिकाणीं शेतकीला पाणी नेण्यासाठीं तिचा प्रवाह कांहीं अडविला आहे. या पाण्याचे चोंहोंकडे पुष्कळ कालवे नेले आहेत; आणि त्यांपासून आता उत्पन्न पुष्कळ होतें. याच प्रमाणें परंत यापेक्षां लहान असे बेजवारा गांवाजवळ कृष्णेवर धरण बांधलें आहे.

आरबीसमुद्र व सह्याद्रि पर्वत यांच्यामध्यें जी अरुंद गोंव्यापर्यंत जमीनीची पट्टी आहे तिला कोंकण असें ह्मणतात. याचे उत्तरकोंकण व दक्षिणकोंकण असे दोन भाग आहेत. दक्षिण कोंकणातील हवा चागली आहे, व तेथें पाणी पुष्कळ आहे. उत्तरकोंकणात थंडीच्या ऋतूंत ज्वर फार येतो. हा प्रांत फार डोंगरी आहे व जमीन, मुख्यत्वें करून दक्षिण भागाची वाईट आहे. येणें करून लोकजरी शेतकींत फार मेहनत घेतात तरी ते दारिद्री आहेत. एथील उत्पन्नाचा मुख्य जिन्नस भात हें आहे.

मुंबई इलाख्याचें मुख्य शहर मुंबई, हें उत्तर कोंकणांत त्याचनावाच्या बेटांत आहे. एथील बंदर जसें सोईवार आहे तसें सर्व एशियांत दुसरें नाहीं. येणें करून व्यापारास मोठी सोय पडते. हिंदुस्थानाच्या आरमाराचें मुख्यठिकाण हेंच आहे. एथें पुष्कळ गोद्या आहेत, त्यांत मोठ मोठालीं तारवें बांधतात व नीट करतात. यात पारशांची वस्ती फार आहे, व त्यात मोठ मोठाले श्रीमन्त व्यापारी आहेत. सर्व हिंदुस्थानात कलकत्याचे खालोखाल मुंबई हें व्यापाराचें मोठें ठिकाण आहे, व कांहीं दिवसांनीं त्याच्याही पेक्षां जास्ती होईल असा अदमास आहे.

मुंबईच्या जवळ **घारापुरी** ह्मणून एक लहानसें बेट आहे, तेथें व साष्टीबेटात **कानेरीस** एथें फारच चमत्कारिक कोरिव-लेणीं आहेत. त्यामधील मूर्ती फारच विशाळ आहेत. याच प्रकारचीं लेणीं दौलताबादेजवळ **वेरुळास** व त्याच्या उत्तरेस सुमारें पंचवीस कोशावर **अजंटा** एथें व आणखीं कित्येक ठिकाणीं आहेत. वेरूळ एथील लेणीं घारापुरीपेक्षां सुंदर आहेत, व अजंटा एथें पूर्वीं रंगाचें काम फार चांगलें केलेलें आहे.

## दक्षिणहिंदुस्थान.

दक्षिणहिंदुस्थानात पुढें सांगितलेले प्रांत आहेत. **कर्नाटक**, निजामाकडून मिळालेला मुलूख, **सालेम**. **कोइंबतूर**, **मलबार**, **कानडा**, **कुर्ग**, **दुआब**, **म्हैसूर**, **त्रावणकोर**, आणि **कोचीन**.

कर्नाटक हें गंतूरापासून तों कामोरीन भूशिराचे जवळ जवळ आहे. यांत **नेलोर**, **उत्तरअरकाट**, **चिंग्लिपट**, **कडलोर** अथवा **दक्षिणअरकाट**, **त्रिचनापली**, **तंजावर**, **मदूरा** व **तिनावेली** हे परगणे आहेत. हा दक्षिण हिंदुस्थानाच्या पूर्व किनाऱ्या-

वर फारच पिकाऊ प्रदेश आहे. तंजावर खेरीजकरून ह्या प्रांतांत बहुतकरून मोठ मोठाले तलाव व हौद बांधून त्यांत पाणी जमवून त्यावर भात पिकवतात. तंजावरांत पाण्याचे पाट नेलेले आहेत. हा परगणा या सगळ्या प्रांतांत सुखी आहे.

**ओंगोल** व **नेलोर** हीं दोन नेलोर परगण्यात मोठीं शहरें आहेत. एथें व **गंतूर** याच्या दक्षिण भागांत चांगलीं गुरें होतात. **कुवर** येथें चांगलें कापड होतें; आणि समुद्राकिनाऱ्यावर **कृष्णापटण** व **एसकापिल्ला** यांत मीठ फारचांगलें होतें.

उत्तर अरकाटांत **चित्तूर** हें मुख्यशहर आहे. इंग्रेजी राज्याच्या आरंभीं चित्तूर, **चिंगलीपट** आणि **कदालोर** एथें पुष्कळ लढाया झाल्या.

कर्नाटकच्या नवाबाची प्राचीन राजधानी **अरकाट** ही मद्रासेपासून पस्तीस कोस आहे. एथें सन १७५७ त इंग्रेजांची व **राजासाहेब** याची मोठी लढाई झाली; तींत कपतान क्लाईव याणें मोठें शौर्य दाखविलें. अरकाट पासून एक कोसावर **वलजानगर** एथें मोठा व्यापार चालतो व वस्त्रें चांगलीं होतात.

या परगण्याच्या उत्तरेस **त्रिपेती** हें एक मोठें शहर आहे, त्यांत एक प्रख्यात देऊळ आहे. **नेकेनारी** घाघाटाच्या पायथ्या जवळ **सातगड** एथें उत्कृष्ट नारिंगें होतात.

**मद्रास** बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यावर आहे. एथें जरी व्यापार बहुत होतो व मोठालीं तारवें येऊन उतरतात, तथापि बंदर मुळींच नाहीं, व पावसाळ्यांत सर्व कारोमादल किनारा तारवांस मोठा भयंकर होतो. एथील किल्ल्याचें नाव **सेंतजार्ज** यापासून साडेतीन कोशांवर **सेन्ततामस** **गांव** आहे. हें या इलाख्यांतील तोफखान्याचें मुख्य ठिकाण आहे. याखेरीज चिंगली-

पट व कांजीवरान हीं मोठीं शहरें आहेत. दुसऱ्यांत पुष्कळ मोठालीं सुंदर देवळें आहेत. मावलीपूर एथें पुरातन हिंदुदेवळें व कोरींव लेणीं आहेत.

दक्षिण अरकाटामध्यें चिलंब्रम्ह एथें हीं एक प्रख्यात देऊळ आहे. या परगण्यांत कद्दालोर हें मुख्य शहर आहे. या शहराच्या जवळच सेन्तदेविद किल्ला आहे. हें पूर्वीं इंग्रेजांचें मुख्य ठिकाण होतें. याच्या दक्षिणेस पार्तोनोवो एथें लोखंडाचा कारखाना आहे.

त्रिचनापल्ली हें त्याच नावाच्या परगण्याचें मुख्य शहर आहे. एथें सोन्याचे, रुप्याचे व जवाहिरी दागिने चागले होतात. एथील तंबाकू सर्व दक्षिणहिंदुस्थानांत उत्कृष्ट आहे. या शहराच्या जवळ कावेरी नदीवर धरण बांधलें आहे. एथें या नदीचे पुष्कळ फांटे होतात, त्यातून अगदीं उत्तरेकडच्यास कोलेरून ह्मणतात व दक्षिणेकडच्याचें नाव कावेरीच आहे. या फांट्यांपासून लागवडीस पाणी सर्व प्रांतभर मिळाल्यानें हा प्रांत जितका पिकाऊ झाला आहे तितका दक्षिण हिंदुस्थानांत कोणचाही नाहीं. तंजावर मिआवरं, नेगापट्टम, कोंबाकोनं आणि त्रांकिबार हीं यांत, मुख्य शहरें आहेत.

मथुरा परगणा तंजावरच्या दक्षिणेस आहे. यांतील मुख्यशहर मथुरा; एथें पूर्वीं पांड्यायन वंशाचे हिंदूराजे राज्यकरीत असत. यांत चांगल्या चांगल्या इमारती आहेत. त्यांत त्रिमुला नायकाची चुळती ह्मणून आहे तिचें कोरींव दगडी काम चमत्कारिक आहे.

शिवगंगा आणि रामनद हीं दोन या परगण्यात मोठीं संस्थानें आहेत; आणि पुदुकोटा ह्मणून लहानसें राज्य आहे.

रामेश्वरबेट रामनद संस्थानांत आहे. पलनी ह्मणून मदूरा परगण्याच्या उत्तर भागीं उंच टेंकड्यांची रांग आहे. तिची उंची व हवा निळगिरीच्या जवळ जवळ आहे.

तिनवेली हा कर्नाटकांतील दक्षिणेकडील शेवटचा परगणा; एथें कापूस बराच होतो. एथून जवळच मानारच्या आखातांत मोत्यें सांपडतात. यांत तिनवेली हें मुख्य शहर. पुलमकोटा-एथें छावणी असत्ये व दिवाणी कामगार राहतात.

सिदेददिस्त्रिक्तस् (निजामाकडून मिळालेला मुलूख) यांत बल्लारी आणि कडापा हे परगणे आहेत. टिपूसुलतान मरण पावल्यावर त्याच्या राज्यपैकीं जो मुलूख निजामास मिळाला होता, तो त्याणें पुढें इंग्रेजांस सन इसवी १८०१ त दिला ह्मणून त्याला सिदेददिस्त्रिक्तस् (दिलेला मुलूख) असें नाव पडलें. कडापाच्या उत्तरेस कर्नूल ह्मणून लहानसा परगणा आहे, तोही यांतच धरतात. पूर्वेकडच्या बाजूस हा परगणा डोंगरी आहे, परंतु बाकीचा बहुत करून सपाट आहे. नेलोर व उत्तर अरकाट यांच्या व कडापाच्यामध्यें पूर्वघाट आहे. बल्लारी परगणा बहुधा सपाट आहे.

कडापांत नीळ फार होत्ये, व ती चांगल्या जातीची होत्ये. बलारी व कर्नूल एथें लोंकरीचीं वस्त्रें करतात.

कडापा, बल्लारी आणि कर्नूल हीं यांत मोठीं शहरें आहेत.

पिन्नार आणि तुंगभद्रा या दोन मोठ्या नद्या यांत आहेत. दुसरी सह्याद्रींतून निघालेल्या तुंग आणि भद्रा या दोन मिळून झालेली आहे. ती बलारीच्या उत्तरेकडून जाऊन कर्नूल एथें कृष्णेस मिळत्ये. पिन्नार महिसुरांत नंदीदुर्ग याजवळून निघून प्रथम उत्तर वाहिनी आणि मग पूर्व वाहिनी होऊन कडापा आणि नेलूर यां शहराजवळून जाऊन बंगालच्या उपसागरास मिळत्ये.

**सालेम** परगणा कडापाच्या दक्षिणेस आहे. या दोहों-च्यामध्यें महिसूर आणि उत्तर अरकाट यांचे भाग आले आहेत. याच्या उत्तर भागास बहुधा **ब्रह्ममाहाल** असें ह्मणतात. तो डोंगरी असून पिकाऊ आहे. दक्षिण भाग सपाट आहे. पूर्व घाट याच्या उत्तरेकडून जातो. याच्या उत्तरेस **सेवराय** ह्मणून एक डोंगर आहे, तेथील हवा चांगली आहे. या डोंगराच्या बाजूवर काफी फार चांगली होन्ये. सालेम शहरांत तिख्याचीं हत्यारें फार चांगलीं करतात.

**कोइंबितुर** सालेमच्या नैर्ऋत्येस आहे. हा प्रांत पूर्व व मध्यभागीं खोल व सपाट आहे, परतु दक्षिणेस व पश्चिमेस फार डोंगरी आहे. **अनामली** व **निळगिरी** हे दोन उंच पर्वत एथेंच आहेत. यांच्या पायथ्याशीं व बाजूवर अगम्य व अरण्यरानें आहेत त्यांत पुष्कळ रानटी जनावरें व मौल्यवान झाडें आहेत. बहुत दिवसांपासून निळगिरिवर वस्ती झाली आहे; आणि जे युरोपियन लोक अजारी पडतात त्याची प्रकृति नीट व्हावी ह्मणून त्यांना एथें राहायास पुष्कळ ठिकाणें झालीं आहेत; त्यात उत्तकामंद हे मोठें आहे. याची उंची ७,३०० फूट आहे. दोदाबेता ह्मणून जें सर्वांत उच्च शिखर तें ८,७०० फूटांपेक्षा जास्ती उंच आहे. निळगिरीची हवा सुखावह आहे, व आसमंतातील जल, तृण, वृक्षादि रचना अवर्णनीय आहे.

**मलबार** हिंदुस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे. या किनाऱ्यास मलबारकिनारा असें ह्मणतात. हा प्रांत डोंगरी व खडकाळ आहे, परतु किनाऱ्याजवळ सपाट व वालुकामय आहे यांत पुष्कळ समुद्राच्या पाण्यानें भरलेले लहान लहान ओहोळ आहेत. डोंगरांतून पुष्कळ लहान लहान नद्या समुद्राकडे जात,-

त, त्यामुळे तळाव बांधण्याची गरज लागत नाहीं. **कालिकोट, तेलिच्चरी, पालघाट** व **काननोर** हीं मुख्य शहरें यात आहेत. पोर्तुगाल लोक प्रथम कालिकोटास आले. कोचीचें राज्य ह्मणून एक लहानसें हिंदू राज्य आहे, तथापि कोची बहुत वर्षांपासून इंग्रेजाच्या अमलांत आहे. मलबार किनाऱ्यावर मुंबईच्या दक्षिणेस याचे एवढें दुसरें मोठें बंदर नाहीं.

या प्रांतांत पाऊस फार पडतो, त्यामुळें भात चांगलें व पुष्कळ होतें. तसेंच **आरारूट** ही होतें. **विनाद** तालुक्यात व त्याचे आसपास काफी फार होते. मलबाराहून मिरीं, दालचिनी, आणि दुसरे मसाल्याचे पदार्थ बाहेर जातात. याखेरीज सागवान वगैरे अनेक तऱ्हेचीं लाकडें यात पुष्कळ होतात.

यात अनेक जातींचे हिंदू राहतात; त्यात **नरे** ह्मणून जे आहेत त्यांच्या रीतिभाती फारच विलक्षण आहेत पूर्वी आलेल्या आरब लोकांची संतति, **मोपले** ह्मणून जे रानट व क्रूर लोक तेही यांतच असतात.

**कुर्ग** ह्मणून जो डोंगरी मुलूख तो मलबाराच्या वायव्येस आहे. त्यांत शूर व कणखर असे लोक राहतात. तेथील हवा चांगली आहे ह्मणून खालच्या सपाट प्रदेशातील लोकांपेक्षां त्यांच्या आंगीं शक्ति व हिंमत जास्ती आहे. **मरकारा** हें यात मुख्य शहर आहे.

**कानडाप्रांत** पश्चिम किनाऱ्यावर मलबाराच्या उत्तरेस आहे. याचे उत्तर व दक्षिण असे दोन भाग केले आहेत; व बागलघाट आणि पेंजघाट असे ही दोन केले आहेत हा पिकाऊ असून दाट दाट रानें आहेत. मलबारा प्रमाणें यात नद्या ही फार

आहेत. पर्वतातील देशाची रचना फार भव्य व सुंदर दिसत्ये. उत्तर कानड्यांत **गरसापाचा** धबधबा हा सर्व पृथ्वींत उत्तम आहे, **नायाग्राचा** धबधबा ही याच्या बरोबरीस येऊं शकत नाहीं. **मंगलोर, होनोर,** व **सिरशी** हीं यांत मोठीं शहरें आहेत. एथून **आरबस्थान** व **इराण** या देशाबराबर व्यापार पुष्कळ होतो. तांदूळ, मसाल्याचे पदार्थ, सुपारी, चंदन व अबनूस हे जिन्नस एथून मुख्यत्वें करून बाहेर जातात.

**दोआब** ( कृष्णा व तुंगभद्रा यांमधील देश ) यात काहीं मुंबई इलाख्याचा भाग, आणि पूर्व व पश्चिम **रायच्योर** हे आहेत. यात **बेळगाव** व **धारवाड** हीं दोन मोठीं शहरें आहेत.

**महिसूर** एथें नावाचा हिंदूराजा आहे, परंतु सर्व कारभार इंग्रेजी कामगार करतात. हा उंच प्रदेश आहे, व याच्या दोहों बाजूस पूर्व व पश्चिम घाट आहेत. हा मुलूख उंचसखल आहे, व यांतील हवा चांगली आहे. यांत पूर्वी मजबूत किल्ले बांधलेले होते. महिसुरात सतरंजा व लोकरीचीं वस्त्रें होतात. यांत महिसूर हेंच मुख्य शहर आहे. **श्रीरंगपट्टण** यास सन इसवी १७९९ त इंग्रेजांनीं वेढा घातला होता, त्यावेळीं टिपूसुलतान मरण पावला. **बंगलोर** एथें मोठी फौज आहे, व एथील हवा थंड आहे.

हिंदुस्थानच्या नैर्ऋत्य कोनांत **त्रावणकोरचें** राज्य आहे. तेथील राजा इंग्रेजांचे आश्रयाखलीं आहे. याच्या दक्षिणेस **कन्याकुमारी,** व उत्तरेस **कोची** आहे. मदूरा आणि तिनवेली व हें राज्य यांच्यामध्यें पश्चिमघाट आहे. हा पर्वत एथें फार उंच असून दाट रानानीं भरलेला आहे. बाकीचा देश डोंगरी आहे, परंतु खोऱ्यांत मुख्यत्वें करून मसाल्याचे जिन्नस व भात होतो.

किनाऱ्यावर पुष्कळ तळाव व समुद्राच्या पाण्याने भरलेले आहाळ आहेत. त्यांचा संबंध मोठ मोठाल्या कालव्यानीं झालेला आहे. यांत त्रिवान्द्रम एथें राजा राहतो. अलपई व कोलान हीं मोठीं बंदरें आहेत, त्रावणकोर यांत बहुधा हिंदूलोक राहतात. कोची हें एक लहानसें एतद्देशीय राज्य आहे. यांत यहुदी लोक शेंकडो वर्षांपासुन येऊन राहिलेले आहेत.

## सिंहलद्वीप.

सिंहलद्वीप हें हिंदी महासागरात हिंदुस्थानच्या दक्षिण टोकासमोर आहे. हें हिंदुस्थाना प्रमाणेंच इंग्रेजांच्या ताब्यांत आहे. याचा समुद्रापासून दूरचा भाग डोंगरी आहे. मध्यभागाची हवा फार चांगली आहे. या बेटाची भूरचना फार सुंदर आहे.

दालचिनी, काफी व नारळ यांचें पीक एथें फार होतें. या जिनसांनीं भरलेले जमीनीचे भाग सर्व देशभर पसरले आहेत. माणिक, पुष्कराज व इतर कांहीं रत्नें यांतील पर्वतात सांपडतात. याच्या उत्तरेकडे मोत्यें फार सांपडतात; याविषयीं या बेटाची कीर्ति प्राचीन काळापासुन आहे.

एथील लोकांस सिंगाली ह्मणतात. हे बौध मताचे आहेत. यात कांहीं हिंदू, ख्रिस्ती व मुसलमान हीं आहेत.

याच्या राजधानीचें नाव कोलंबो. यांत त्रीनकोमली व ग्याली हीं मोठीं बंदरें आहेत. दुसरें इंग्लंदातून कलकत्ता किंवा हांगकांग एथें जाणाऱ्या तारवास वरवा बोरे करण्यास फार उपयोगी पडतें.

## बलुचिस्तान.

बलुचिस्तान सिंधच्या पश्चिमेस आहे. हा बहुधा डोंगरी,

भणभणीत व नापीक असा देश आहे; परंतु याचा ईशान्येकडील भाग **कच्छगंडवा** हा पिकाऊ आहे. हिंदुस्थानाच्या ईशान्येस जो उंच प्रदेश आहे, त्याचें नांव कच्छगंडवा. अफगाणिस्थान आणि कांहीं इराण हीं मिळून हा झाला आहे. यांत जाण्याच्या मुख्य मार्गास **बोलानपास** ह्मणतात. हा अरुंद आहे व याच्या बाजूस उंच व बिकट कडा आहे.

यात बलुची आणि ब्रहू असे दोन जातींचे लोक आहेत. त्यांच्या पुष्कळ टोळ्या आहेत, त्यांवर अनेक सरदार आहेत, त्यांत **खिलात** एथील **खान** हा आपणास मुख्य ह्मणवितो. हे आपलें उपजीवन मुख्यत्वें करून गुरें राखून करतात; परंतु लूट व चोरी करण्यांस हीं कमी करीत नाहींत. खिलात हें यात मोठें शहर आहे.

## आफगाणिस्तान.

याच्या उत्तरेस हिंदुकुश पर्वत ह्मणजे हिमालयाचाच एक भाग आहे, व पूर्वेस हिंदुस्थान आहे. हा फार डोंगरी देश आहे. हा खडकाळ व उभेकडे याणीं भरलेला आहे; परंतु कांहीं कांहीं खोरीं फार पिकाऊ आहेत. याच्या नैर्ऋत्येस **सिस्तान** ह्मणून एक मोठें वाळूचें मैदान आहे. हिंदुस्थानातून यात जाण्यास एक मोठा प्रख्यात मार्ग आहे, त्याला **खैबरपास** ह्मणतात.

अफगाणिस्थान उंच असल्यामुळें तेथील हवा फार थंड आहे; परंतु सपाट प्रदेशात हिंदुस्थानाच्या इतकी उष्णता होत्ये.

याची राजधानी **काबूल**. गिझनी एथें पूर्वी मोठें विस्तीर्ण मुसलमानी राज्य होतें. एथील पादशाहा **महमदगिझनी** याणें हिंदुस्थानावर सेरास्वाऱ्या केल्या; आणि यानंतर मुसलमान राजे इकडे येऊ लागले. **जेलालाबाद** एथें अफगाणी लोकांची व इ-

ग्रेजांची मोठी लढाई झाली. कंदाहार हें त्याच नावाच्या प्रांता· चें मुख्य शहर आहे.

काबुलाच्या पश्चिमेस हिरात ह्मणून एक स्वतंत्र खिंड आहे. ही विषयीं इराणी आणि अफगाणी लोकाचे फार तंटे होतात. ही फार सुंदर आहे. एथील जमीन फार सुपीक आहे, व नेहेमी धान्याचीं शेतें, बागा, द्राक्षाचे मळे इत्यादिकांनीं ती भरलेली असत्ये.

## इराण.

इराणच्या उत्तरेस ज्यार्जिया, क्यासपियन समुद्र व स्वतंत्र तारतरी; पूर्वेस अफगाणिस्थान व बलुचिस्थान; दक्षिणेस इराणीआखात; आणि पश्चिमेस एशिया खंडातील तुर्की हीं आहेत.

हा बहुधा डोंगरी देश आहे. यात उंच असून सपाट अशा जमीनी फार आहेत. सुमारें तेहेरानापासून तों पुर्व सिमेपर्यंत एक विस्तीर्ण व भणभणीत मैदान आहे. इराणात मोठी नदी मुळींच नाहीं, काहीं लहान आहेत, परंतु त्या सर्व यांतील अनेक सरोवरांस जाऊन मिळतात, अथवा त्यांचें पाणी कालव्यानीं सपून जातें, यात दोन तीन बरींच मोठीं सरोवरें आहेत.

उत्तरेकडील भाग इतरा पेक्षा पिकाऊ आहे, व तो उंच असल्यामुळें तेथील हवा थंड आहे, व त्यात समशीतोष्ण देशांतील बहुतेक वृक्ष व फळें होतात. द्राक्षें सर्व देशभर होतात, आणि शिराज एथें उत्कृष्ठ द्राक्षासव होतें.

घोडे, गुरें व मेंढे यात चांगले होतात. एथील मेंढ्याच्या शेपट्या फारच लांब असतात. रंग देणें, रेशमाच्या जिनसा करणें, गालिचे व किनखाप विणणें यात हे लोक कुशळ आहेत.

एथें स्वेच्छाचारी राजा राज्य करितो. यांतील मुख्यधर्म

मुसलमानी, परंतु पार्शी ह्मणजे अग्निपूजक व इतर धर्मांचेही लोक पुष्कळ आहेत.

प्राचीनकाळीं हें राज्य मोठें बलाढ्य होतें, परंतु आता याचें महत्व अगदीं कमी झालें आहे.

याची राजधानी **तेहेरान** ही क्यासपियन समुद्राच्या दक्षिण किनाऱ्या नजीक पर्वताच्या एका रांगेच्या पायथ्याजवळ आहे. एथील हवा अगदीं वाईट आहे; यामुळें उष्णकाळीं हें अगदीं रिकामें पडतें. याशिवाय **इसपहान** व **शिराज** हीं दोन मोठीं शहरें आहेत. शिराज एथें **सादी** व **हाफीज** ह्मणून दोन प्रख्यात फारसी कवी होऊन गेले.

## आरबस्थान.

या मोठ्या द्वीपकल्पाच्या उत्तरेस सिरिया व युफ्रेतीस; पूर्वेस इराणआखात; दक्षिणेस आरबीसमुद्र; आणी पश्चिमेस तांबडा समुद्र व सुएझची संयोगिभूमि हीं आहेत.

आरबस्थान हा बहुधा रखरखीत, ओसाड व वालुकामय देश आहे. तांबड्या समुद्राच्या पूर्वेस वनस्पति रहित एक लहान डोंगरांची रांग आहे; परंतु दक्षिणेच्या अंगास ही कांहींशी पूर्वेकडे हटत्ये, आणी तेणेकरून इच्या व समुद्राच्या मध्यें जी जमीनीची चिरटोळी राहत्ये, तींत अनेक मौल्यवान व उपयोगीं झाडें होतात. याच कारणावरून सुखी आरबस्थान असें या भागाचें नांव पडलें आहे. **मस्कत** बंदराजवळ व **सिनै** द्वीपकल्पांत कांहीं पर्वत आहेत बाकी सर्व देश एक मोठें रेतीचें मैदान आहे, जिकडे पाहवें तिकडे सपाट व वाळू दुसरें कांहीं नाहीं. कोठें कोठें दूर दूर अंतरावर हिरवट वनस्पति व खार पाण्याचे झरे मात्र

आढळतात. यासर्व रेतीच्या प्रदेशा पैकीं सिन जवळ जो आहे तो लक्षांत ठेवण्यासारखा आहे. त्याला पूर्वी इदूमिया असें ह्मणत. एथें श्रीमत व लढाऊ लोक राहत असत, परतु ते आता सर्व नाहींसे झाले आहेत. त्याच्या राजधानींची पडझड अजून राहिली आहे. याशहराला पित्रा ह्मणजे दगड ह्मणत, कारण एथील घरें दगड कोरून तयारकेलेलीं होतीं. आणि या आरबस्थानाच्या भागास **पीत्रिया** (शिलामय) असें नाव पडले.

आरबस्थानातील हवा वरचेवर बदलत्रे, कधीं फार उष्ण होये व कधीं थंड होत्रे. कधीं कधीं आगी प्रमाणें वारा सुटतो, तो बद झाल्यावर गार हवा वाहूं लागत्रे

खारीक, बाजरी, ऊद,बोळ, बालसम, कांहीं चीक आणि काफी हीं एथें होतात. काफी पश्चिमच्या किनाऱ्यावर मात्र चांगली होत्ये. हेसर्व जिन्नस व इराणी अखातातील मोत्यें यांचा मुख्यत्वें करून आरब व्यापार करतात. यादेशात घोडे उत्कृष्ट होतात. सौंदर्य, चपलता व बळ यात या घोड्यांसारखे दुसरे कोठें होत नाहींत. एथून हे बाहेर फार जातात. आरब लोक याना फार काळजीनें बाळगतात, व त्यांजवर अशी ममता करतात कीं ते त्यांना आपले सोबतीच समजतात. उंट हें ही यादेशांत एक उपयोगी, मेहेनती व काटक जनावर आहे. रेतीच्या मैदानातून ओझें नेण्यास याला मुख्यत्वें करून लावतात.

आरबाच्या पुष्कळ निरनिराळ्या जाती आहेत, त्यांजवर एक एक सरदार असतो; त्याला शेक असें ह्मणतात. यांचा परस्परांशीं कांहीं संबंध नाहीं. किनाऱ्यावरील आरब कांहींसे सुधारलेले आहेत. बाकी सर्व मारझोड करून उपजीवन करतात. जो कोणी याच्या तावडीस सांपडेल तो सख पावत नाहीं.

आग्नेयीस **ओमान** हा परगणा सर्वांत सुखी आहे. एथील राजास मसकतचा **इमाम** असें ह्मणतात. कारण मसकत ही त्याची राजधानी आहे. हा परगणा महत्वाचा आहे, कारण हिंदुस्थान, इराण व तुर्की यांतील सर्व व्यापार या मार्गानें होतो.

**मक्का** हें या देशांत मोठें प्रख्यात शहर आहे. मुसलमानी धर्मस्थापक **महमद** हा एथें जन्मला. त्या धर्मांतील लोक हें मोठें पवित्र स्थान मानितात. एथें हजारों यात्रेकरू वर्षास जातात. याच्या उत्तरेस **मदीना** एथें त्याची कबर आहे.

तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावर **मोखा** एथें काफी फार चांगली होत्ये. **बाबेलमांदेबच्या** सामुद्रधुनी जवळ **एदन** एथें खडकावर बांधलेला एक मजबूद किल्ला आहे. तो इंग्रेजाच्या ताब्यांत आहे. हिंदुस्थानांतून विलायतेकडे जाणाऱ्या आगबोटीस हें ठिकाण फार उपयोगीं पडतें. आगबोट कलकत्याहून निघाली ह्मणजे मद्रास व **ग्याली** एथें थोडावेळ राहून एदनास जात्ये. तेथून निघून सुएझ एथें पोंचली ह्मणजे उतारू लोक उतरून रेतीच्या मैदानांतून **केरो** यावरून काहीं आगगाडीच्या रस्त्यानें व कांहीं पायमार्गानें **आलेग्झांड्रिया** एथें जातात. तेथें पुनः आगबोटींत बसून **मालता** व **जिब्रालतर** एथें काहींवेळ उतरून **साउथम्तन** एथें जातात. काहीं डाक व ज्यालोकांस जलदी जाणें असेल ते मालता एथून निघाले ह्मणजे **ऱ्होन** नदीच्या मुखाजवळ **मारसेल्स** बंदरांत जातात. तेथून आगीच्या गाडीनें **पारीस** शहरावरून **दोवर** एथें जातात; आणि तेथें तरींत बसून **इंग्लंडास** जातात. विलायतेस जाण्याचा हा मार्ग सर्वांत जवळ आहे.

# युरोप.

सर्व खंडात युरोप अगदीं लहान आहे; परंतु सांप्रत कालीं याच्या इतका पृथ्वीचा दुसरा कोणचा ही भाग सुधारलेला नाहीं. अर्वाचीन काळीं यामध्यें सदाचरण, शौर्य, निर्लोभ वगैरे सद्गुणाचीं मोठालीं कृत्यें घडून आलेलीं आहेत.

याच्या उत्तरेस **उत्तरमहासागर** अथवा **हिमसागर** ह्मणजे जेथें नेहेमी बर्फ असतें तो; पूर्वेस **युरल** पर्वत, **युरलनदी** व **क्यासपियन समुद्र**; दक्षिणेस **काकेशस्** पर्वत, **तुर्कीसमुद्र** व आफ्रिकेच्या आणि याच्या मधील भूमध्यसमुद्र, आणि पश्चिमेस **आतलांतीकसागर** आहे.

युरोप खंडात खालीं लिहिलेले देश आहेत. उत्तरेस **लापलंद, स्विदन, नार्वे, देनमार्क** आणि **रुशिया**; मध्यभागीं **पोलंद जर्मनी, प्रुशिया, आस्त्रिया, हालंद, बेलजियम, ब्रिटिश बेटें, फ्रान्स** आणि **स्विस्सरलंद**; आणि दक्षिणेस **पोर्तुगाल, स्पेन, इतली, ग्रीस** आणि **तुर्की.**

## लापलंद.

युरोपातील अगदीं उत्तरे कडील देश लापलंद हा उत्तर भूशिरापासून श्वेतसमुद्रा पर्यंत पसरलेला आहे. याच्या दक्षिणेस **स्वीदन** व **फिनलंद** आहे. हा रुशिया व स्वीदन याच्या ताब्यात आहे. हा कांहीं डोंगरी व कांहीं सपाट आहे, याचे किनारे उंच, भयंकर व शिलामय असे आहेत; आणि मध्यभागीं दाट झाडांचीं मोठालीं रानें व लांब लांब नापीक जमीनी आहेत.

यातील हवा फारच थंड, कारण हा हिमसागराच्या काठीं आहे. बहुतकरून बाराही महिने बर्फ पडत असतें. हा फार दूरच्या अक्षांशांत असल्यामुळें एथें रात्र व दिवस मोठमोठाले होतात. कधीं कधीं सूर्यास्त दोन दोन महिने पर्यंत होत नाहीं. व रात्रही तशीच असत्ये

लापलंदर लोक ठेंगणे आहेत, व थंडीमुळें ते जाडी लोंकरीचीं वस्त्रें पांघरतात, त्यामुळें तर ते अगदींच लहान दिसतात. याचा स्वभाव उद्योगी व शांत आहे. रेन्दीयर ह्मणून एक जातीचा हरिण आहे, त्याला पाळण्यात यांचें विशेष लक्ष असतें. याला ते गाडीला जुपतात व त्याचें मांस खातात.

हा देश इतका नापीक आहे कीं, मनुष्याला उपयोगी असा जिन्नस एथें कांहींच होत नाहीं.

## स्वीदन.

स्वीदन, नार्वे व स्विदिशलापलंद हीं सर्व मिळून एक राज्य आहे. पूर्वीं फिनलंदही यांत होतें, परतु आता तें रुशियाच्या ताब्यांत आहे. स्वीदनचे तीन मोठे भाग आहेत, उत्तर-स्वीदन, नार्दलंद आणि गाथलंद. याच्या उत्तरेस लापलंद, पूर्वेस बाथनियाचें आखात व बालतिक समुद्र, दक्षिणेस बालतिक व सौंद सामुद्रधुनी, आणि पश्चिमेस नार्वे आहे.

नार्वेंतून जाणारी दोफ्रैन ह्मणून जी पर्वताची मोठी रांग, तिचे कांहीं फांटे यांत आले आहेत, तथापि हा बहुधा सपाट आहे. व देवदार, फर व बर्च या झाडांचीं मोठीं रानें व सरोवरें यांनीं भरलेला आहे

एथें थंडी फार व ती बरेच दिवस असत्ये उष्णता जरी

थोडाच काळ असल्ये तरी फार असल्ये; आणि पीक तितक्याच वेळांत जलद होतें.

एथील लोक कंटक, बळकट व धीट असे आहेत. हे नावाडीपणा मध्यें कुशळ आहेत. याचे उत्तरेकडील देशास प्राचीन काळीं स्कयांदिनेविया असें ह्मणत त्यातील लोकांनीं इतर देशीजाऊन मुलूख जिंकिले. या देशांतील जी यांची संतति तिचीं नावें आता निराळींच पडलीं आहेत.

स्वीदन व नार्वे या देशांत फर, देवदार व बर्च हीं झाडें होतात. लोखंड, तांबें, कोळसा व शिसें यांच्या खाणी यात मोठाल्या आहेत. हे जिन्नस एथून इतर देशांत फार जातात.

या देशांत राजा राज्य करतो आणि लोक ख्रिस्ती असून बहुतेक प्रातेस्तंत मताचे आहेत.

पूर्वेकडील किनाऱ्यावर अनेक लहान बेटांवर स्ताकोम हीं याची राजधानी आहे. अपसाल एथें उत्तर युरोपांतील एक प्रख्यात विद्यालय आहे. गातेंबुर्ग हें व्यापाराचें बंदर आहे. कार्लस्क्रोना एथें आरमार व दारूगोळा असतो.

## नार्वे.

नार्वे हा लांब व अरुंद देश, स्वीदनाच्या पश्चिमेस आहे. याच्या पश्चिमेस आतलांतिक सागर आहे. डोफ्रैन पर्वत याच्या व स्वीदनाच्यामध्यें उत्तरेकडून सुमारें पांचशें कोश पर्यंत आहे. या पर्वताच्या व समुद्राच्या मध्यें डोंगराचे पुष्कळ फाटे दगडांनीं भरलेले आहेत. समुद्राचे लहान लहान फाटे एथें जमीनीत पुष्कळ गेले आहेत, त्यांना फियार्द असें ह्मणतात. याचे किनाऱ्यावर, मोठाले वृक्ष व खडक आहेत. माईलस्त्राम ह्मणून एक भयंकर भोंवरा याच्या उत्तर किनाऱ्या जवळ आहे.

एथील हवा कधीं कधीं फार थंड असते, परंतु याच्या ठिकाणा वरून जितकी असावी असें वाटेल तितकी नसते. याच्या पश्चिमेस मध्यभागीं ड्रानथीम शहर आहे, त्याच्या उत्तरेस गहूं होत नाहीं, व इतर भागांत ही हें धान्य फारसें पिकत नाहीं. शिडांस काठ्या जापासून चांगल्या निघतात अशीं फर वगैरे झाडें एथें चांगलीं होतात; बाकीचीं स्वीदनामधील व यामधील एकच प्राकारचीं आहेत.

नार्वेजियन लोक पुष्कळ प्राकारें स्विदिश लोकां प्रमाणे आहेत. हे उद्योगी, शूर व बळकट आहेत; आणि पारध करणें व मासे मारणें यांतही फार हुशार आहेत. एथें व्यापार मुख्यत्वें करून लांकडांचा होतो; परंतु तांबें, लोखंड व संगमरवरी दगड याच्या खाणी ही यांत बऱ्याच आहेत.

याची राजधानी ख्रिस्तीयानिया ही आमेयीस आहे बर्गेन एथें व्यापार पुष्कळ होतो.

## देन्मार्क.

मध्य युरोपाच्या उत्तरेचें जतलंद द्वीपकल्प, बाल्तिक समुद्रातील झीलंद, फ्यूनन वगैरे बेटें, हालस्तेन, स्लेसविक व लायनबुर्ग प्रांत, आतलांतिक सागरातील ऐसलंद व फेरो बेटें व इतर काहीं ठिकाणें हीं सर्व देन्मार्कच्या राज्यांत आहेत. याचा मुख्य भाग जतलंद द्वीपकल्प व त्यापुढें सांगितलेले तीन प्रांत हे खोल व सपाट आहेत. यांतील जमीन खारी आहे व यांत मोठ मोठालीं उथळ सरोवरें आहेत.

यांतील हवा सर्द आहे, व धुकें नेहेमी असतें. थंडींत बर्फ व पाऊस सदोदित पडत असतो, आणि उष्णकाळ फारच थोडा

दिवस असतो. या सर्व कारणांमुळें यात गहूं होत नाहीं; परंतु सातू, राई आणि ओत हीं धान्यें पुष्कळ होतात.

सुकवलेलें मांस व इतर खाण्याचे जिन्नस यांचा एथें व्यापार होतो.

याची राजधानी **कोपेनहेगन** ही झीलंद बेटावर आहे. हें शहर सुंदर व मजबूद आहे. **एलसिनोर** हें त्याच बेटावर सुंदर लहानसें बंदर आहे. देन्मार्काच्या युरोपातील भागांत कीयल, व एलब नदीवर **अलतोना** हीं मात्र सांगण्या सारखीं दोन शहरें आहेत.

**सौंद** खेरीजकरून **ग्रेतबेल्त** व **लितिलबेल्त** ह्या या जवळ दोन सामुद्र धुन्या आहेत. ग्रेतबेल्त ही तिहींत रुंद आहे ही झीलंद व फ्यूनन या बेटांमध्यें आहे, व लितिल्बेल्त झीलंद व युरोप याच्यामध्यें आहे.

**ऐसलंद** युरोपाच्या वायव्येस हिमसागराजवळ आहे. हें मोठें चमत्कारिक बेट आहे. यांत थंडी फार असत्ये, आणि पर्वत नेहेमी बर्फानें आच्छादलेले असतात. इतकें असून जमीनीखालीं उष्णता फार असत्ये. ती इतकी कीं याला ज्वालामुखी प्रदेश असें ह्मटल्यास चिंता नाहीं. यांत **गैसर्स** ह्मणून चमत्कारिक झरे आहेत; ह्यांतून कधीं कधीं उष्ण पाणी व वाफ बाहेर पडते. ती सुमारें साठ हात वरजात्ये. ऐसलंद अगदीं नापीक आहे. यांत झाडें मुळींच नाहींत. समुद्रानें वाहून याच्या किनाऱ्यावर जें लांकूड लागतें त्याचें सर्पण होतें, आणि लोक मासे मारून उपजीविका करतात. हे लोक नीतिमान व सदाचारी असून ज्या स्थितींत ईश्वरानें आपणास ठेवलें आहे तींत तृप्तता मानून राहतात. हेक्ला ही यांत मोठी ज्वालामुखी आहे.

## युरोपांतील रुशिया.

रुशियनाचें राज्य जेवढें मोठें आहे तेवढें सर्व पृथ्वींत दुसरें कोणाचें नाहीं; परंतु हें आलीकडेसच वाढलें आहे. उत्तर एशिया, अमेरिकेच्या ईशान्येकडील एक मोठा प्रदेश, आणि युरोपाचा बराच मोठा भाग इतके यांत आहेत. युरोपांतील रुशियाच्या उत्तरेस उत्तरमहासागर, पूर्वेस युरलपर्वत, युरलनदी व क्यास्पियन समुद्र; दक्षिणेस तुर्कीसमुद्र व काकेशस पर्वत व पश्चिमेस तुर्कस्थानाचें राज्य, आस्त्रिया, प्रुशिया, बालतिकसमुद्र आणि स्वीदनाच्या अमलांतील लापलंदचा भाग हे आहेत.

रुशियाचा बहुतेक भाग खोल व सपाट आहे; परंतु याच्या युरोपांतील व एशियांतील राज्यामध्यें युरल पर्वताची रांग आहे. फिनलंद कांहीं डोंगरी व कांहीं सपाट आहे; आणि दक्षिणेकडे **क्रिमिया** हा तर फारच डोंगरी व खडकाळ आहे. या देशांतील सपाट जमीन सुमारें साहाशें कोश लांब आहे. इतकी सपाट जमीन युरोपांत दुसरीकडे कोठें नाहीं. हिच्या उत्तरभागीं मोठमोठालीं अरण्यें आहेत, व दक्षिणेस स्तेप्स ह्मणून थड नापीक जमीनी आहेत.

या देशाचा विस्तार फार मोठा असल्यामुळें निरनिराळ्या भागाची निरनिराळी हवा आहे. उत्तरेस व मध्यभागीं थंडी फार असते. थंड ऋतु पुष्कळ दिवस असतो, आणि आकाशांतून पडलेलें बर्फ पुष्कळ महिने पर्यंत जमीनीवर असतें. उष्णकाळ जरी थोडा असतो तरी जेव्हां असतो तेव्हां उष्णता बरीच होते. बर्फ ज्या वेळीं पडते तेव्हां बालतिक समुद्र तारवें जाण्याच्या अगदीं उपयोगी पडत नाहीं, आणि फिनलंद व स्वीदन यांमधून बर्फावरून गाडींतून

जातां येतें; परंतु दक्षिणेकडील हवा यापेक्षां चांगली आहे. क्रिमियांत जेव्हां थंडी पडत्ये तेव्हां ती जरी फार असत्ये तरी लवकर जात्ये; आणि उन्हाळा आला ह्मणजे द्राक्षें, गुलाब व इतर फळें व फुलें चांगलीं होतात.

रूशियन लोक आलीकडे फार सुधारले आहेत. मानकरी व जमीनदार लोक शाहाणे व ईर्षा बाळगणारे आहेत. परंतु बाकीचे सर्व फार मूढ आहेत. शेतकी करणारे हलके लोक काहीं अशीं गुलामा प्रमाणें आहेत. हे लोक दारूबाज फार; परंतु या विस्तीर्ण देशांत इतक्या जातीचे लोक आहेत कीं ते अत्युत्कृष्ट सुधारलेल्यापासून तों अगदीं अडाण्यापर्यंत आढळतात.

निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे प्रकारची हवा असल्यामुळें यांत उत्पन्न ही पुष्कळ प्रकारचें होतें. उत्तरेस देवदार व फर हीं झाडें पुष्कळ होतात. मध्यभागीं ओक, एल्म, आश व दुसरीं कांहीं फळझाडें हीं होतात. दक्षिणेकडे गहूं फार होतो. तो तुर्की समुद्रांतील बंदरांतून इतर ठिकाणीं जातो. क्रिमियात मका, ताग, सण, आणि फळें पुष्कळ होतात. या देशांतील खाणींत काहीं कोळसा, लोखंड व तांबें आणि पुष्कळ मीठ निघतें.

चरबी, चामडीं, जाडी लोंकर, ताग, सण व गहूं हे यांत व्यापाराचे मुख्य जिन्नस आहेत. चीन व एशियाचा अंतरभाग या बरोबर व्यापार लमाण करतात. युरोपा बरोबर, श्वेत, बालतिक व तुर्की समुद्रांतील बंदरांनीं व प्रुशयांतून खुसकीनें, व्यापार होतो.

रूशियांत स्वेच्छाचारी राजा राज्य करतो. त्याची इच्छा मनाकरणारा कोणी नाहीं. त्याला झार असें ह्मणतात. यांतील लोक ग्रीकचर्च ह्मणून ख्रिस्ती धर्मांतील एक पंथ आहे त्या पंथाचे आहेत.

बालतिक समुद्रावरील प्रांत, मोठा रुशिया, लहान रुशिया, दक्षिण रुशिया, पश्चिम रुशिया, आणि पूर्व रुशिया असे यादेशाचे सहा भाग केले आहेत. पोलदाचाही कांहीं अंश या पादशाहाच्या अमलाखालीं आहे. रुशियाची राजधानी **सेंतपितर्सबर्ग** ही **नीवा** नदीवर फिनलदाच्या आखाताच्या टोंकाशीं आहे. हें शहर सुंदर आहे, परंतु खोलगट व खारे जमीनींत आहे, तेणेंकरून नेहेमीं समुद्राचें पाणी आत शिरण्याचें भय असतें. नीवा नदी फार उथळ आहे, यामुळें याजवळ मोठीं गलबतें येऊं शकत नाहींत; याजकरतां फिनलदाच्या आखातान एका बेटावर **क्रानस्टाद** हें शहर वसविलें आहे. हें मोठमोठ्या किल्यांनी पक्कें मजबूद केलें आहे. हें या राज्यांतील आरमाराचें मुख्य ठिकाण आहे. **हेलसिंगफोर्स** एथें ही फिनलदामध्यें कांहीं आरमार असतें. अबो हें विद्येचें ठिकाण आहे. **कूरलंद** यांत **रिगा** आणि रेवल ही दोन मजबूद व्यापाराचीं ठिकाणें आहेत. श्वेतसमुद्राच्या पूर्वेस **आरकेंजल** हें मोठें व्यापाराचें शहर आहे.

रुशियांत **मास्को** सेंतपितर्सबर्ग याचे खालोखाल मोठें शहर आहे. पूर्वी हीच राजधानी होती. सन १८१२ इसवीमध्यें जेव्हां **नेपोलियन** पादशाहा याणें या शहरावर स्वारी केली त्यावेळीं तेथील लोकांनीं यास आगलाऊन दिली, तेणेंकरून त्याला परत जाणें प्राप्त झालें; आणि जातेवेळीं थंडी पाऊस व बर्फ याणीं त्याचा फार नाश झाला.

**निकोलेएफ** व **ओदेसा** हीं तुर्कीसमुद्रावर मोठीं बंदरें आहेत. निकोलेएफ एथें पुष्कळ दारूगोळा व आरमाराचें सामान असतें

क्रिमियाचे दक्षिणेस **सबास्तपूल** हें मोठें बंदर आहे. सन १८५५ सालीं याला इंग्रेजी व फ्रेंच सेनेनें अकरा महिने पर्यंत वेढा घालून, तेथील मोठे किल्ले व गोद्या मोडून टाकिल्या.

**वोलगा** नदी रुशियामधून ११०० कोश जाऊन क्यासपियन समुद्रास मिळत्ये. **दान** आझोफच्या समुद्रास जात्ये. **न्दीपर** रुशियाच्या पश्चिमेकडून येऊन निकोलेएफ व केरसान या शहराजवळ तुर्की समुद्रास मिळत्ये. या दुसऱ्या शहरात जगमित्र **हावर्द** हा मरण पावला. **नीस्तर** नदी त्याच समुद्रास ओदेशा शहराजवळ मिळत्ये. **द्वायना** श्वेतसमुद्रास आरकेंजला जवळ मिळत्ये, आणि **नीवा** सेंतपितसबर्ग याजवळ मिळत्ये.

रुशियामध्यें पुष्कळ मोठमोठालीं सरोवरें आहेत. त्यात **लादोगा** आणि **ओनिगा** हीं दोन मुख्य. तुर्की समुद्राचे पूर्वेस सरकयाशिया हा डोंगरी मुलूख आहे. याच्या आणि जार्जीयाच्यामध्यें काकेशस पर्वत आहे. हे दोन्ही प्रांत रुशियाचेच ताब्यात आहेत. परतु एथें याचा अम्मल अद्याप पक्का बसला नाहीं; लढाया वगैरे नेहेमी होत असतात. एथील लोक फार शूर व स्त्रिया फार सुदर आहेत.

## पोलंद.

हें जरी निराळें राज्य नाहीं तरी एथील लोक इतरापासून निराळे आहेत, सबब एथें आम्हीं याचें वर्णन निराळें करतों. रुशिया आस्त्रिया आणि प्रुशिया या तीहींच्या ताब्यात हा देश आहे. हंगरीच्या व याच्या मध्यें **कारपेथीयन** पर्वत आहे. दक्षिण भाग खेरीज करून सर्व देश एक मोठें मैदान आहे, आणि उत्तरेकडून वारा येतो तेणें करून एथील हवा बहुत थंड व सर्द होत्ये. एथें हिंवाळ्यात थंडी अतिशय पडत्ये. एथील लोक शूर,

देशाभिमानी व विलासी असे आहेत. स्वदेशाभिमानानें हे लोक आपल्या परकी राजावर अनेक वेळां उठले, परंतु त्यांचें आपसांत एक मत नसल्या मुळें जय झाला नाहीं. सरते शेवटीं **कोसियस्को** याणें सन १७९३ या मध्यें पराकाष्ठेचा प्रयत्न केला. परंतु तो शत्रूच्या हातीं लागल्या मुळें सर्व यत्न व्यर्थ गेले.

धान्य, ताग व सण हे येथें फार होतात. आणि ते मे महिन्या मध्यें जमा करतात. परंतु खाणीच्या मिठाविषयीं हा देश फार प्रख्यात आहे. **वाएलिकसा** येथील खाणीचा सुमारें चारकोस विस्तार आहे. यांत मोठ मोठाल्या गुहा, भुयारें, खोल्या, रस्ते व देवळें मिठाचीं कोरून काढलीं आहेत.

**वार्सा** हें सांप्रतचें पोलंदांतील मुख्य शहर, हें रुशियाचे ताब्यात आहे. पूर्वींची राजधानी **क्राकाव** ही दक्षिणेस आस्त्रियाच्या भागांत आहे. मिठाच्या मोठ्या खाणींपैकीं पुष्कळ या शहराजवळ आहेत.

## जर्मनी.

मध्य युरोपांतील अनेक संस्थाने परस्पराच्या संरक्षणा करितां एकत्र झालीं आहेत. त्यांस जर्मनी हें नाव आहे. यांत मुख्यत्वें करून आस्त्रिया व प्रुशिया याचे अमलांतील मुलूख आहे. परंतु कित्येक लहान लहान स्वतंत्र संस्थाने आणि **बवेरिया, साक्सनी, वर्टेंबुर्ग** आणि **हानोवर** हीं राज्यें या समाजामध्यें आहेत. कायदे नवे करणें, मोडणें, बदलणें, परचक्रापासून बचाव करणें वगैरे कारभार **फीदरेतिव** दाएन ह्मणून मंडळी आहे, तीमध्यें होत असतो. या सभेंत जर्मनींतील सर्व राजे स्वता किंवा प्रतिनिधींच्या द्वारें आपआपला अभिप्राय देतात.

# प्रुशिया.

पूर्वेस पोलदांतील रुशियाच्या प्रांतापासून तों पश्चिमेस हालंद व बेलजियम पर्यंत हा देश मध्ययुरोपाच्या उत्तरेस आहे. पूर्व व पश्चिम प्रुशिया, पोलदाचा कांहीं भाग, पामिरेनिया-ब्रांदेनबूर्ग, सायलेशिया प्रुशियन साक्सनी, वेस्तफेलियाचा, कांहीं भाग, आणि कांहीं र्‍हैननदीवरील परगणे इतके यांत आहेत.

याचा बहुतेक भाग युरोपाचा जो मोठा खोल प्रदेश त्यांत आहे. पश्चिमेस व दक्षिणेसमात्र कांहीं पर्वत आहेत. त्यामधील देशांत जल तृणाची रचना फारच मनोरंजक आहे. एथील हवा जरी कोठें कोठें फार थंड आहे तथापि सुखदायक आहे.

यांतील बहुतेक लोक जर्मन आहेत, ते विश्वासू, उद्योगी, मेहनत करणारे आणि विचारी असे आहेत.

प्रुशियन लोक पुर्वेकडे आहेत, त्यांच्या व यांच्या रीतिभातींमध्ये व आयुष्य क्रमामध्यें विशेष फेर नाहीं.

ऐथें अनेक तऱ्हेचें पुष्कळ उत्पन्न होतें. वेस्तफेलिया, साक्सनी व सायलेशिया यामध्ये खाणींचा कोळसा निघतो. याखेरीज मीठ, शिसें, तांबें, लोखंड, व दुसरे अनेक मौल्यवान व उपयुक्त खनिज पदार्थ सांपडतात. वेस्तफिलियांतून धान्य, ताग, लांकूड, व डुकराचें मांस; साक्सनींतून लोकर, व इतर ठिकाणाहून तागाचीं वस्त्रें हीं फार बाहेर जातात. अनेक प्रकारचें द्राक्षासव हीं र्‍हैननदी जवळच्या प्रदेशांत होतें.

येथें राजा आहे, परंतु त्याच्या इच्छे प्रमाणेंच राज्य चालत नाहीं. त्याला मदत करणाऱ्या दोन सभा आहेत. त्यापैकीं एकीमध्यें लोक आपले प्रतिनिधि पाठवितात.

**बर्लिन** ही येथील राजधानी ही **ब्रांदेनबुर्ग** प्रांतांत आहे हें युरोपांतील सुंदर व दाट वस्तीच्या शहरांपैकीं एक आहे. येथें सुंदर राजमंदिरें आहेत. त्यांत पुष्कळ पुस्तकालयें, पदार्थसंग्रहालयें, व कृतीनें केलेल्या वस्तु आहेत. **कानिङ्सबुर्ग** हें यांतील दुसरें शहर आहे. हें मोठें आहे, व येथें व्यापार पुष्कळ चालतो. याच्या दक्षिणेस **तिलसित** येथें नेपोलियन पादशाहानें रुशियाचा बादशाहा **आलेगझांदर** याज बरोबर तह केला. **दानझिक** **येथें** व्यापार पुष्कळ चालतो. **ब्रेसला** हें वस्त्रें वगैरे तयार करण्याचें मोठें शहर आहे. **मागदबुर्ग** साक्सनी मध्यें आहे. **र्‍हैननदी** जवळ **क्कोलोन** येथें एक सर्वोत्कृष्ट देऊळ आज सुमारें पांचशें वर्षें बांधीत आहेत. **एलाशपेल** येथें **शार्लेमेन** बादशाहास पुरलें, **बान** येथें विद्यालय आहे. यांतील सर्व विद्यार्थी लांब केंस ठेवितात.

र्‍हैन नदी आल्पस पर्वतांतून निघून **कानस्तन्स** याच्या सरोवरांतून जाऊन **आमस्तरदम** याजवळ समुद्रास मिळते. इच्या कांठचे देशाची रचना फार मनोरंजक आहे, व त्यांत पुष्कळ जुनी जुनी शहरें व मोडके किल्ले आहेत. हा सर्व प्रदेश फार प्रख्यात आहे; व इतर देशांतील प्रवासी येथें फार येतात. **एल्ब** बोहीमियांतील पर्वतांतून निघून प्रुशियाच्या मधून जाऊन **हालस्तेन**च्या पश्चिमेस उत्तरसमुद्रास मिळते. **वीझर** दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहते आणि एल्ब नदीच्या मुखाजवळ उत्तर समुद्रास मिळते. **ओदर** इचा उगम पोलंदांत आहे. ही **पामरेनीया** याच्या मध्य भागीं बालतिक समुद्रास मिळते

## आस्त्रिया.

यांत **आस्त्रिया**, **स्तिरिया**, **तैरोल**, **बोहीमिया**, **मोरेवि**

या, सीलेशियाचा कांहीं भाग, पोलदाचा कांहीं भाग, हंगरी, दालमेशिया, इलिरिया, इतालींतील लांबर्दी आणि वेनीस हीं आहेत.

आस्त्रियाचे जर्मनींतील प्रांत फार डोंगरी आहेत. युरोपाच्या मध्यभागीं जो उंच प्रदेश आहे त्यापैकींच हे आहेत. यांतील देशाची रचना फार विलक्षण व सुंदर आहे. यात एक विलक्षण चमत्कार आहे तो हाकीं, इलीरियामध्यें डोंगरात पुष्कळ खोल भुयारें आहेत. त्यात जमीनीखालीं सरोवरें व नद्या आहेत. याच पर्वताचा फाटा पूर्वेकडे आहे त्यास कारपेथियन ह्मणतात. याच्या एका बाजूस पोलद व दुसऱ्या बाजूस हंगरी आहे. हे दोन्ही देश सपाट आहेत; परंतु पोलदामध्यें उत्तरेकडून गार वारा वाहतो. व मध्यें कारपेथियन पर्वत असल्यामुळें तो पुढें हंगरींत येत नाहीं. यामुळें हंगरींतील हवा बहुतेक वर्षभर बरीच उष्ण व सुखावह असते. येथें द्राक्षें वगैरे दक्षिणेकडील पदार्थ पिकतात. बाकी सर्व आस्त्रियन राज्याच्या भागात आनंद दायक व आरोग्य कारक हवा आहे.

हंगरींत सोनें व रुपें; कारिंनथिया आणि स्तिरिया यांत लोखंड, व कारनियोला यांत पारा असे जिन्नस सांपडतात. यांखेरीज तांबें, शिसें व इतर मौल्यवान पदार्थांच्या खाणी हीं आहेत. हंगरीमधून इतर मुलखात द्राक्षाची दारू फार जाते. एथें वस्त्रें वगैरे करण्याचा इतर राज्याप्रमाणें फारसा कारखाना नाहीं. यांत समुद्र किनारा फार थोडा, हें एक व्यापार कमी असण्याचें कारण आहे. तथापि विएना एथें लोकर, रेशीम व तागा यांच्या वस्त्रांचे कारखाने आहेत, आणि बोहेमियात सुंदर कांचेच्या सामानाचे कारखाने आहेत.

हें फार विस्तीर्ण राज्य आहे यामुळें लोकाच्या रीतिभाती फार निरनिराळ्या आहेत. आस्त्रियन लोक बहुधा जर्मन लोकांप्रमाणेच आहेत; परंतु हंगरींतील लोक फार निराळे आहेत. हे शूर, लढाऊ, व स्वदेशाभिमानी असे आहेत.

एथील बादशाहा पूर्वी प्रमाणें स्वेच्छेनें राज्यकरूं शकत नाहीं. त्याजवर देखरेख करणाऱ्या लोकांच्या प्रतिनिधींच्या सभा आहेत. या राज्यांत नेहेमी मोठी सेना तयार असत्ये. लोक रोमनक्याथोलिक मताचे आहेत.

एथील राजधानी विएना हें फार सुंदर व मोठें शहर, दान्यूब नदीच्या तिरीं असून यात एक मोठें प्रख्यात विद्येचें ठिकाण आहे. या शिवाय दान्यूब नदीच्या काठीं लिंतझ, ग्रात्स, स्तिरियाची राजधानी, आणि आद्रियातिक समुद्रावर त्रिस्त हीं शहरें आहेत. त्रिस्त येथें व्यापार पुष्कळ होतो.

बोहीमियाची राजधानी प्रेग हें सुंदर जुनें शहर आहे. यामध्यें जर्मनींतील एक फार प्राचीन विद्यालय आहे. लूथर याचा धर्म प्रथम बोहीमिया प्रांतात सुरू झाला.

ब्रन हीं मोरेव्हियाची राजधानी. प्रेसबुर्ग दान्यूब नदीवर मोठें शहर आहे. पेस्त व बुडा हीं दान्यूब नदीवर हंगरी मध्यें मोठीं शहरें आहेत.

दान्यूब, इन्न, द्रेव व स्तेव या आस्त्रिया मध्यें मुख्य नद्या आहेत. दान्यूब ही वालगा खेरीजकरून युरोपांत सर्वांत मोठी नदी आहे. वर सांगितलेल्या दुसऱ्या नद्या तिला जाऊन मिळतात. ही बेदन संस्थानांत निघत्ये, आणि विएना, प्रेसबुर्ग व पेस्त या शहराजवळून व तुर्कस्थानाच्या उत्तर भागातून तुर्की समुद्रास जाऊन मिळत्ये. ही बहुतेक तारवें जाण्यासारखी आहे. एल्ब आ-

स्त्रियन राज्यात निघते, व पो वगैरे नद्या इतालीच्या उत्तरेकडून जातात.

## बवेरिया.

आस्त्रिया आणि प्रुशिया हीं खेरीजकरून जर्मनीत मोठें राज्य बवेरिया हें आहे. याच्या उत्तरेस कित्येक लहान लहान जर्मनींतील संस्थानें आहेत, पूर्वेस आस्त्रिया; दक्षिणेस आस्त्रिया व स्विस्सरलंद; आणि पश्चिमेस वर्तेंबुर्ग आणि बेदन हीं आहेत. याचा एक लहानसा भाग -हैन नदीच्या पश्चिमेस व फ्रान्सच्या सरहद्दीवर आहे.

यांत दान्यूब व तिच्या शाखा मिळून पुष्कळ नद्या आहेत लोक बहुधा कृषिकर्म करतात; परंतु दान्यूब नदीनें व्यापार ही बराच चाललेला असतो. धान्य, फळें, मीठ व लोखंड हे पदार्थ मुख्यत्वें करून यात होतात.

यांतील राजधानी म्यूनीच ही ऐझर नदीवर आहे. सुंदर इमारती, विद्यालय आणि दगडाचीं व रंगाचीं कामें यांविषयीं हें प्रख्यात आहे. नूरेंबुर्ग येथें मोठे कारागीर राहतात. एथे एक पुस्तकालय आहे त्यात फार दुर्मिळ पुस्तकें आहेत.

## साक्सना.

हें राज्य जर्मनीच्या मध्यभागीं आहे. प्रुशिया बोहिमिया व लहान लहान स्वतंत्र साक्सनसंस्थान याच्या भोंवतीं आहेत. याच्या व बोहीमियाच्यामध्यें अर्झब्रिज पर्वत आहे, त्यात फार दुर्मिळ खनिजपदार्थ सांपडतात. बाकी सर्व प्रांत सपाट व पिकाऊ आहे. या देशात लोंकर पुष्कळ व चांगली होते.

एथील लोक साहाशी व मेहनत करणारे आहेत. या देशांत जितकें विद्येकडे लोकांचें लक्ष आहे तितकें युरोपांतील दुस-

ऱ्या कोणत्याही देशात नाहीं असें ह्मटल्यास चिंता नाहीं. पुस्तकाच्या व छापण्याच्या मोठ मोठाल्या कारखान्यांनीं व पुस्तकालयांनीं हा देश भरला आहे.

याची राजधानी **ड्रेसदन** ही एल्ब नदीवर आहे. हींत सुंदर इमारती, चित्रें, दगडाचें काम, व लोकाच्या सौख्यासाठीं केलेले बाग पुष्कळ आहेत. **लेपझिक** हें यात दुसरें मोठें शहर आहे. यात मोठें विद्यालय व पुस्तकालय आहे. येथें बुकाचा मोठा बाजार भरतो. तेथें सर्व युरोपातून पुस्तकें विकत घेणारे व्यपारी जातात.

## वर्तेंबुर्ग.

याच्या पूर्वेस बवेरिया व पश्चिमेस **बेदनचीदची** हें संस्थान आहे. दक्षिणेस हा प्रांत **कानस्तन्स** याच्या सरोवरापर्यंत जातो. पश्चिमेस **ब्लाकफारेस्त** अथवा **स्कारझवाल्द** आणि पूर्वेस व दक्षिणेस **सुवाबियन** व आल्प्स ह्या दोन पर्वताच्या रांगा आहेत. बाकीच्या देशामध्यें लहान लहान पर्वत व खिंडी आहेत. याचा आकार **आबलांग** आहे. यांतील हवा फार थंड नाहीं व आरोग्य कारक आहे. हा देश लहान व पिकाऊ आहे. द्राक्षासव, धान्य व फळें एथून पुष्कळ बाहेर जातात. डोंगरी भागांत लाकडें, मीठ, व खनिजपदार्थ पुष्कळ सापडतात.

याची राजधानी **स्तात्गर्त** ही **नेकर** नदीवर आहे. यात राजाचें पुस्तकालय आहे. त्यांत १२००० निरनिराळ्या बायबलाच्या प्रती आहेत. **त्युबिन्जयन** एथें एक प्रख्यात विद्यालय आहे, आणि दान्यूब नदीवर **अल्म** यात मोठें पुरातन देऊळ आहे.

वर्तेंबुर्ग मधून **दान्यूब** व **नेकर** ह्मणून जी ऱ्हैन नदीची शाखा अशा दोन नद्या वाहतात.

## हानोवर.

हानोवर हें जर्मनीच्या वायव्येस आहे. याची आकृति वांकडी तिकडी आहे, व यांत इतर राज्याचे भाग आलेले आहेत. याच्या दक्षिणेस हार्त्स हा उंच पर्वत आहे. यांत लोखंड व आणखी कांहीं खनिज पदार्थ सांपडतात. बाकी सर्व प्रांत सपाट, वालुकामय, व कांहीं अंशीं नापीक असा आहे. यामुळें यांत उत्पन्न फारसें होत नाहीं.

हानोवराचें राज्य पूर्वी इंग्लंदाच्या राज्यास मिळालें होतें, परंतु तेथील कायद्याप्रमाणे स्त्री गादीवर बसू शकत नाहीं यामुळें ग्रेतब्रितनातील सांप्रतची राणी साहेब जेव्हां राज्यावर आली तेव्हां तें राज्य निराळें झालें.

याची राजधानी हानोवर ही लीन नदीवर आहे त्याच नदीवर गातिंजन यांत एक विद्यालय व पुस्तकांचा मोठा संग्रह आहे.

## बेदन.

बेदनची ग्रांददची (मोठें संस्थान) र्‍हैन नदीच्या पूर्व किनार्‍यावर मानहीम पासून तों कानस्तनच्या सरोवरा पर्यंत आहे. याच्या पूर्वेस वर्तेंबुर्ग आहे. हा डोंगरी मुलूख आहे ब्लाकफारेस्त पर्वत बहुतेक देशामध्यें आहे. हा देश पिकाऊ व फारसुंदर आहे. यांत फळें, द्राक्षासव व धान्य पुष्कळ होतें येथील हवा फार आरोग्य कारक आहे यामुळें इतर देशांतून पुष्कळ लोक येथें येतात.

बेदन एथील चांगलें पाण्या साठीं पुष्कळ रिकामे व अशक्त लोक येऊन एथें राहतात.

कार्लस्रुहे येथें ग्रांदडूक राहतो व तो राज्य कारभार चालवितो. न्हैन व नेकर या नद्यांच्या संगमाजवळ मानहीम हें फार चांगलें शहर आहे. हिदलबुर्ग येथें एक प्राचीन विद्यालय, सुंदर मोडका किल्ला व चांगली जल दुर्गाची रचना आहे.

## जर्मनींतील लहान लहान संस्थानें.

वर सांगितलेल्या खेरीज जर्मनीमध्यें जीं लहान संस्थानें आहेत त्यांपैकीं मुख्य मुख्यांचीं नांवें सांगतों, हेसीकासल, हेसीदार, मस्साद, हेसीहांबुर्ग, ब्रन्सविक, येथील पूर्वीचे डूक साप्रतच्या ग्रेत ब्रितनांतील राजवंशाचे पूर्वज आहेत, नासा, मेकलनबुर्गस्केवरिन, मेकलनबुर्ग्स्त्रेलित्झ, साक्सवीमार, साक्समेनिङ्जेन, साक्सआलतेनबुर्ग, साक्सकोबुर्गगोथा ही इंग्लदच्या राणीच्या भताराची जन्म भूमि; आणि ओलदेनबुर्ग.

मेन नदीवर फ्राकफोर्थ शहर आहे एथें वर सांगितलेल्या सर्व संस्थानांच्या राज्य कारभाराची सभा भरत्ये व हें जर्मनींतील खुसकीच्या व्यापाराचें एक मोठें ठिकाण आहे, वीसर नदीच्या मुखाजवळ ब्रेमन एथें व्यापार पुष्कळ होतो, एल्ब नदीवर हाम्बुर्ग हें सर्व जर्मनींत व्यापाराचें मोठें ठिकाण आहे, आणि त्रेव नदीवर लूबेक हीं सर्व स्वतंत्र शहरें आहेत.

## हालंद.

हानोवर आणि प्रुशिया यांच्या पश्चिमेकडे पिकाऊ व सुखी असे हालंदचें राज्य आहे. याच्या मर्यादा, उत्तरेस उत्तर समुद्र, पूर्वेस हानोवर व न्हैन नदीवरील प्रुशियाचे परगणे; दक्षिणेस बेलजियम आणि पश्चिमेस जर्मन समुद्र ह्मणजे उत्तर समुद्र.

हा देश केवळ सपाट आहे. यांत एक ही पर्वत किंवा

टेंकडी नाहीं. समुद्राचे सपाटीपेक्षा जमीन खोल आहे आणि भरतीच्यावेळीं समुद्राचे पाण्यानें जमीन न बुडावी यासाठीं डच लोकांनीं समुद्रकिनाऱ्यावर मोठमोठे धक्के बांधले आहेत. हालंद देश हा पूर्वीं ओसाड होता, परंतु तेथील लोकांच्या उद्योगानें तो युरोपांतील उत्कृष्ट पिकाऊ देशाच्या बरोबरीस आला आहे. एथें शेतापेक्षा कुरणें विस्तीर्ण आहेत, व त्यांत पुष्कळ ठिकाणीं खंदक व कालवे आहेत. जमीनींवर कालव्याच्या योगानें मुख्यत्वें करून व्यवहार चालतो.

हालंद समुद्रापेक्षा खोल असल्यामुळें तेथील हवा सर्द व धुकट असत्ये.

एथील लोक मंद आहेत, तीव्रबुद्धि नव्हत, परंतु अतिशय उद्योगी असल्यामुळें पुरातन काळीं व्यापारामध्यें हा देश पृथ्वींत मुख्य होता.

शेंकडों वर्षें युरोप खंडांतील व्यापारांत डच लोक अग्रगण्य होते, परंतु अलीकडे इंग्लंद व दुसऱ्या कांहीं देशांनीं याला मागें टाकिलें आहे.

या लोकांचें संपत्तीचें मुख्य साधन गुरें आहेत. तीं वर सांगितलेल्या कुरणांत चरतात. तंबाकू, गहूं, ताग, व सण हे यांत बरेच होतात. बागा व मळे करण्यांत हे लोक फार कुशळ आहेत.

कृतीच्या जिनसांविषयीं यांची कीर्ति पुष्कळ आहे. यांत तागाचीं एक प्रकारचीं वस्त्रें, मातीचीं भांडीं व जीन दारू हीं मुख्य आहेत

डच लोकांचा व्यापार अजून ही पुष्कळ आहे. हेरिंग व व्हेल हे मासे यांच्या किनाऱ्यावर पुष्कळ मरतात. ते वाळवून हे

इतर देशांत नेऊन विकतात. जावा, मसाल्याचीं बेटें, बोर्निओ, सुमात्रा, इंदियन आरकिपिलेगो, पूर्वेकडाल बेटांचा समूह, वेस्त इंदीज मधील अनेक ठिकाणें, दक्षिण अमेरिकेंतील सुरीनाम ह्मणजे दच गायना, आणि आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील कांहीं ठिकाणें इतकीं यांच्या अमलांत असल्यामुळें पृथ्वींतील कांहीं अति श्रीमंत देशांबरोबर व्यापार करण्याची यांची सोय चांगली आहे.

दच लोक बहुत करून प्रातेस्तंत मताचे आहेत. लोकांस विद्या शिकवण्याकडे यांचें लक्ष फार आहे. लेदन, यूत्रेक्त व ग्रानिनजेन एथें प्रख्यात विद्यालयें आहेत.

यांची राजधानी आमस्तरदम ही आमस्तेल नदीच्या मुखाजवळ आहे. खाऱ्या जमीनींत लाकडें मजबूद पुरून त्यांवर हें शहर बांधलेलें आहे. यांत पुष्कळ कालवे आहेत, ते मुख्य मुख्य रस्त्यांतून जातात. यांत बसून थेट समुद्रांत जातां येतें. एथें व्यापार फार होतो, व यांत मोठे श्रीमान व्यापारी फार आहेत.

लाहेग याला सर्व पृथ्वींतील मोठें खेडें असें ह्मटलें आहे. यांत पुष्कळ सुंदर इमारती आहेत; व सांप्रत एथें राजा राहतो रात्तरदम हें म्यूझ नदीवर मोठें व्यापाराचें ठिकाण आहे. यांत मोठालीं तारवें तरण्यासारखे रस्त्यांतून कालवे आहेत. र्‍हैन व म्यूझ ह्या या देशांत मोठ्या नद्या आहेत.

## बेलजियम.

बेलजियम हालंदाच्या दक्षिणेस आहे. याच्या पूर्वेस प्रुशियांतील र्‍हैन नदीवरील प्रांत आहे, दक्षिणेस फ्रान्स; आणि पश्चिमेस जर्मन समुद्र आहे.

बेलजियम हालंदाप्रमाणें बहुधा सपाट आहे. परंतु पूर्वेकडील डोंगरांचे फांटे आग्नेयीस आले आहेत, यामुळें तेथील उंच

ना निराळी आहे. एथील हवा आरोग्य कारक व सुखावह आहे.

बेल्जियमाच्या दक्षिणभागीं कोळशांनीं भरलेल्या जमीनी मोठ मोठाल्या आहेत, व लोखंड ही पुष्कळ सापडतें. शिसें आणि इमारतीचे दगड ही बरेच निघतात. कलाबतू, गालिचे आणि तागाचीं कयांत्रिक म्हणून वस्त्रें याविषयीं हा देश प्रख्यात आहे. पूर्वी व्यापारात हा पुढारी होता, परंतु राज्य क्रांति वारवार झाल्यामुळें याच्या व्यापारास धोका पोंहचला. यांत व्यापाराच्या सोई करण्यां मोठ मोठाले कालवे खणले आहेत व जिकडे तिकडे लोखंडी सडका केल्या आहेत.

या देशातील लोकांचा फ्रेंच लोकां सारखा स्वभाव आहे; परंतु भाषा भिन्न असून धर्मही बहुधा निराळाच आहे. यांची भाषा फ्लेमिश आहे, परंतु फ्रेंचही पुष्कळ चालते. हे बहुतेक काथोलिक पंथाचे ख्रिस्ती आहेत.

बेल्जियमाच्या राज्यरीतींत बहुत वेळा फेरफार झाले आहेत. कित्येक वेळा हे हालंदात मोडले गेले होते- या दोन देशास नेदरलंद अशी संज्ञा आहे. आस्त्रिया, स्पेन व फ्रान्स या देशाचा बेलजियमावर कित्येक वेळा अमल होता.

बेलजियम लोकांनीं, सन इसवी १८३० त साक्सकोबुर्ग याचा राजा लियोपोलेंद याजला आपला राजा नेमून दच लोकाबराबर पुष्कळ युद्ध केलें आणि स्वातन्त्र्य मिळविलें. तेंव्हांपासून तें आता वेगळेंच राज्य आहे.

सेन या लहानशा नदीच्या कांठीं बेलजियमाची राजधानी ब्रसेल्स ही आहे. या शहरात व्यापार बराच चालतो. सेन आणि शेल्त या दोन नद्या कालव्यानें जोडल्या आहेत त्यामुळें या शहराहून समुद्रापर्यंत जळमार्गानें जातां येतें. युरोपातील सर्व

राजधान्यांत असेल्स ही अगदीं लहान आहे. तथापि ती फार रमणीय आहे.

सन इसवी १८१५त जून महिन्याच्या पधराव्या तारखेस या शहराच्या नजीक वातरलू एथें इंग्लिशाची आणि फ्रेंचाची मोठी नामांकित लढाई होऊन, फ्रेंच्याचा पराभव झाला, आणि त्यामुळें नेपोलियन बादशाहा इंग्लिशास शरण गेला. त्याच्यांमदतीस प्रुशियन व दुसरे काहीं युरोपांतील लोक होते, व या सर्वांवर वेलिंगलनचा डूक ह्मणून जो प्रख्यात इंग्लिश योद्धा तो सेनाधिपति होता. बेलजियमांत आणखीं कित्येक प्रख्यात लढाया झाल्या आहेत

अंतवर्प एथें व्यापार पुष्कळ चालतो. हें पुरातन शहर शेल्त नदीवर आहे. यात एक देऊळ व चित्रें चागलीं आहेत. आसनेन्द एथें मात्र या सर्व देशांत बदर चागलें आहे. हें व घेंत, लिवाय, ब्रुजीस व नामूर हीं इतिहासांत प्रख्यात शहरें आहेत

शेल्त व म्यूश या यांत मोठ्या नद्या आहेत. या मुखाजवळ जवळ फ्रान्सा● जातात.

## ग्रेतब्रितन.

ग्रेतब्रितन बेटांतील देश, इंग्लंद, स्कातलंद, वेल्स आणि त्याच्या पश्चिमेकडील बेट ऐरलंड मिळून एक राज्य आहे. येथें राजा राज्यकरतो; परंतु केवळ आपल्याच इच्छे प्रमाणे याला कोणचीही मोठी गोष्ट करता येत नाहीं. याला मसलत देण्यास प्रधान आहेत, आणि पार्लमेंतसभा याजवर देखरेख करते. या सभेचे दोन भाग आहेत, मानकऱ्यांची (हौसआवलार्द्स) व प्रतिनिधींची (हौसआवकामन्स) मानकरी लोक पहिलीं मध्यें वंशपरंपरेनें बसतात, व दुसरी मध्यें लोकांनीं निवडलेले प्रतिनिधि असतात. हे बहुधा चांगले शिकलेले व हुशार गृहस्थ असतात.

अशा रीतीनें राज्यकारभार चालल्यानें सर्वांचे कल्याणाकडे लक्ष राहातें. आणि राज्यरीति सुरळीत चालून तींमध्यें वारंवार फारफेर होत नाहींत.

वरील देशाखेरीज पृथ्वीच्या इतर भागात ब्रितिश राज्याच्या अमलातील ठिकाणें पुष्कळ आहेत. त्यांचीं नांवें, युरोपात हेलीगोलंद (जर्मनसमुद्रातीलबेट), जिब्राल्तर, माल्ता व आयोनियनबेटें; एशियांत हिंदुस्थान, पेगू, सिंहलद्वीप, पिनांग, सिंगापूर, हांकांग, लाबूअन, आणि एदन; आफ्रिकेंत सिरिआलियोन, ग्यांबिया, सेंतहेलीना, केपआफगुदहोप आणि मारिशस; अमेरिकेंत कानदा, नोवास्कोशिया, न्यूब्रन्सविक, न्यूफौंदलंद, बरमूडाबेटें, वेस्तइंदियापैकीं कित्येकबेटें, ब्रितिशगायना व फाकलंदबेटें; आणि बहुतेक आस्त्रेलिया.

## इंग्लंद.

इंग्लंदाच्या उत्तरेस स्कातलंद; पूर्वेस उत्तर समुद्र; दक्षिणेस इंग्लिश खाडी; आणि पश्चिमेस आतलांतिक महासागर, वेल्स व ऐरीशसमुद्र आहे. याची आकृति त्रिकोनी आहे. येथील जमीन पूर्वेस सपाट आणि उत्तरेस डोंगरी आहे; पर्वत सखल आहेत, सर्वांपेक्षा उंच आहे तो तीनहजार फूटही नाहीं. भूरचना सुंदर आहे, कोठें टेंकड्या, कोठें खोरीं, कोठें सपाट जमीन आशारीतीची आहे.

या देशांतील हवेमध्यें वरचेवर फेर पडतो. सर्द आणि धुकट हवा बहुधा फार असत्ये; जून, ज्युलै व आगस्त या महिन्यांत कधीं कधीं फार गरमी होत्ये; आणि डिसेंबर व त्यानुवरीचे सुमारास थंडी फार पडत्ये.

खाणींचा कोळसा हें इंग्लंडांतील एक मुख्य उत्पन्न आहे. हा उत्तरेकडील व पश्चिमेकडील प्रांतात फार सांपडतो. लोखंडही येथें पुष्कळ होतें. तें बहुधा स्ताफर्डशायर व दर्बीशायर यांमध्यें सांपडतें; कथील कार्नवाला मध्यें; आणि शिसें व तांबें उत्तर व पश्चिम भागीं सांपडतें.

इंग्लंडात पदार्थ तयार करण्याचे कारखाने अतिशय आहेत. हे चालवण्यामध्यें वाफेचा उपयोग फार करतात तेणें-करून उपउक्त पदार्थ पुष्कळ व फारच चांगले होतात. असें झाल्यानें इंग्लंदांत जितका व्यापार फार होतो तितका पृथ्वी मध्यें दुसरे कोठें होत नाहीं. मुख्य कारखाना कापसाच्या वस्त्रांचा आहे. तो मुख्यत्वें करून मांचेस्तर एथें चालतो. धातूंच्या जिनसा बर्मिङ्हाम येथें होतात. लोकर, रेशिम, नाग व मातीचीं भाडीं याचे कारखानेही फार आहेत. शेफील्द येथें शस्त्रें व इतर लोखंडी सामान चांगलें होतें. लीदस एथें, लोंकरीचीं वस्त्रें चांगलीं होतात; आणि लिवरपूल येथें तारवें व व्यापार पुष्कळ चालतो.

इंग्लिश लोक हे पदार्थ बाहेर पाठऊन त्यांचे मोबदला धान्य, द्राक्षांची दारू, तंबाकू व दुसरे आपल्या निर्वाहास व ख्यालीखुशालीस उपयोगी असे पदार्थ आणतात.

या देशांतील रहदारी चांगली चालण्यासाठीं सडका, लोखंडी रस्ते व कालवे पुष्कळ बांधले आहेत; व ते इतके पसरले आहेत कीं, या तिहीं पैकीं एकही जवळ नाहीं असें मोठें शहर मुळींच नाहीं.

इंग्लंदाची राजधानी लंदन ही तेम्स नदीवर आहे. सर्व पृथ्वीं मध्यें याचा विस्तार व महत्व मोठें आहे. या शहरांत

जितक्या चांगल्या व वाईट गोष्टी आहेत तितक्या दुसऱ्या कोठें नाहींत. लदन शहरच ह्मटलें असतां फार मोठें नाहीं, परंतु हें वाढत वाढत गेल्यानें याचे आसपासचे गाव ही यास मिळाले आहेत, तेणेंकरून तें मोठें झालें आहे. सर्व मिळून याचा विस्तार सुमारें सत्तावन कोश चौरस आहे; यात सुमारें तेवीस लक्ष मनुष्यें आहेत. दाट वस्तीमुळें घरें फार उच बांधावी लागतात; व तीं बहुधा पक्कीं मजबूत बांधलेलीं असतात. उगीच देखणाऊ नसतात. घरें फार उच असल्यामुळें रस्त्यांत उजेड फार पडत नाहीं, परतु रात्रीं वाफेच्या दिव्यांनीं चकचकाट झाले ला असतो. श्रीमत लोकांचीं घरें पश्चिम भागीं आहेत.

सर्व शहरामध्यें वेस्तमिन्स्तरआबे व सेंतपाल्सक्याथीड्रल ह्या देवळांच्या इमारती फार सुंदर आहेत. क्याथीड्रल हें उच ठिकाणीं आहे. याचा घुमट शहरांतील सर्व इमारतींचे शिखरापेक्षा उच आहे. पार्लमेंतसभेचीं मंदिरें तेम्स नदीच्या किनाऱ्यावर आहेत. त्यांची बांधणूक सुंदर आहे. बाकी सरकारी इमारती. मुख्य पेढी, पदार्थसंग्रहालय, व्यापाऱ्यांची जमण्याची मुख्य जागा आणि इंदियाहौस (हिंदुस्थानच्या राज्यकारभारासाठीं बांधलेली इमारत) हीं मुख्य आहेत. लदनाचा किल्ला हा फार जुना तेम्सनदीच्या किनाऱ्यावर आहे. एथें पूर्वी मोठे अब्रूचे गुन्हेगारांस ठेवीत असत. पांचवा एदवर्द, त्याचा धाकटा भाऊ, आनाबोलान, आठव्या हेनरीची एक स्त्री, तामस क्रामवेल, सरतामस मूर, लेदी जेन ग्रे व आणखी पुष्कळ मोठ मोठाले लोक येथें मारले गेले.

लदनाच्या खालीं तेम्सनदीवर जवळच ग्रीनिच आहे. तेथें घायाळ व वृद्ध झालेल्या खलाशांसाठीं मोठमोठाले दवाखाने

आहेत व सरकारी वेधशाळा आहे. इंग्रेज व कांहीं इतर ज्योतिषी एथून रेखांश मोजतात.

इंग्लंदांत लंदनाच्याखालोखाल यार्क हें शहर आहे. एथें एक देऊळ आहे. त्याची इमारत सर्व पृथ्वींतील प्राचीन इमारतीं पैकीं आहे.

आक्सफोर्ड व केंब्रिज यादोन विद्येच्या मोठ्या जागा आहेत. आक्सफोर्डामध्यें एक उत्कृष्ट पुस्तकालय आहे.

विद्यालयाशिवाय इतन, विंचेस्तर, रगबी, हारो आणि लंदनामध्यें वेस्तमिन्स्तर एथें श्रीमंत लोकांच्या मुलांसाठीं मोठ्या शाळा आहेत. पोर्तस्मथ व प्लिमथ हीं दोन आरमाराचीं मुख्य ठिकाणें आहेत. पोर्तस्मथ याच्या पश्चिमेस सौथाम्पतन आहे; तेथून हिंदुस्थानाच्या डांकेच्या मोठ्या आगबोटी निघतात.

तेम्स नदी ग्लास्तर परगण्यांतून निघून जर्मन समुद्रास मिळते. सेवर्न वेल्स प्रांतामधून निघून ब्रिस्तलच्या सामुद्रधूनीस मिळते. याशिवाय त्रेन्त, औस आणि मर्सी ह्या इंग्लंदांत मुख्य नद्या आहेत.

## वेल्स.

हा एक इंग्लंदाच्या पश्चिमेस लहानसा देश आहे. या देशावरून इंग्लंदाच्या वडील राजपुत्रास वेल्साचा राजा असें नाव पडलें आहे. हा डोंगरी व सुंदर देश आहे, परंतु यांतील पर्वत सखल आहेत.

वेल्स देशामध्यें कोळसा, लोखंड, स्लेटी आणि तांबें यांच्या मोठ्या खाणी आहेत. या प्रांतांत लोंकरीच्या वस्त्राचा कारखानाही बराच आहे.

स्नोडन, क्यादर इद्रिस व प्लिनलीमन हे यांत मुख्य पर्वत आहेत.

## स्कातलंद.

स्कातलंदाच्या उत्तरेस आतलांतिक सागर, पूर्वेस जर्मन समुद्र, दक्षिणेस इंग्लंद आणि पश्चिमेस नार्थसामुद्रधुनी व आतलांतिक सागर आहे. हा बहुधा डोंगरी देश आहे. यांतील मुख्य पर्वत पूर्व पश्चिम जातो. याचें नाव **ग्रांपियन**. याचें अति उच्च शिखरास **बेननेविस** म्हणतात. यादेशाचे तीन निरनिराळे भाग आहेत. हैलंदस (उच्च भाग), **लोलंदस** (सखल भाग), आणि आसमंतातील बेटें. इग्लद आणि **फर्थ** व **क्लाईद** या नद्यामधील प्रदेशाला लोलंदस असें म्हणतात. कारण उत्तरेकडील भागापेक्षां हा सखल आहे. हैलंदस यामध्यें हवा फारथंड व यांतील भूरचना फार रानवट व मनोरंजक आहे.

स्कातलंदाच्या पश्चिमेस पुष्कळ बरीच मोठीं बेटें आहेत, त्यापैकीं स्टाफा म्हणून एक लहानसें आहे त्यांत कांहीं चमत्कारिक गुहा आहेत. सर्वांत उत्तरेस जो बेटांचा जमाव आहे त्याचें नाव **ब्रिदीस**. **आर्कनी** व **शेतलंद** हे दोन बेटांचे झुबके उत्तरेस आहेत. हीं भणभणीत, नापीक व ओसाड आहेत, आणि तेथील हवा फार थंड आहे.

लोखंड, कोळसा, व शिसें हीं इंग्लदापेक्षां यांत फार सापडतात. **ग्लासगो** व **पेसली** येथें कापसाच्या वस्त्रांचे मोठाले कारखाने आहेत, आणि **दंदी** व **दफ्रीस** येथें तागाच्या वस्त्राचे आहेत. याच्या पूर्व व उत्तर किनाऱ्यावर पुष्कळ व किंमतदार मासे भरतात. **हैलंदस** व कांहीं दक्षिणेंतील परगण्यात लोक गुरें व मेंढे पुष्कळ पाळतात.

स्कातलंदातील मुख्य शहर **एदिंबरो** हें याच्या अग्नेयीस

आहे याच ठिकाण चांगले आहे व हें सुंदर शहर आहे. ग्लासगो यांत लंदन व लिवरपूल खेरीज करून ग्रेटब्रितनातील सर्व शहरापेक्षा अधिक वस्ती आहे. हें स्कातलंदातील व्यापाराचें मुख्य ठिकाण आहे. आबर्दीन, दंदी आणि ग्रीनाक हीं मोठीं बंदरें आहेत. ते, स्वींद, फोर्थ व क्लाइर्द या स्कातलदांत मुख्य नद्या आहेत. शेवटील दोहोंच्यामध्यें एक कालवा खणिला आहे, तेणें करून अतलांतिक महासागर व जर्मनसमुद्र हे मिळाले गेले आहेत

या देशांतील सरोवरें फार प्रख्यात आहेत. त्याचे आसमंतातील जलतृणवृक्षादि रचना फार सुंदरआहे. यांत लाकलोमंद, लाकते आणि लाकनेस हीं मुख्य सरोवरें आहेत.

## ऐरलंद.

ऐरलंद इंग्लंदाच्या पश्चिमेस आहे. या दोहोंच्यामध्यें सेंतजार्जची खाडी आहे. या देशाचा बहुतेक भाग सपाट आहे, परंतु नैर्ऋत्येस केरी, अग्नेयीस लीनस्तर आणि उत्तरेस आंत्रीम हे परगणे उच व खडकाळ आहेत. सपाट भागांत पीत अथवा कुजलेल्या झाडानीं भरलेल्या मोठ मोठाल्या जागा आहेत. ह्यातील पदार्थ सुकाविला ह्मणजे जळणाच्या उपयोगी पडतो. या बेटांत कोळसा, लोखंड, शिसें व तांबें अनेक ठिकाणीं सांपडतें. एथील जमीन चांगली पिकाऊ आहे. बटाटे हे यातील मुख्य उत्पन्न आहे. पुष्कळ गोरगरीब लोक फक्त याजवरच उदर निर्वाह करतात. या देशाचा सर्व किनारा अनेक आखातें, उपसागर व खाड्या यानीं कापल्यासारखा आहे. येणेकरून समुद्रापासून दूर अशीं ठिकाणें फार थोडीं आहेत.

ऐरलंदाचे चार मुख्य भाग केले आहेत. त्याचीं नांवें, अलस्तर, लीनस्तर, मंनस्तर आणि कानात.

यातील मुख्य शहर दब्लिन हें पूर्वेस लिफीच्या कांठीं आहे. हें सुंदर शहर आहे. यांत चागले रूद रस्ते व सुदर इमारती आहेत, येथें व्यापार पुष्कळ चालतो. या शहरांत एक प्रख्यात विद्यालय आहे त्याची स्थापना इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत झाली. यातिल दुसरें शहर कार्क हें दक्षिणेस आहे. याचें ठिकाण रमणीय आहे. यातील बदर ब्रितनांतील चागल्या बदरांपैकीं आहे. याला क्वीन्सताऊन असें नाव दिलें आहे उत्तरेकडे बेलफास्त आहे. येथून आसमनांतील बेटें व इतर देशा बरोबर पुष्कळ व्यापार होतो. याच्या पश्चिमेस लदनदरी आहे. येथें सन१६८९ त एक प्रख्यात लढाई झाली, यांखेरीज लिमरिक, वातरफोर्द, व गाल्वे हीं मोठीं शहरें आहेत.

शानन, बारो, बाईन व लिफी या यांत मुख्य नद्या आहेत. या सर्वांत सामन हे मासे पुष्कळ सापडतात.

## फ्रान्स.

फ्रान्साच्या उत्तरेस, ब्रितिशखाडी व बेलजियम, पूर्वेस जर्मना, स्विनत्सरलद व इताली; दक्षिणेस पिरनासपर्वत व भूमध्य समुद्र; आणि पश्चिमेस आतलांतिक महासागर आहे. हा बहुधा सपाटदेश आहे, मध्य भागीं उच्च व सपाट जमीन आहे. दक्षिणेस, पिरनीस पर्वत व आग्नेयीस आल्प्स पर्वत आहे. यांतील हवा आरोग्य कारक असून फार थड नाहीं; उत्तरेस इंग्लदा प्रमाणे आहे, परतु दक्षिणेकडे ती उष्ण होत जात्ये व तसाच उत्पन्नाचाही प्रकार आहे. उत्तरेस गहू, सातू व इतर धान्यें होतात. आणि दक्षिणेस द्राक्षें, नारिंगें वगैरे फळें होतात. यांत खनिज पदार्थ पुष्कळ

निघतात, त्यांपैकीं लोखंड, तांबें, शिसें व सुर्मा हीं मुख्य आहेत. यांत कोळसा जितका सांपडतो तितका इंग्लंडांत ही नाहीं.

रेशमाचीं लोकरीचीं व तागाचीं वस्त्रें, फीत, आणि मातीचीं भांडीं हे जिन्नस येथें मुख्यत्वें करून तयार होतात. येथें वैन व ब्रांदी हीं दोन द्राक्षांचीं मद्यें चांगलीं होतात. तीं सर्व युरोपभर खपतात.

फ्रेंच लोक चांगल्या स्वभावाचे आनंदी व मौज मारणारे आहेत; परंतु निश्चयी नाहींत; फारच लौकर बदलतात. सन १७८९ दां पासून याच्या राज्य रीतींत अनेक फार फेर झाले आहेत. सांप्रत येथें एक बादशाहा आहे. त्याचें नाव **लुईस नेपोलीयन**. हा आपले मर्जीस येईल त्याप्रमाणें अंमल चालवितो. प्रख्यात जो नेपोलियन बोनापार्त त्याचा हा पुतण्या होय. फ्रेंच लोक लढाऊ आहेत. फ्रान्स देशामध्यें पूर्वी पासून पुष्कळ सेना आहे, आणि लोक डाम डौली असल्यामुळें या सेनेनें लढाया मारल्या यांत त्यांना मोठा अभिमान वाटतो.

याची राजधानी **पारिस** ही उत्तरेकडे **सेन** नदीच्या कांठावर आहे. हें फार छादार व महत्वाचें शहर आहे. **लायन्स** आग्नेयीस र्‍होन नदीवर आहे. रेशमाच्या वस्त्रांचे कारखाने, इमारती, पुरातन ठिकाणें व पुस्तकालयें यां विषयीं हें प्रख्यात आहे. याशिवाय **र्‍हीम्स**, **स्त्रासबुर्ग**, **एमियन्स** **ओरलियन्स**, जेथें **जोन-आवआर्क** इंग्रेजा बरोबर लढली, **बोरदो**. **ग्यारोन** नदीच्या मुखा जवळ, आणि भूमध्य समुद्रावर **मारसेल्स** हीं मोठीं शहरें आहेत **तुलों** व **ब्रेस्त** हीं आरमाराचीं ठिकाणें आहेत.

**सेन**, **लायर** **र्‍होन** आणि **ग्यारोन** ह्या यांत मुख्य नद्या आहेत. वर सांगितलेल्या पर्वतां शिवाय **सिव्हनीस** आणि **आवरन** आग्नेयीस आहेत.

# स्पेन.

स्पेनाच्या पुर्वेस भूमध्य समुद्र, दक्षिणेस भूमध्य समुद्र व जि. ब्राल्तरची सामुद्र धुनी, पश्चिमेस पोर्तुगाल देश व आतलांतिक महासागर; आणि उत्तरेस बिसंकेचें आखात व फ्रान्स आहे.

स्पेन हा डोंगरी देश आहे. याच्या व फ्रान्सच्या मधील पिरनीस पर्वत फार चांगला आहे. यांत मलादेता आणि परदू हीं दोन मोठीं उच्च शिखरें आहेत. यांतील वाटा उभ्या व दग-डांनीं भरलेल्या आहेत. खोरीं फार खोल आहेत, परदू शिखराज वळील अदेसा हें ३१०० फूट खोल आहे. याच पर्वताचा एक फाटा स्पेनाच्या उत्तरेकडे जाऊन बिस्केच्या आखाताशीं समांतर गेला आहे. त्याचें नाव आसतुरियन. दुसरा एक फांटा दक्षि-णेकडे भूमध्य समुद्राशीं दीगाता भूशिरा पर्यंत जातो. याखेरीज क्यासतिलियन, साएराआवतोलीदो, साएरामोरीना, आणि साएरानिवादो हे याचे फाटे आहेत. ही शेवटचीरांग सुंदर वनस्पतींनीं व बर्फानें आच्छादलेली असत्ये. या सर्व पर्वतांमधील खोऱ्यातून मोठ मोठाल्या नद्या वाहतात साएरानिवेदा आणि भू-मध्य समुद्र याच्यामध्यें एक खोरें फार सुंदर आहे, व या पर्वताच्या मध्य भागीं ग्रनेदा शहर आहे. यांत मूर लोक जेव्हा राज्य करीत होते तेव्हांची पुष्कळ चमत्कारिक पडझड आहे. त्याचे राजाचें मोडकें राजमदार अजून एथें नजरेस पडतें.

स्पेनामध्यें झाडें चांगलीं होतात. उष्ण देशांतील कित्येक झाडें एथें आणून लावलीं आहेत, तीं हीं चांगलीं होतात. बुचा-चीं झाडें, सुरू व दवणा हीं यांत चांगलीं होतात. आलिव, द्राक्षें, नारिंगें, लिंबें वगैरे फळें पुष्कळ होतात. गहूं, सातू, भात, मका, आणि ऊसही होतो.

स्पेनाची हवा बहुधा उष्ण आहे त्यांतही दक्षिणेस फार उष्ण आहे. मध्यभागीं जी उच्च जमीन आहे तेथें आरोग्यकारक आहे. बिस्केच्या आखाता जवळील प्रांतांत थंड असते या देशाच्या हवेंत द्राक्षें फार चांगली होतात यामुळें त्याच्या दारूचा खप जिकडे तिकडे आहे. ही दारू केदीझ जवळ झीरास एथें फार उत्तम होते. तिला शेरी ह्मणतात. यादेशात चांगली लोंकर ही पुष्कळ निघते. आन्दालूशिया प्रांतांत घोडे चांगले निपजतात, व बैलही एथें मोठे व तापट होतात.

लोखंड, शिसें आणि पारा हे मुख्य खनिज पदार्थ या देशात होतात. कृतीनें केलेले पदार्थ व व्यापार एथें फार होत नाहीं. द्राक्षासव, लोंकर व रेशीम याचा कायतो मुख्य व्यापार. पूर्वी या देशाचा व्यापार फार चांगला होता, व हे लोक युरोपातील प्रमुख लोकांपैकी होते. अमेरिकेंतील सर्व संपत्ति पूर्वी इकडे सच्च येत असे. कोलंबस यास प्रथम मदत एथील राजानें दिली, व याच लोकांचें प्रथम अमेरिकेमध्यें राज्य झालें. परंतु त्या नंतर हें सर्व महत्व जाऊन हा देश आतां यःकश्चित् होऊन पडला आहे. येथें राजा राज्य चालवितो यातील धर्म रोमन क्याथलिक आहे. लोक डौलदार गंभीर व फारच आळशी आहेत.

याची राजधानी माद्रीद ही मध्यभागीं उच्च जमीनीवर आहे. सेवैल शहर गादलक्वीवीर यानदीवर पिकाऊ व सुखी भागांत आहे. नैर्ऋत्येस केदीझ, दक्षिणेस मलागा, व पूर्वेस आलिकांती, वालेनशिया, आणि बार्सीलोना हीं मोठीं व्यापाराचीं शहरें आहेत. सारागोसा याला जेव्हां नेपोलियनबोनापार्ते याणें वेढा घातला तेव्हां एथील लोक मोठ्या धैर्यानें लढले. भूमध्य समुद्रांत जाण्याच्या द्वाराजवळ एका उंच व मजबूद ठिकाणावर

जिब्राल्तर किल्ला आहे; तो इंग्रेजांनीं स्पानिश लोकांपासून सन इसवी १७०४ मध्यें घेतला. तो परत घेण्याविषयीं त्यांणीं फार प्रयत्न केले, परंतु ते सर्व व्यर्थ गेले. हा सर्व युरोपांत मजबूद किल्ला आहे.

एब्रो, दूरो, तेगस, गादीयाना, आणि गादलकीवीर या या देशांत मुख्य नद्या आहेत.

या देशाच्या पूर्वेस पुष्कळ बेटें आहेत, त्यांस बालियारिक बेटें असें ह्मणतात. मजोरका आणि मिनोरका हीं दोन यांतील मुख्य होत.

पृथ्वीच्या इतर भागा मध्यें या देशाचें जें पूर्वी मोठें राज्य होतें त्या पैकीं आता केवळ इंडियांतील क्युबा व पोर्तोरायो, आणि पासिफिक सागरांतील फिलिपैन व लेड्रोन हीं बेटें मात्र याच्या अमलांत राहिलीं आहेत.

१०७१८

## पोर्तुगाल.

पोर्तुगालाच्या राज्याच्या पूर्वेस व उत्तरेस स्पेन आहे; आणि दक्षिणेस व पश्चिमेस आतलांतिक सागर आहे. पोर्तुगाल आणि स्पेन मिळून युरोपाचे नैर्ऋत्येस एक मोठें द्वीपकल्प आहे. या दोहोंच्या मध्यें एकसारखी स्वाभाविक सीमा नाहीं.

हा देश सर्वप्रकारें स्पेनाचाच अंश असें दिसतें. याची हवा त्याप्रमाणेंच आहे, व हा डोंगरी ही त्याप्रमाणेंच आहे. याच्या मुख्य नद्या ही त्यांतील नद्यांचीं शेवटें आहेत. स्पेनामधीलच फळें वगैरे एथें होतात.

पोर्तुगालांत शेतकी व कृतीनें पदार्थ करण्याचे कारखाने चांगले नाहींत. द्राक्षासव, तेल, फळें, मीठ व बुचें हे जिन्नस मुख्यत्वें करून एथून बाहेर जातात. दूरो नदीच्या मुखाजवळ ओपोर्तो

शहराचे आसपासच्या मुलखातून जी द्राक्षाची दारू येते ती फारच प्रख्यात आहे. या शहरावरून हिला पोर्तवैन असें नाव पडलें आहे. पूर्वी पोर्तुगाल देशाचा व्यापार व महत्व मोठें होतें. अमेरिका व हिंदुस्थानांत याच्या ताब्यांत मोठा मुलूख होता; परंतु आता हें सर्व गेलें, आणि आफ्रिकेमध्यें काहीं ठिकाणें, हिंदुस्थानांत गोवें, चिनांत मकाव; मदीरा, केपवर्द व आझोरबेटें हीं मात्र यांच्या ताब्यांत राहिलीं आहेत. एथील राज्यरीति, धर्म व लोक स्पेनांतील लोकाप्रमाणेंच आहेत, परंतु उत्तरे कडील प्रजा दक्षिणे कडच्यापेक्षा कांहीं चांगली आहे.

याची राजधानी **लिसबन** पश्चिम किनाऱ्यावर **टेगस** नदीच्या मुखाजवळ आहे. एथील बंदर विस्तीर्ण व चमत्कारिक आहे सनइसवी १७५५ त एथें मोठा भूमिकंप होऊन शहर अगदीं ओसाड पडलें होतें. याच्या आसमंतात लहान मोठे भूमिकंप वारंवार होतात. ओपोर्तो हें लिसबनाचे खालोखाल मोठें शहर आहे. **कोइंब्रा** व **एलवारो** या विद्येच्या जागा आहेत.

**दूरो**, **मादीगो** आणि **टेगस** या यांत मोठ्या नद्या आहेत. **सायरादीएस्त्रेला** ही यांत पर्वताची रांग आहे.

## स्विस्सलँद.

याच्या उत्तरेस जर्मनी, पूर्वेस आस्ट्रिया, दक्षिणेस इताली आणि पश्चिमेस फ्रान्स आहे. हा फार डोंगरी व सुंदर देश आहे मोठमोठाले पहाड, बर्फानें भरलेले पर्वत, सुंदर सरोवरें, सपाट्यानें वाहणाऱ्या नद्या, पिकाऊ खोरीं वगैरे सर्व प्रकारची जलतृण रचना व हवा एथें नजरेस पडते. उच्च पर्वतांच्या शिखरावर बर्फ व खोल खोऱ्यांत स्पेन व इताली इतकी उष्णता एकाच काळीं आढळ

त्ये अजीर द्राक्षें व आलिव एथें फारच चांगली होतात.

यादेशात आल्प्स हा मुख्य पर्वत आहे. हा याच्या दक्षिणेस, आग्नेयीस व याच्या दक्षिण भागाच्या मध्यें आहे. मौंक ब्लांक युरोपामधील सर्वांत उच पर्वत, हा या देशाच्या सीमेवर-सार्दिनियाप्रांतांत आहे. आल्प्स पर्वताचा मुख्य फांटा या शिखरापासून तों तायरोल पर्यंत जातो. प्रख्यात सेंत बर्नार्द शिखर यांतच आहे. यावर दयाळु व साधे भोळे मठाधिपति राहतात; तेथ त्याचे कुत्रे बर्फांत गढून गेलेल्या प्रवाशास सोधून काढून त्यांचें चांगलें सागोपान करून त्यांचा जीव बचावतात. मौंतरोझा प्रख्यात सिंप्लनमार्ग, आणिमौंतसेनगोथार्द हेही याच्च फांट्यामध्यें आहेत. वाले परगण्याच्या उत्तरेस जो फाटा आहे, त्यांत जंगफ्रा व कहार्न हे पर्वत आहेत; या पर्वतांवरून बर्फ कधीं कधीं खालीं कोसळून फार नाश होतो. बर्फाच्या ज्या धोंडी वरून येतात त्यांना आवलांशीस ह्मणतात.

सुदर सरोवरें ही एक यादेशांतील दुसरी विशेष गोष्ट आहे. जिनीवा, न्यूच्यातेल, लूसर्न, झूरिच आणि कानस्तन्स हीं यांपैकीं प्रख्यात आहेत, युरोपांतील पुष्कळ मोठमोठाल्या नद्यांचा उगम या देशांत आहे. व्हैन कानस्तन्सच्या सरोवरातून जाऊन यादेशाच्या उत्तर सीमे जवळून जात्ये.

स्वित्सलंदांतील जमीन फार मेहेनतीनें पिकवतात. परंतु यालोकास उदर निर्वाहाचा मुख्य आधार गुरें आहेत. आल्प्स पर्वतांत लोखंड, रुपें, तांबे व शिसें यांच्या खाणी आहेत, परंतु या देशाच्या डोंगरी स्वरूपवरून खनिज पदार्थांचें उत्पन्न जितकें असावें असें वाटेल तितकें होत नाहीं. रेशमाचीं, कापसाचीं व लोंकरीचीं वस्त्रें, व घड्याळें हे मुख्यत्वेंकरून पदार्थ यांत तयार होतात.

स्विस लोक साधे, मितव्ययी, शूर व उद्योगी आहेत. स्वदेश प्रीति यांचे ठाईं फार आहे,व ते दूर गेले तथापि ती जात नाहीं यात कित्येक मोठे धीट व वाकबगार पारधी आहेत; ते हरणाचा पाठलाग मोठ्या भयंकर व अडचणीच्या मार्गांनीं ही करतात

याना स्वतन्त्रता आवडते, यांचा देश जरी परराज्याचे अमलाखालीं अनेकवेळा गेला तरी यांणीं तितक्याही वेळां त्यांजवळून हिसकावून घेतला. चवदाव्या शतकामध्यें तेल ह्मणून जो यांचा मोठायोद्धा, त्याच्या मसलतीनें आस्ट्रियाच्या अमलांतून त्याणीं आपली सुटका करून घेतली. तेव्हांपासून तेथें प्रजासत्ताक राज्य स्थापन झालें आहे. या देशाचे बावीस परगणे आहेत, त्यांत निरनिराळे स्वतन्त्र अम्मलदार आहेत, परंतु परचक्र आलें असता सर्वांनीं एकमेकांस मदत करावी असा ठराव आहे.

**बर्न** व **लासेन** हीं शहरें आहेत. दुसरें जिनीवा सरोवराजवळील अरण्यानें भरलेल्या टेंकडयावर सुंदर रीतीनें वसलेलें आहे **बाल** येथें एक प्रख्यात विद्यालय आहे. **झूरीच** हें त्याच नावाच्या सरोवरावर आहे. **लूसर्न**, **फ्रिबुर्ग**, **न्यूफातेल**, आणि **र्‍हैन** व **आर्न** या नद्याच्या संगमाजवळ व जिनीवा सरोवराच्या शेजारीं **कालविन** व इतर कीर्तिमान लोकाचें जन्म भूमीचें स्थान जिनीवा, हीं या देशात मोठीं शहरें आहेत.

इगेरी सरोवराचे पूर्वेस **मारगरतन** पर्वत आहे, तेथें १६०० स्विस लोकांनीं २०००० आस्ट्रियन लोकास पळवून स्वदेशाच्या स्वातंत्रतेचा पाया घातला.

## इताली.

इताली हें सुंदर वांकडें तिकडें द्वीपकल्प भूमध्य समुद्रात आहे; याच्या उत्तरेस स्वित्सरलंद व आस्ट्रिया, पूर्वेस आद्रिया

तिक समुद्र; दक्षिणेस भूमध्य समुद्र; व पश्चिमेस भूमध्य समुद्र व फ्रान्स आहे. मौंतब्लांक जास पर्वताचा राजा असें ह्मटलें आहे त्यापासून अल्प्स पर्वत वाकडया तिकडया रीतीनें दक्षिणेकडे सेवाय आणि पियेदमौंत यांमधून जातो. एथें त्यास ग्रेयन आणि कात्यन आल्प्स असें ह्मणतात. नंतर तो नागमोडी प्रमाणें पूर्वेस जिनोवाच्या आखाताशीं किनाऱ्याजवळ जवळ जातो. एथें याला मारितिम आल्प्स असें ह्मणतात, व पुढें दक्षिणेकडे इतालींत शिरला ह्मणजे आपिनैन ह्मणतात. हा पुढें सर्व इतालींतून जातां नेपल्स शहराजवळ याचे दोन फांटे होतात, त्यांतून एक पूर्वेकडे व एक पश्चिमेकडे जातो. हा पर्वत फार उंच नाहीं, आणि आल्प्स पर्वतापासून जरी निघाला आहे तरी याचीं शिखरें त्यापासून भिन्न, वाटोळीं व निटस अशीं आहेत.

या देशाच्या रचनेच्या सौंदर्याचें वर्णन करूं लागणें व्यर्थ आहे. तें करण्यास भाषा पुरावयाची नाहीं. इतकेंच ह्मणणें पुरे आहे कीं, ही रचना फारच सुंदर व मनोरंजक आहे. एथील हवा उष्ण व फारच आनंदकारक आहे; परंतु दक्षिणेस कधीं कधीं उष्ण होते आणि पश्चिम किनाऱ्याजवळ पाणी भरल्यानें काहीं काळ रोग भरित होये.

इताली देशांतील जमीन पिकाऊ आहे. द्राक्षें, आलिव, मका व भात पुष्कळ पिकतें. तसेंच थंड हवेंतील झाडें व जिन्नस ही होतात. पुष्कळ ठिकाणीं डोंगरावर कुरणें चांगलीं आहेत लांबर्डी व पारमा यांत उत्तम पन्हेर होते. दक्षिणेस ऊस व कापूस होतो. संगमरवरी दगड फ्लारेन्स शहराजवळ व दुसऱ्या इतर ठिकाणीं उत्तरेकडे निघतो.

या देशांत पदार्थ नवीन करण्याचे कारखाने फार थोडे

आहेत, व व्यापाराचे जिनसही फार नाहींत; गोड वैन, रेशीम व आलिवतेल हे मुख्य आहेत.

इताली प्राचीन काळापासून कारागिराविषयीं प्रख्यात आहे. ह्या देशांतील भाषा मंजूळ आहे, व इचें कवन सहज होतें.

## ग्रीस.

ग्रीस देशाच्या पूर्वेस ग्रिशन आरकिपेलेगो, ह्मणजे युनानी बेटांचा समूह, दक्षिणेस व पश्चिमेस भूमध्य समुद्र, आणि उत्तरेस तुर्की आहे. भूमध्य समुद्रामध्यें जाणारें मोरीया द्वीपकल्प, उत्तर ग्रीस ह्मणजे पूर्वेस वोलो याच्या आखातापासून तों पश्चिमेस भारता याच्या आखातापर्यंत प्रदेश; पूर्वकिनाऱ्या जवळील लांब व अरुंद नेग्रेपांत बेट, आणि सायक्लेदस, हा आरकिपेलेगो बेटां पैकीं झुबका, हे प्रांत या देशांत आहेत.

ह्यादेशांत महान लाहान डोंगर बरेच आहेत. याच्या जवळील तुर्कीच्या भागांतील पर्वत आग्नेयी दिशेनें इकडे येऊन उत्तर ग्रीसांमधून जातात. मोरिआ हे टेंकड्याचें वर्तूळ व त्यांच्या मध्यभागीं उंच सपाटजमीन याणीं झालेलें आहे. या उंच जमीनींतील हवा सर्वोत्कृष्ट आहे. ग्रीस देशांतील टेंकड्या व खोरीं यांतील जलतृणवृक्षादि रचना फार सर्वोत्कृष्ट आहे. ईश्वरानें एथें निवडक वस्तु करून ठेविल्याआहेत असें दिसतें.

एथील उत्पन्न पुष्कळ प्रकारचें आहे. नारिंगें, लिंबें, महाळुंगें, अंजीर, द्राक्षें, आलिव, दवणा इत्यादि झाडें व फळें फार चांगलीं होतात. बदाम व डाळिंबें याच्या पश्चिमेस होत नाहींत आणि जीं कित्येक फुलें थंड हवेमध्यें करण्यास फार जपावें लागतें तीं एथें आपोआप रुजतात. मोरियांत तुतीचीं झाडें पुष्कळ

होतात. प्राचीन काळच्या ग्रीक भाषेमध्यें या झाडास मोरिया ह्मणत व त्यावरून या प्रांताचें नाव पडलें आहे असें ह्मणतात. ग्रीसामधील मध प्रख्यात आहे. यात कृतीनें करण्याच्या वस्तूचे कारखाने अथवा कृषिकर्म फार नाहीं. याचा व्यापार आलीकडे बराच वाढत चालला आहे.

प्राचीनकाळीं ग्रीस हा पृथ्वीवर फार प्रख्यात देश होता. याचीं पुष्कळ स्वतंत्र संस्थानें झालेलीं होतीं; त्यां पैकीं आथेन्स आणि स्पार्टा हीं मुख्य होत. हे लोक शौर्य व स्वदेशाभिमाना विषयीं प्रख्यात होते; त्यात विशेषें करून आथेन्स हें शिल्पविद्या-चीबुध्धि, वक्त्याचें वक्तृत्व व ग्रंथ कारांची लिहिण्याची शैली या विषयीं विख्यात होतें.

आता ग्रीक लोक नीचदशेस आले आहेत. तुर्कलोक त्यांजवर शेंकडों वर्षें पर्यंत जुलूमकरीत होते, तेणेंकरून पूर्व स्थिती-वर येण्याची त्यांची हिंमत नाहींशी झाली. सन इसवी १८२१त हे लोक आपल्या जुलूम कर्त्यांवर उठले, आणि आपल्या स्वतंत्रते विषयीं काहीं वर्षें पर्यंत सतत निश्चयानें लढले. पुढें इंग्रेज, फ्रेंच व रुशिअन लोकांच्या मदतीनें विजयी झाले, आणि बवेरियाचा रा-जा तेथें स्थापन झाला व काहीं दिवसांनीं तो राज्यरीति आणखीं सुधारली गेली, तथापि हे लोक जसे सुधारतील असें पूर्वी वाटलें होते तसे सुधारले नाहीत. राज्यामध्यें नेहेमी अंदाधुंदी चाललें-ली असते.

याची राजधानी आथेन्स ही एका लहान द्वीपकल्पाच्या पूर्व भागीं आहे. या शहराचें प्राचीन काळचें सौंदर्य अद्याप गेलें नाहीं; देवळें व इतर इमारती यांचा शेषभाग अजून नजरेस पडतो. इतर सर्व विख्यात शहरें मोडून त्याचे ठिकाणीं लहान

लहान खेडीं उरलीं आहेत. मोरियामध्यें त्रिपोलिझा हा मोठा गाव आहे.

ग्रीसांत **फारनेसस** हा मुख्य पर्वत आहे. एथें रंभा राहतात असें प्राचीन लोक समजत असत.

आरर्कीपेलेगो मध्यें जीं अनेक बेटें आहेत तीं सर्व बहुधां सुंदर आहेत; त्यांत सर्व प्रकारचीं फळें व फुलें पुष्कळ होतात. यांपैकीं **पेरास** एथें उत्कृष्ट संगमरवरी दगड निघतो; आणि नेक्सास यांत चांगली वैन दारू व जवाहिर साफकरण्याचा कुरुंद होतो.

## आयोनियनबेटें.

ग्रीस व आल्बेनिया याच्या पश्चिमेकडील **कार्फ्यू**, **पक्सो**, **सांतामारा**, **इथाका**, **सेफेलोनिया**, **झांती**, व मोरियाचे दक्षिणेकडील **सेरीगो** हीं सर्व बेटें मिळून इंग्रेजाचे आश्रया खालीं एक प्रजासत्ताक राज्य आहे. कार्फ्यू एथें इंग्रेजी फौज असते. हीं सर्व बेटें खडकाळ आहेत. यातील मुख्य उत्पन्न द्राक्षें व फळें आहेत.

## युरोपांतीलतुर्की.

युरोपांत तुर्की हामात्र मुसलमानी देश आहे. याच्या उत्तरेस हंगरी; ईशान्येस रुशिया; पूर्वेस तुर्कीसमुद्र, **बासफरस**, मारमोराचा समुद्र व **दार्दनेलास** सामुद्रधुनी; दक्षिणेस आरर्कीपेलेगो व ग्रीस; आणि पश्चिमेस आद्रियातिक समुद्र व **डालमेशिया** प्रांत आहे. या मध्यें पश्चिमेकडून पूर्वेस जाणारा एक लांब पर्वत आहे, व त्याला फांटे फुटले आहेत. **दिनारिकआल्प्स** हा पर्वत आल्प्स व मध्य तुर्कीतील पर्वतांस जोडतो. **बाल्कन** पर्वत आद्रियातिक समुद्रापासून तुर्की समुद्रापर्यंत जातो. या समुद्राचे

किनाऱ्यावर जें याचें टोंक आहे त्याला एमन भूशिर असें म्हणतात. आगखीं दोन मारमोरा समुद्राकडे बाल्कन पर्वताचे फांटे जातात; आणि पश्चिमेचें आगाला दुसरा एक दक्षिणेकडे फांटा जातो तो ग्रीसाचे पर्वतास मिळतो. आलबा व रुमेलिया हे प्रांत याच्या दोहों बाजूस आहेत. या शेवटच्या रागेमध्यें पिंदस हा प्रख्यात पर्वत आहे. ईशान्येस मोल्देविया, वालेकिया व बल्गेरिया हे प्रांत मिळून एक मोठा सपाट प्रदेश झाला आहे त्यावून दान्यूब व तिच्या शाखा जातात.

तुर्कस्थानाची हवा फार निरनिराळी व बदलणारी आहे कधींकधीं इतकी थंड असत्ये कीं दान्यूबच्या आसमतांत दाट बर्फ जमून राहतें; असें असता उन्हाळ्यामध्यें उष्णता कधीकधीं फार असत्ये.

बालकन पर्वताच्या उत्तरेकडील प्रांतात थंड हवेंतील पीक होतें, व त्याच्या दक्षिणेस सर्व प्रकारचीं फळझाडें व वनस्पति होतात. मका व गहूं देशाच्या खपापेक्षां जास्ती होतात. अगदीं दक्षिणेस राई, ओत, सातू आणि भात होतें; परंतु सरासरी या देशांतील सोईवरून पाहिलें असता जशी शेतकी व्हावी तशी होत नाहीं. द्राक्षासव हे लोक जरी फार पीत नाहींत तरी पुष्कळ होतें. रेशमाचे वस्त्राचे व गालिच्याचे यात फार कारखाने आहेत. या लोकाचे अज्ञानत्वाकडे लक्ष दिलें असतां कृतीच्या पदार्थांचे कारखाने जे आहेत ते फार असें म्हटलें पाहिजे व्यापारही चागला चालला आहे. आणि शेती लोकापेक्षा व्यापाऱ्यांवर तुर्की सरकारची नजर चागली आहे.

तुर्की लोक गंभीर, निष्कपटी व प्रामाणिक आहेत. परंतु गर्विष्ठ आणि पराकाष्ठेचे आळशी आहेत, आणि इतराच्या धर्म

प्रकरणा बगैर मतांविषयीं यांची नजर अगदी चांगली नाहीं. सर्व कारभार सुलतानाच्या इच्छे प्रमाणे चालतो, तो ह्मणेल तो कायदा. परधर्मी लोकास या राज्यामध्यें आजपर्यंत फार इजा होत असे.

**मोलदेविया** व **वालेकिया** हे परगणे जरी सुलतानाचा अधिकार मानतात तरी त्याचे राजे व राज्य रीति निराळ्या आहेत **सर्बिया** ही यांच्या प्रमाणें स्वतंत्र आहे, परंतु लोक सुलतानास खंडणी देतात.

तुर्कस्थानाची राजधानी **कुस्तनतुनिया** ( इस्तंबोल ) हीं **बासफरस** व मारमोराचा समुद्र याच्या सीमेवर आहे. दुरून हें शहर फार चांगलें दिसतें परंतु आत गेलें असतां फारच मळीण व वाईट आहे. **एड्रियानोपल** हें या राज्यांतील दुसरें शहर आहे.

**सोफिया** हें बलगेरियाचें मुख्य शहर. **स्कमला** हा मजबूत किल्ला आहे. **वारना** हें या प्रांतात मोठें बंदर आहे. दान्यूब नदीच्या किनाऱ्यावर **सिलिस्त्रिया** एथें तुर्की लोक रुशियनांबरोबर सन इसवी १८५४ त मोठ्या इर्षेनें लढले. **बुकारेस्त** हें **वालेकियामध्यें**, व **जाशीमोल** हें **देबियामध्यें** मुख्य शहर आहे.

तुर्कीतील मुख्य नद्या दान्यूब व **मारिझा** ह्या आहेत. पहिलीवर व्यापार करण्यास सर्व लोकांस परवानगी अलीकडेसच मिळाली आहे. दुसरीवर **आड्रियानोपल** हें शहर आहे.

ग्रीशन आरकिपेलेगोमधील अनेक बेटें व भूमध्य समुद्रांतील **कांदिया** ही तुर्कस्थानाचे अमलात आहेत. कांदियाला पूर्वी क्रीत ह्मणत. यांत रान सुंदर रीतीनें आहे, व याचामध्यभाग डोंगरी आहे.

# आफ्रिका.

आरबस्थानांतून निघून सुएझची संयोगी भूमि उतरली ह्मणजे आफ्रिका लागत्ये. हा एक पृथ्वीचा मोठा भाग आहे; परंतु ज्ञान, शक्ति किंवा सुधारगूक यांत हा इतरांपेक्षा कमी आहे.

हें खंड एक मोठें [illegible] द्वीपकल्प आहे. याच्या उत्तरेस भूमध्यसमुद्र; पूर्वेस सुएझची संयोगिभूमि, तांबडा समुद्र व हिंदीमहासागर; दक्षिणेस दक्षिणमहासागर; आणि पश्चिमेस आतलांतिकमहासागर आहे. याचे अगदीं उत्तर व दक्षिण भाग बहुधा एकाच अक्षांशांत आहेत; परंतु उत्तरेपक्षां दक्षिणेकडे अधिक थंडी आहे. असें होण्याचें मुख्य कारण या खंडाची आकृति.

आफ्रिका खंडाविषयीं अद्याप चांगली माहिती नाहीं याच्या अंतर्भागीं क्रूर व रानटी लोक राहतात, आणि हवा अगदीं रोगी आहे; यामुळें तेथें प्रवाशी लोक फारसे गेले नाहींत किनाऱ्या जवळील बहुतेक भागाचा शोध लागला आहे; परंतु आंत जाऊन फारसा कोणी फिरला नाहीं. नकाशाकडे पाहिलें असतां असें नजरेस येईल कीं सुमारें दाहा दक्षिण अक्षांशापासून तों चंद्रपर्वत जेथें आहे अशी कल्पना केली आहे तेथपर्यंत सर्व जागा मोकळी टाकली आहे; कारण या प्रदेशा विषयीं अद्याप कांहीं माहिती नाहीं. परंतु डाक्तर लिविंगस्तन व कपतान बर्तन ह्मणून दोन इंग्रजी प्रवाशी सांप्रत या प्रदेशाचा शोध लावीत आहेत.

आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्याजवळ जो पर्वत आहे त्याला आतलास असें ह्मणतात. तो नून भूशिरापासून तों त्यूनीस संस्थानाच्या दक्षिण सीमेपर्यंत आहे. याचा पश्चिम फांटा समुद्राजवळ एकदम उंच झाला आहे, व ही उंची कोठें कोठें बरीच आहे.

दुसरा एक रांग बद भूशिरा पासून तों चंद्र पर्वतापर्यंत जात्ये. चंद्रपर्वत आफ्रिकेच्या मध्यभागीं आहे असें तेथील लोक ह्मणतात. अबिसीनियात ही काहीं काहीं पर्वत आहेत. या देशात काहीं जमीन उंच व सपाट झाली आहे. या जमीनीच्या उत्तरेस व पूर्व किनाऱ्या बरोबर काहीसा आंत जाणारा असा दुसरा एक पर्वत आहे. यातील अतिशय उंच शिखर केनिया हें सुमारें २०००० फूट उंच आहे.

केपआवगुडहोप आफ्रिकेचें दाक्षिणटोंक, हें समुद्रा पासून एकदम उंच होतें, व तें फार उंच सखल आहे. युरोपांतून हिंदुस्थानाकडे वगैरे येणारीं जीं गलबतें त्यांना पाणी घेण्यास वगैरे ही फार सोयीची जागा आहे. बर्थालोम्यूदायस नावाचा एक पोर्तुगाली नावाडी यानें या भूशिराचा इसवी सनाच्या पधराव्या शतकाच्या अखेरीस शोध लाविला.

मोठमोठालीं मैदानें व वाळवंटें हें आफ्रिका खंडाचें विशेष लक्षण आहे. याच्या उत्तर किनाऱ्याजवळ आतलास पर्वतांतून निघणाऱ्या नद्यानीं पिकाऊ झालेली अशी एक जमीनीची अरुंद पट्टी आहे. या खेरीज याखंडाच्या मध्यभागीं जो पर्वत आहे त्याच्या उत्तरेस, पूर्वेपासून पश्चिमेकडे सर्व खंडभर जाणारी अशी एक पट्टी आहे, तेथें चांगली लागवड होत्ये. परंतु या दोहोंच्या-मध्यें एक विस्तीर्ण ओसाड वाळवंट आहे, त्याला साहारा किंवा मोठेंमैदान ह्मणतात. याच्यामध्यें कोठें कोठें दगडाच्या टेंकड्या आहेत, आणि मधून मधून पाण्याचे झरे व थोडीं झाडें नजरेस पडतात; परंतु बाकी सर्व भाग नुसत्या रेतीचा आहे. ती सूर्याचे किरण फार जोरानें आकर्षून घेत्ये, तेणेंकरून एथें अतिशयच उष्णता होत्ये. ही रेती नेहेमीं एकाच ठिकाणीं राहत नाहीं.

## मिसर.

हा देश या खंडाच्या ईशान्येस आहे. आणि लांब व अरुंद असून फार पिकाऊ आहे. नील नदी यांतून वाहत्ये याच्या पूर्वेस तांबडा समुद्र व सुएझ संयोगिभूमि आहे; व पश्चिमेस वाळवंटें आहेत. यांतील सर्व पीक नीलनदीवर होतें या देशांत पाऊस अगदीं नाहीं असें ह्मटल्यास चिंता नाहीं. वर्षांतून कदाचित दोनचार सरी पडल्या तर पडतात. परंतु नील नदीला नियमित काळीं पुष्कळ पूर येऊन ती काठचा सर्व देश जळमय करून सोडती. हा पूर गेल्यावर जमीन सुपीक होय्ये. नदी भरलेली असल्यामुळें कृषिकर्मास पाणीही पुष्कळ मिळतें या नदीचे दोन उगम आहेत. मुख्य शाखेस पांढरी नदी असें ह्मणतात, व ती सेनाराच्या दक्षिणेकडेस निघत्ये; आणि न्यूबियामध्यें आली ह्मणजे तिला निळीनदी, अबिसिनिया देशांतून येऊन, मिळत्ये. या दोन एकत्र झाल्या ह्मणजे ती उत्तर वाहिनी होऊन, भूमध्यसमुद्रास जाऊन दोन मुखांनीं मिळते. या मुखास रोसेता व दामिएता असें ह्मणतात. या दोहींमध्यें त्रिकोणाकृति जमीन आहे, तिला देलता ह्मणतात. ही फारच सुपीक आहे. नीलनदी आणि तांबडा समुद्र यांमधील बहुतेक देश ओसाड व खरखरीत आहे.

मिसर देशाची हवा बहुधा उष्ण व कोरडी आहे; परंतु रात्रीं दंव पुष्कळ पडतें. पापिरस झाड, एक जातीचें कमळ, कांदे, व कलिंगडें आणि कांकड्या, हे जिन्नस मुख्यत्वें करून यांत होतात. पापिरस झाडाच्या गराचे प्राचीनकाळीं कागद करीत असत

मिसरदेश तुर्कांच्या अमलांत आहे. परंतु सुलतानाचा अधिकार फक्त नावाचा आहे. वास्तविक पाहिलें असतां, येथील स-

भेदार ज्यास पाच्छा असें ह्मणतात तो स्वतंत्र आहे. तो सर्वराज्य आपल्या इच्छे प्रमाणें चालवितो. यांत मोठ्या शहरांतील लोकांखे रीज इतर लोक अगदीं मूढ व दरिद्रि आहेत. हा देश आता जरी असा आहे तरी प्राचीन काळीं संपत्ति, विद्या व महत्व यामध्यें फार प्रख्यात होता. सुंदर व विशाळ जयस्तंभ, थीब्स् शहराचा शेष भाग, आणि चित्राची लीपि ही याच्या महत्वाचीं चिन्हें अद्याप आहेत. हे स्तंभ दगडाचे त्रिकोणाकृति बांधलेले आहेत. यांतील उत्तम जयस्तंभ केरो जवळ आहेत.

काप्त, आरब आणि तुर्की लोक मिसर देशांत सांप्रत राहतात. यां पैकीं तुर्कीलोकांच्या हातीं राज्याधिकार आहे, एथें आरब फार आहेत, आणि काप्त हे प्राचीन लोकांचे वंशज आहेत. यांत मुख्य धर्म मुसलमानी आहे.

वरील किंवा दक्षिणइजिप्त मध्यइजिप्त आणि खालचें, किंवा उत्तरइजिप्त असे या देशाचे तीन भाग आहेत.

याची राजधानी केरो ही नील नदीच्या किनाऱ्यावर आहे हें शहर बाहेरून सुंदर दिसतें, परंतु आंत मळीण असून रस्ते अरुंद आहेत. आलेग्झांड्रिया हें नील नदीच्या रोसेता मुखाशीं, भूमध्य समुद्रावरील व्यापाराचें मोठें ठिकाण आहे. ख्रिस्तासनाच्या दुसऱ्या व तिसऱ्या शतकांत यांत विद्वान लोक बहुत असत.

## न्यूबिया.

मिसरदेशाच्या दक्षिणेस न्यूबिया आहे. त्या देशाप्रमाणें यामधून ही नीलनदी वाहत्ये. हिच्या व दुसऱ्या लहान नद्या आहेत त्यांच्या कांठीं मात्र कांहीं उत्पन्न होतें. बाकी सर्व वाळवंट आहे. सोनामुखी व मुख्यत्वेंकरून गुलाम याचा व्यापार यादेशांत चालतो हे गुलाम मिसर व आरबस्थान येथें जातात.

न्यूबियादेश नावानें मात्र मिसरच्या पाच्छायाच्या अमलाखालीं आहे; परतु त्यामध्यें पुष्कळ बेपरवा व भाडखोर लोक आहेत; ते कधींच कोणाचा अधिकार मानीत नाहींत. याची राजधानी सेन्नार आहे.

## हबसी (अबिसीनिया.)

हा देश खडकाळ व डोंगरी आहे. निळी नदी या मधून निघत्ये. खिंडींतील हवा फार उष्ण आहे, परतु, सपाट जमीन उंच असल्यामुळें तेथें उष्णता फार कमी होत्ये. डोंगरा जवळच्या जमीनींत पीक होतें, आणि काफी जरी इतर ठिकाणीं च्या-गली होत्ये तरी ती मुळची येथचीच असा अदमास आहे. यात अनेक प्रकारचे रानटी लोक राहतात गोंदार हें याचें मुख्य शहर आहे.

## पूर्वेकडील किनारा.

अबिसीनियाचे दक्षिणेकडील पूर्वकिनाऱ्यावरील देशांत वर्णन करण्यासारखें कांहीं नाहीं, व ते क्षुल्लक आहेत यासाठीं त्यांविषयीं उगीच कांहीं थोडेसें सांगतों. मध्यरेषेच्या उत्तरेकडे सोमाली जातीचे रानटी लोक राहतात. वर्षांतून कांहीं महिने पर्यंत येथें बराच व्यापार चालतो. हरार हें यांतील मोठें शहर आहे.

मागादाक्षी शहरापासून तों देल्गादो भूशिरा पर्यंत जो देश आहे त्याला झांग्वीबार ( झांजीबार) ह्मणतात. हा मस्कतच्या इमामाच्या अमलांत आहे. यांतील झांझीबार हें मोठें शहर त्याचनावाच्या एका बेटावर आहे.

दिलागो भूशीर आणि दिलागो उपसागर, याच्यामध्यें पोर्तुगाली लोकांचीं अनेक ठिकाणें आहेत. या किनाऱ्याला मोझांबिक ह्मणतात. व यावरूनच मादागास्कर बेट व हें खंड यांमधील सामुद्रधुनीस मोझांबिक ह्मणतात. याच्या दक्षिणच्या भागास सो-

फाला असे नाव आहे. पोर्तुगाली लोकाचीं झांबेसी नदीचे काठीं सेना व तीती हीं मुख्य सस्थानें आहेत, आणि समुद्रकांठी मोझांबिक आहे. सोनें व सुवासिक चीज हे आफ्रिकेच्या या भागातील उत्पन्नाचे मुख्य जिन्नस आहेत. परतु व्यापार मुख्यत्वें करून गुलामाचा चालतो.

झांबेसी नदी व तिच्या आसमंतातील सर्व प्रदेश डाकटर लिविंगस्टन या इंग्रेजी प्रवाशानें आलीकडे शोधला आहे, व तो आणखी तेथें पुन्हा शोधलावण्यास गेला आहे. याणें पूर्व किनाऱ्यावर क्किलिमन पासून तों पश्चिम किनाऱ्यावर आंगोला पर्यंत सर्व खंडपाहिलें. तो सागतो कीं हा प्रदेश पिकाऊ, लोकानीं भरलेला व महत्वाचा आहे.

मादागास्कर हें हिंदीमहासागरात मोझांबिक व सोफाला यांच्या समोर मोठें बेट आहे. यात उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत सुबे बेटभर जाणारा एक पर्वत आहे. शिद्दी, आरब, व मलै लोक यांत राहतात. येथील हवा स्वच्छ व अरोग्य कारक आहे. यांतील कांहीं ठिकाणें फ्रेंच लोकाच्या ताब्यात आहेत.

मादागास्करापासून पुर्वेस सुमारें २०० कोसावर दोन लहान बेटें आहेत, त्यास बोर्बो अथवा रीयूनियन, आणि मारिशस असें ह्मणतात. पहिलें फ्रेंचांच्या व दुसरें इंग्लिशांच्या ताब्यांत आहे.

## नेताळ आणि केपआवगुदहोप.

आता पुनःआफ्रिकेचें वर्णन करण्यास लागतों. वर सांगितलेल्या देशाच्या दक्षिणेस इंग्लिश लोकाचीं संस्थानें आहेत. त्यांतील नेताळ हें सन इसवी १८४४ त यांचे ताब्यात आलें. दरबन आणि पोर्तनेताळ हीं यान बदरें आहेत. मुख्य शहर पी.येतरमारित्झबर्ग हें या पासुन कांहीं अतरावर आत आहे. नेताळच्या वा-

पश्चेस रानटी आफ्रिकन् लोक राहतात. ह्याच्या सभोंवतीं खडकाळ व लहान झुडपांनीं भरलेला काफ्री लोकांचा देश आहे. हे लोक रानटी, क्रूर व भांडखोर आहेत.

केपतौन हें आफ्रिकेच्या अगदीं दक्षिणेस आहे. पूर्वी हें दच लोकांच्या ताब्यांत होतें. परंतु आलीकडे साठवर्षें इंग्लिशांचे हस्तगत झालें आहे. हा डोंगरीदेश आहे, परंतु कांहीं कांहीं सपाट व ओसाड जमीनी ही यांत आहेत. येथील हवा सुखावह व आरोग्यकारक आहे असें ह्मणतात. युरोपांतील सर्व धान्यें व द्राक्षें यांत चांगली होतात. केपतौनाजवळ कानस्तानशिया गांव आहे, येथून चांगली द्राक्षांची दारू इतर देशांतजाते यांत इंग्रेज, दच, व मुळचे राहणारे अशी तीन प्रकारची प्रजा आहे. त्यांचा मुख्य धंदा गुरें पाळणें हा आहे.

येथें अंमल चालविण्यास इंग्लंदांतून एक गवरनर येतो. केपतौन, जार्जतौन आणि ग्राहाम्सतौन, हीं तीन यांत मुख्य शहरें आहेत.

या संस्थानाच्या उत्तरेस तात व बुशमेन या लोकांचा देश आहे.

## पश्चिम किनारा.

केपाच्या उत्तरेस गलें आसतां लोअर गांविया देश लागतो- यांत बेंगुएला, आंगोला, कांगो आणि लोआंगो हे प्रांत आहेत. सेंत हेलीना हें लहान व खडकाळ बेट बेंगुएला याच्या पश्चिमेस आहे. हें इंग्रेजांच्या ताब्यांत आहे. नेपोलियन बोनापार्त बादशा हा मरण्याच्या पूर्वीं कांहीं थोडीवर्षें तो एथें कैदेंत होता. युरोपांतून हिंदुस्थानाकडे येणारीं गलबतें सेंतहेलीना व केप या दोन्हीं ठिकाणीं वखा करतात.

**कामेरून** पर्वतापासून किनारा पश्चिमकडे बराच वाढतो, याला **अपरगिनी** असें ह्मणतात; परंतु **धान्य किनारा, हस्तीदंताचा किनारा, सोन्याचा किनारा,** हीं जीं उपनावरून प्रथम दिलेलीं नांवें तीं त्यांस अद्याप चाललीं आहेत. गुलामांचा दुष्टव्यापार एथें पूर्ण चालतो, ह्मणून याला गुलामाचा किनारा असें ही कधीकधीं ह्मणतात.

येथील हवा जरी **युरोपियन** लोकांच्या प्रकृतीस वाईट आहे, तथापि त्यांचीं बहुत ठिकाणें येथें आहेत. इंग्रेज लोकांच्या मुख्य ठिकाणास **सिरियालियोन** ह्मणतात. ज्या गुलामास इंग्रेजांचीं लढाऊ तारवें सोडवतात त्यास परत आणून सोडण्याकरितां हें मुख्यत्वेंकरून राखलेलें आहे. झाडें एथें चांगलीं व फार मोठीं होतात. **बओबाब** ह्मणून जें सर्व झाडांत मोठें झाड तें येथें पुष्कळ होतें. **नायजर** अथवा **कोरो** ही जी मोठी नदी ती यामधून जात्ये.

## सिनिगांबिया.

**सिनिगाल** व **गांबिया** या नद्यांच्या मुखाजवळ जो देश आहे त्यास **सिनिगांबिया** ह्मणतात. अनेक जातींचे आफ्रिकन लोक एथें राहतात सेंतलुई हें यांत फ्रेंच लोकांचें, **सिनिगाल** नदीच्या मुखाशीं एका बेटावर ठिकाण आहे. वरील दोन नद्यामधील वर्द भूशीर हें आफ्रिकेचें पश्चिम टोंक आहे. पोर्तुगाली लोकांचा, केप वर्द ह्मणून जो बेटांचा झुबका तो या भूशिराच्या पश्चिमेस आहे.

## सौदन अथवा निग्रिशिया.

सिनिगांबियापासून आफ्रिकेच्या मध्यातून **न्यूबिया** पर्यंत जी एक पिकाऊ जमीनीची पट्टी जात्ये. तिला सौदन अथवा निग्रिशिया ह्मणतात. इच्यामधून **चंद्र** पर्वतातून निघालेल्या नद्या

वाहतात. यांत **तिबकतु** व **बोरनू** हीं मुख्य राज्यें आहेत. पहिल्याचा गुलाम व हस्तिदंत याचा व्यापार **मोराको** बरोबर चालतो. या प्रदेशाच्या मध्यभागीं गोड्यापाण्याचें एक मोठें सरोवर आहे. त्याचें नाव **शाद**. याच्या सभोंवतीं दाट रानें आहेत.

## बारबरी.

**आतलास** पर्वताच्या जवळ आतलांतिक महासागरापासून **ईजिप्त** पर्यंत जे देश आहेत, त्यांना बारबरी देश अथवा संस्थानें असें ह्मणतात. त्यांचीं नांवें **मोराको, आलजियर्स, त्यूनिस** आणि **त्रिपोली. फेझन** व **बार्का**, कधींकधीं **त्रिपोलींत** धरतात, व कधीं निराळीं मानतात

मोराकोचें राज्य आफ्रिकेच्या ईशान्य कोनांत आहे. **मोराको** व **मक्वीनेझ** हीं यांत मोठीं शहरें आहेत. यांतील जमीन पिकाऊ आहे, परंतु शेतकीची हयगय असल्यामुळें जसें पीक व्हावें तसें होत नाहीं. **युरोपांतील** सर्व धान्यें यांत होतात, व दक्षिण युरोपांतील फळें तेथच्या पेक्षांही विशेष चांगलीं होतात. एथील गुरें फारच उत्कृष्ट असतात, व घोडेही चपलता व सौंदर्य याविषयीं प्रख्यात आहेत. एथें व्यापार पुष्कळ चालतो. युरोपांत जो माल जायाचा तो जिब्राल तर एथें जातो. आफ्रिकेंतील अंतरभागाशीं व्यापार लमाण करतात. एकावर्षांत ते मोठ्या रेतीच्या वाळवंटांतून सहावेळ दक्षिणेकडे जातात. त्यांत हजारों माणसें व उंट असतात. एथील लोक बहुतकरून मुसलमान आहेत.

**आलजियर्स** अथवा **आलजिरिया** हा फ्रेंच लोकांच्या ताब्यांत आहे. या लोकांनीं तेथें जाऊन वसाहात ही केली आहे. यांतील राजधानीचें नाव **आलजियर्स**

**त्यूनिस** हें लांब अरुंद राज्य आलजियर्सांच्या पूर्वेस आहे,

आफ्रिकेचें उत्तर टोंक बान हें यांत आहे. तें समोरील सिसिलाच्या किनाऱ्यापासून फक्त चाळीस कोस आहे.

त्रिपोली व बार्का हीं पूर्वेस आहेत. फेझान हें दक्षिणेकडे साहारा पर्यंत जातें. शेवटचीं दोन त्रिपोलीच्या पाश्चाच्या अधिकाराखालीं आहेत.

त्यूनीस व त्रिपोली हीं दोन्हीं सुलतानाच्या अमलांत आहेत परंतु तो अम्मल फक्त नावाचा आहे.

# अमेरिका.

युरोपाहून निघून पश्चिमेकडे आतलांतिक सागरांतून जाऊं लागलें तर, थोडक्याच दिवसांत असें एक खंड लागेल की तें प्राचीन काळचे एशिया, आफ्रिका व यूरोप यांतील लोकांस अगदीं माहित नव्हतें. यावरून त्याला नवनिपृथ्वी किंवा नवीन महाद्वीप असें कधीकधीं ह्मणतात. जिनोवा एथें जन्मलेला ख्रिस्तफर कोलंबस यानें हें सन इसवी १४९२ या वर्षीं शोधून काढलें. याला अमेरिका असें ह्मणण्याचें कारण हें कीं अमेरिगो वेसपुसी ह्मणून एक नावाडी होता तो प्रथम याच्या दक्षिणभागाच्या उत्तर किनाऱ्यास गेला, आणि आपण जे देश शोधून काढले त्याचें यानें वर्णन छापलें.

या खंडाचे उत्तर आणि दक्षिण असे मोठे दोन भाग आहेत. ते डेरियन अथवा पनामा या संयोगि भूमीनें जोडले गेले आहेत.

## उत्तर अमेरिका

उत्तर अमेरिकेच्या पश्चिमेस पासिफिक सागर; उत्तरेस हिम सागर; पूर्वेस आतलांतिक सागर; आणि दक्षिणेस मेक्सिकोचें आखात, डेरियन संयोगिभूमि व पासिफिक सागर आहे. कोलंबसाच्या शोधापूर्वीं उत्तर अमेरिकेंत जे लोक राहात असत त्याच्या उत्पत्तिविषयीं कांहीं माहिती नाहीं. परंतु तेव्हांपासून युरोपियन लोक तेथें जाऊन राहिले आहेत- आणि तद्देशीय रहिवासी बरेच कमी झाले आहेत, व दिवसानुदिवस कमीकमी होत चालले आहेत. जे लोक युरोपांतून तिकडे गेले त्यांणीं तिकडच्या बहुतेक स्थळांस आपल्यांकडील नावें दिलीं आहेत. व याच प्रमाणें दक्षिण अमेरिका व आस्ट्रेलिया यांमध्यें झालें आहे.

ब्रिटिशअमेरिका, रुशियन अमेरिका, ग्रीनलंद, स्वतंत्र संस्थानें, मेक्सिको, युकातन, मध्यअमेरिका आणि वेस्तइंदिज असे उत्तर अमेरिकेचे भाग केले आहेत.

## ब्रिटिश अमेरिका.

या देशांत अमेरिकेचा बराच उत्तरभाग येतो. याच्या दक्षिणसीमेवर गोडेपाण्याचीं मोठमोठालीं पुष्कळ सरोवरें आहेत, त्यांसर्वांत सुपीरियर हें मोठें आहे. हीं बहुतेक जवळजवळ असून याजमध्यें लहानलहान सामुद्रधुन्या आहेत. सुपीरियर सरोवराचें पाणी ह्यूरन सरोवरांत जातें, व त्याचें पाणी स्वतंत्र संस्थानांतील मिचिगान सरोवरांत जातें. ह्यूरन याच्या एकया बाजूनें इरी सरोवराबरोबर सेन्तक्लेयर हें लहान सरोवर व देत्रोइत नदी यांनीं संबंध झाला आहे. आणि इरी व ओंतारियो यांना जोडणारी नायाग्रा नदी आहे. इच्या मार्गामध्यें एके ठिकाणीं मोठा विशाळ धबधबा झाला आहे; तो पाहण्यास फारच भव्य आहे. याचा अवाज आसमंतात सुमारें वीसकोश जातो. ओंतारियो मधून सेन्तलारेन्स नदी निघाल्ये. आणि त्याच नावाच्या अखातास जाऊन मिळत्ये. ब्रिटिश अमेरिका देश बहुधा सपाट आहे; परंतु पश्चिमेकडच्या भागास मधून राकी पर्वत जातो. या पर्वताच्या आणि हदसनच्या आखाताच्यामधील सर्व प्रदेशांत अनेक लहानलहान सरोवरें आहेत.

या देशाच्या उत्तरेस उत्तर सागर; पूर्वेस आतलांतिक सागर, दक्षिणेस स्वतंत्रसंस्थानें आणि पश्चिमेस पासिफिक सागर व रुशियन अमेरिका आहे. याचे कानदा, न्यूब्रन्सविक. नोव्हास्कोशिया, केपब्रितन बेट, न्यूफौंदलंद बेट, प्रिन्सएदवर्द बेट,

हदसनसबेतेरितोरी, व लाब्रेदोर हे भाग आहेत. कानदा याचे वरचा आणि खालचा असे दोन भाग आहेत. नोवास्कोशिया हें एक आतलांतिक सागरात जाणारें द्वीपकल्प आहे, आणि लाब्रेदोर हें बेट हदसन्सबेतोरितोरी मध्येंच धरतात.

या देशाचे उत्तर व मध्यभाग नेहेमी बर्फानें भरलेले असतात, व या विषयीं अद्याप पक्की माहिती नाहीं. मध्यभागी पुष्कळ जातींचे स्वदेशीय लोक राहतात, आणि इंग्रेज लोकाचीं व्यापाराचीं ठाणीं व किल्ले मधून मधून मात्र आहेत. जनावराचीं कातडीं व जाडी लांकर हे एथें व्यापाराचे मुख्य जिन्नस होतात.

हिमसागरात इलिझाबेथ राणीच्या काळापासून तों ही वेळ पर्यंत ब्रितिश खलाशानीं मोठें धैर्य, निश्चय व साहास खर्च केलें आहे. हिंदुस्थानात येण्यासाठीं जळमार्ग सोपा व जवळचा सांपडावा हा याचा मुख्य हेतु होता. तो हेतु अखेरीस दोन वर्षांपूर्वीं सिद्धीसगेला. परतु हा सापडलेला मार्ग निकामी आहे, कारण तेथें बादळें पुष्कळ होतात, आणि सर्व प्रदेश बहुधा नेहमी बर्फानें वेष्टिलेला असतो, आणि जरी बर्फ कधीं काहीं वितुळलें तरी ही त्यातून जाहाजें नेण्यास विलक्षण अडचणी पडतात. ब्रितिश अमेरिकेच्या आग्नेयीस वस्ती फार दाट आहे.

कानदा हा मनोरजक देश आहे. प्रथम एथें फ्रेंच लोक येऊन राहिले, परतु काहीं वर्षांनीं हा देश इंग्लिशानीं त्याजवळून घेतला, आणि तो अद्याप याचेच स्वाधिन आहे तेथें राज्य चालविण्यास इंग्लदातून एक गवरनरजनरल जातो कानदा देशातील हवा थंडकाळीं अतिशय उष्ण असतये. क्विबेक व मॉन्त्रीअल ही यांत सेन्तलारेन्स नदीच्या किनाऱ्यावर मोठीं शहरें आहेत हालिफाक्स हें नोवास्कोशियाची राजधानी. हें फार चांगलें

बंदर आहे आणि सेन्तजान्स हें न्यूब्रन्सविक यांतील मोठें बंदर आहे. या दोनही परगण्यांतून लाकूड फार जातें.

न्यूफौंदलंद याची राजधानी सेन्तजान. हें बेट जानकेबत याने सातव्या हेनरीच्या मदतीनें शोधून काढलें; व अमेरिका ही याणेंच प्रथम शोधून काढली. या बेटाच्या किनाऱ्यावर काद हे मासे जसे मरतात तसे पृथ्वींत दुसरे कोठें मरत नाहींत. हे खाण्याच्या व तेल काढण्याच्या उपयोगी पडतात. हें तेल औषधास फार उपयोगी आहे.

## रुशियन अमेरिका.

हा देश अमेरिकेच्या ईशान्य टोंकास आहे. यांत वस्ती फार पातळ आहे. आलास्का ह्मणून लांब व अरुंद असें पासिफिक महासागरांत जाणारें द्वीपकल्प आहे, ते एशिया जवळ जवळ जाणारी जी आलूशियन बेटांची रांग त्यांना जाऊन मिळतें असें दिसतें. या दोन खंडाच्या मध्यें बेहरिंगची सामुद्रधुनी आहे. इची अगदीं अरुंद ठिकाणची रुंदी अठरा कोश आहे. यांतील रुशियन लोकांची ठाणीं, लोंकर व सील मासे यांच्या व्यापाराच्या मात्र उपयोगी आहेत.

## ग्रीनलंद.

अमेरिकेच्या ईशान्येस ग्रीनलंद ह्मणून मोठें भणभणीत व ओसाड द्वीपकल्प आहे. या दोहोंच्या मध्यें देविसची सामुद्रधुनी आणि बाफिनचा उपसागर आहे. एथील हवा फार थंड आहे, आणि पश्चिमकिनाऱ्यावरील कांहीं ठिकाणें खेरीज करून कोठें ही शेतकी होत नाहीं.

हें देन लोकांच्या ताब्यांत आहे; परंतु यांत बहुधा एसकिमा ह्मणून एक जातीचे फार ठेंगणे रानटी लोक आहेत ते राह

तात. याचा मासे मारणें हा मुख्य धंदा आहे. यामध्यें ते फार प्रवीण आहेत.

रेनडीयर, पाण्यांतील पक्षी, आणि सील हीं जनावरें यांत फार सांपडतात. शेवटचें या लोकांस खाण्यास व उबदार वस्त्रें करण्यास उपयोगी पडतें. अलीकडे एथें शिसें, कोळसा, तांबें आणि स्लेट वगैरे खनिज पदार्थ बहुत उमगले आहेत.

## स्वतंत्रसंस्थानें.

हीं उत्तर अमेरिकेच्या मध्यभागीं आहेत. याच्या उत्तरेस इंग्रेजाचा मुलूख; पूर्वेस आतलांतिक सागर; दक्षिणेस मेक्सिकोदेश; आणि पश्चिमेस पासिफिक सागर आहे. अनेक निरनिराळे प्रांत मिळून हीं एकत्र झालेलीं आहेत. हे सर्व एका राज्याखालीं व एका कायद्याखालीं आहेत.

या पिकाऊ व विस्तीर्ण देशाचे दोन पर्वतानीं तीन भाग झाले आहेत. पूर्वेस आतलांतिक सागराशीं समांतर आलेबामापासून सेन्तलारेन्स नदी जवळजवळ पर्यंत आलेघानी पर्वत आहे. हा कोठेंहीं फारसा उंच नाहीं. याजवळून पश्चिमेकडे निघालें असतां, मिसिसिपी आणि मिसौरी या महान नद्या, ज्या पर्वतरहित विस्तीर्ण प्रदेशांतून जातात, त्या पार पडून गेलें म्हणजे राकी पर्वत लागतो. याचा कांहीं भाग दक्षिणोत्तर दिशेनें या देशांतून जातो. हा पर्वत उंच, मोठा व दगडांनीं भरलेला आहे; यावरून याला राकी म्हणजे शिलामय हें नाव प्राप्त झालें आहे. हा पर्वत व पासिफिक सागर या मधील देश निरनिराळ्या प्रकारचा आहे; कांहीं डोंगरी व कांहीं सपाट असून राकी पर्वत व न्यूकॅलिफोर्निया यामध्यें एक मोठें लांब वाळवंट हि आहे. अता या नांवाचें

खारेपाण्याचें जें सरोवर आहे तें यांतच आहे. मार्मन ह्मणून अलीकडे निघालेला ख्रिस्ती धर्माचा विलक्षण पंथ आहे तो अनुसरणारे लोक या सरोवराच्या आसमंतांत राहतात.

पूर्वेकडील दाट वस्तीनें भरलेलीं जीं या देशाचीं संस्थानें आहेत त्यामध्यें लागवड फार चांगली होत्ये. व तीं लहानमोठ्या शहरानीं व खेड्यानीं भरलेलीं आहेत. या सर्व भागाचें स्वरूप सुधारलेलें दिसतें; परंतु जसजसें पश्चिमेकडे जावें तसतशीं अटव्य रानें व उंचउंच गवतानें भरलेले प्रांताचेप्रांत नजरेस पडतात. हे रानटीलोक आणि जनावरें यांणीं भरलेले आहेत. परंतु दिवसानुदिवस हीं कमी होत जाऊन यांत गोरे लोक नवीं नवीं संस्थानें वसवीत आहेत, व तीं स्वतंत्र संस्थानांस मिळत जात आहेत.

यादेशाची हवा वरचेवर बदलत्ये; कधींकधीं अतिशय थंडी पडत्ये, व लागलीच उष्णता फार होऊं लागत्ये. परंतु उत्तरेकडील प्रांतांत बहुधा समशीतोष्ण असत्ये; आणि दक्षिणेकडे कांहीं प्रांत विषुववृत्तापर्यंत गेले आहेत, यामुळें तेथें उष्णता फार असत्ये.

स्वतंत्र संस्थानांत उपयुक्त व मौल्यवान खनिज पदार्थ फार सांपडतात. कॅलिफोर्निया या द्वीपकल्पामध्यें सन इसवी १८४७ त फारच सोन्याच्या खाणी आढळल्या, आणि तेथें तें काढण्यासाठीं हजारों लोक गेले. लोखंड बहुतेक देशांत सांपडतें. आलेघानी पर्वत आणि मिसिसिपी नदी यामध्यें कोळशांचे मोठ मोठाले थर आहेत. याखेरीज तांबें, शिसें व मीठ पुष्कळ सांपडतें.

गहूं, मका, भात, तंबाकू, कापूस व ऊस हे मुख्य वनस्पत्योत्पन्न पदार्थ यांत होतात. यांतील अरण्यांतील झाडें फार मोठालीं आहेत

स्वतंत्र संस्थानांत कलोनें पदार्थ करण्याचे कारखाने मोठ

मोठाले व पुष्कळ आहेत. बास्तनाच्या उत्तरेस लोएल हें कापसाचीं वस्त्रें करण्याचें मुख्य ठिकाण आहे. इग्लंद खेरीज करून या देशातल्या इतका दुसऱ्या कोणत्याही देशाचा व्यापार नाहीं व तो अजून हीं अधिक होत आहे. या देशांतील तारवें जात नाहींत अशीं पृथ्वींत थोडींच बंदरें आहेत.

लोक हिंमतदार व साहाशी आहेत; ते बहुतेक इंग्लदांतून आलेले आहेत; आणि सन इसवी १७७५ पर्यंत इंग्रेजांच्या राज्याखालीं होते. परंतु विलायतेच्या सरकारानें त्यांचें मत विच्यारल्या शिवाय त्यांजवर कर बसविले यामूळें ते त्यांजवर उठले, आणि मोठ्या हिंमतीनें लढून अखेरीस विजयी झाले. या लढाईंत वाशिंगतन हा त्याचा सेनाधिपति व अव्वल मसलतदार होता. याची कीर्ति राहण्यासाठीं त्यांणीं आपल्या राजधानीस वाशिंगतन हें नाव दिलें आहे. हें शहर पोतोमाक नदीवर कोलंबिया प्रांतात आहे एथें लोकांच्या प्रतिनिधींची राज्य कारभाराची जी मोठी सभा बसते तिला कांग्रेस हें नाव आहे. न्यूयार्क (याच नावाच्या संस्थानांत) स्वतंत्र संस्थानांतील सर्वांत मोठें व श्रीमत शहर असून भरभराट व व्यापार यांत सर्व पृथ्वींत दुसरें नंबरचें आहे. मासाच्यूसेत यामध्यें बास्तन, पेन्सिलवेनियामध्यें फिलादेलफिया, मेरीलांदामध्यें बालतिमोर, आणि मिसिसिपीवर न्यूओरलियन्स हीं शिवाय मोठीं शहरें आहेत.

मिसोरी नदी दीडहजार कोश जाऊन मिसिसिपीस मिळते. मिसिसिपी मध्यभागांतून दक्षिण वाहिनी होऊन मेक्सिकोच्या आखातास जाते. आरकानसास व ओहियो अनुक्रमें पश्चिमेकडून व पूर्वेकडून येऊन मिसिसिपीला मिळतात याखेरीज सस्किहाना हदसन, व सेवाना या स्वतंत्र संस्थानांत नद्या आहेत मिसिसिपी आ-

णि मिसौरी या एकत्र मिळाल्यावर याची लांबी जितकी होते तितकी पृथ्वीमध्यें दुसऱ्या कोणत्याही नदीची नाहीं.

## मेक्सिको अथवा मेहिको.

मेक्सिकोच्या उत्तरेस स्वतंत्र संस्थानें; पूर्वेस तो व मेक्सिकोचें आखात; दक्षिणेस मध्यअमेरिका व पासिफिक महासागर; आणि पश्चिमेस पासिफिक महासागर आहे. एक लांब व अरुंद जमीनीची पट्टी, जी जसजशी मध्य अमेरिकेकडे जात्ये तसतशी अधिकाधिक अरुंद होत्ये ती, आणि खडकाळ व अरुंद क्यालिफोर्निया नावाचें द्वीपकल्प, ज्याच्यामध्यें आहे तो व ज्यात क्यालिफोर्निया आखात आहे तो, असे भाग मिळून हा देश झाला आहे.

हा बहुतेक देश उंच आहे. यांत पोपोकयातापीतल, आरिझाबा आणि जोरुलो ह्या उंच ज्वालामुखी आहेत. एथील हवा निरनिराळ्या जागीं निरनिराळी आहे. समुद्रा जवळची फार उष्ण आहे, परंतु मध्यभागांतील थंड व चांगली आहे.

दक्षिणेकडे केळीं, मका, नारळ वगैरे उष्ण कटिबंधांत होणारे पदार्थ होतात; आणि उत्तरेस गहूं व युरोपात होणारीं फळें वगैरे होतात. निवडुंगाच्या जातीचीं झाडें यात फार आहेत या देशांत खनिज पदार्थ पुष्कळ सापडतात. त्यांत रुपें हें तर फारच. किरमिजी रंग एथून बाहेर फार जातो. तो एक जातीचा किडा मारून होतो. हा किडा या देशा प्रमाणें दुसरे कोठें होत नाहीं.

युरोपियन लोकानीं अमेरिका शोधून काढण्याच्या पूर्वी मेक्सिको हें इंदियन लोकाचें एक मोठें राज्य होतें. तें स्पानियर्ड लोकांचा सरदार कार्तेझ याणें जिंकिलें. तेव्हांपासून सन १८२९ सापर्यंत स्पेनाच्या अमलात होतें. याव रीं एथील लोकांनीं बंडकरून स्वतंत्र प्रजासत्ताक राज्य स्थापिलें

या देशांत पूर्वींच्या ज्या वस्तु अद्याप नजरेस पडतात त्यांवरून हे लोक पूर्वी बरेच बलाढ्य व सुख भोगणारे होते असें सिद्ध होतें.

याची राजधानी मेक्सिको ही एका खोऱ्यात सुंदर ठिकाणीं सातहजार फूट उंचीवर आहे. मेक्सिकोच्या आखातावरील वराक्रुझ बंदर आणि पासिफिक महासागरावरील आकापल्को बंदर, व ग्वाडालाहारा(?) ही दुसरी मोठीं शहरें आहेत.

टेक्सास हा प्रांत पूर्वी मेक्सिकोमध्येच होता; परंतु आलीकडे स्वतंत्र संस्थानांतील सरकारानें याजवळून जिंकून घेतला आहे. याच्या व मेक्सिकोच्या मध्यें रायोलनार्त नदी आहे.

## युकातन.

हें मेक्सिकोच्या आखातांत जाणारें द्वीपकल्प पूर्वीं वरील देशांतीलच भागांत मोडत होतें; परंतु तें आलीकडे स्वतंत्र झालें आहे. मेरीदा ही याची राजधानी आहे.

बेलीझ अथवा ब्रिटिश हांड्यूरस ह्मणून युकातनाच्या दक्षिणेस आणि हांड्यूरसाच्या अखाताच्या पश्चिमेस सुमारें पाऊणशें कोश लांबीची एक जमीनीची पट्टी आहे. तेथें ब्रिटिश लोकांनीं वसाहात केली आहे. यांतील मुख्य शहरास बेलीझ असेंच ह्मणतात. एथून माहागनी व लागवुड लाकडें बाहेर जातात. याच्या जवळील हांड्यूरसाच्या उपसागरांत पुष्कळ लहानलहान बेटें आहेत, त्यांना बेबेटें असें ह्मणतात. रुआतन आणि बोनाका हीं त्यांत दोन मुख्य आहेत.

## मध्यअमेरिका.

बेलीझाच्या आसमंतांतील देश आणि देरियन संयोगिभूमि

णि मिसौरी या एकत्र मिळाल्यावर यांची लांबी जितकी होते तितकी पृथ्वीमध्यें दुसऱ्या कोणत्याही नदीची नाही.

## मेक्सिको अथवा मेहिको.

मेक्सिकोच्या उत्तरेस स्वतंत्र संस्थानें; पूर्वेस तो व मेक्सिकोचें आखात; दक्षिणेस मध्यअमेरिका व पासिफिक महासागर; आणि पश्चिमेस पासिफिक महासागर आहे. एक लांब व अरुंद जमीनीची पट्टी, जी जसजशी मध्य अमेरिकेकडे जात्ये तसतशी अधिकाधिक अरुंद होत्ये ती, आणि खडकाळ व अरुंद क्यालिफोर्निया नावाचें द्वीपकल्प, त्याच्यामध्यें आहे तो व ज्यांत क्यालिफोर्निया आखात आहे तो, असे भाग मिळून हा देश झाला आहे.

हा बहुतेक देश उंच आहे. यांत पोपोकयातापीतल, आरिझाबा आणि जोरूलो ह्या उंच ज्वालामुखी आहेत. एथील हवा निरनिराळ्या जागी निरनिराळी आहे. समुद्रा जवळची फार उष्ण आहे, परंतु मध्यभागांतील थंड व चांगली आहे.

दक्षिणेकडे केळीं, मका, नारळ वगैरे उष्ण कटिबंधांत होणारे पदार्थ होतात; आणि उत्तरेस गहूं व युरोपांत होणारीं फळें वगैरे होतात. निवडुंगाच्या जातीचीं झाडें यांत फार आहेत. या देशांत खनिज पदार्थ पुष्कळ सांपडतात. त्यांत रुपें हें तर फारच. किरमिजी रंग एथून बाहेर फार जातो. तो एक जातीचा किडा मारून होतो. हा किडा या देशा प्रमाणें दुसरे कोठें होत नाहीं.

युरोपियन लोकांनीं अमेरिका शोधून काढण्याच्या पूर्वीं मेक्सिको हें इंदियन लोकांचें एक मोठें राज्य होतें. तें स्पानियर्द लोकांचा सरदार कार्तेझ यानें जिंकिलें. तेव्हांपासून सन १८२९ तापर्यंत स्पेनाच्या अमलांत होतें. यावर्षीं एथील लोकांनीं बंड करून स्वतंत्र प्रजासत्ताक राज्य स्थापिलें

या देशांत पूर्वींच्या ज्या वस्तु अद्याप नजरेस पडतात त्यांवरून हे लोक पूर्वीं बरेच बलाढ्य व सुख भोगणारे होते असें सिद्ध होतें.

याची राजधानी मेक्सिको ही एका खोऱ्यांत सुंदर ठिकाणीं सातहजार फूट उंचीवर आहे. मेक्सिकोच्या आखातावरील वराक्रुझ बंदर आणि पासिफिक महासागरावरील आकापल्को बंदर, व लापूएब्ला, हीं दुसरीं मोठीं शहरें आहेत.

तेक्सास हा प्रांत पूर्वीं मेक्सिकोमध्येंच होता; परंतु आलीकडे स्वतंत्र संस्थानांतील सरकारानें याजवळून जिंकून घेतला आहे. याच्या व मेक्सिकोच्या मध्यें रायोलनार्ते नदी आहे.

## युकातन.

हें मेक्सिकोच्या आखातांत जाणारें द्वीपकल्प पूर्वीं वरील देशांतीलच भागांत मोडत होतें, परंतु तें आलीकडे स्वतंत्र झालें आहे. मेरीदा ही याची राजधानी आहे.

बेलीझ अथवा ब्रितिश हाडयूरस ह्मणून युकातनाच्या दक्षिणेस आणि हाडयूरसाच्या अखाताच्या पश्चिमेस सुमारें पाऊणशें कोश लांबीची एक जमीनीची पट्टी आहे. तेथें ब्रितिश लोकांनीं वसाहात केली आहे. यांतील मुख्य शहरास बेलीझ असेंच ह्मणतात. एथून माहागनी व लागवुद लाकडें बाहेर जातात. याच्या जवळील हाडयूरसाच्या उपसागरांत पुष्कळ लहानलहान बेटें आहेत, त्यांना बेबेटें असें ह्मणतात. रुआतन आणि बोनाका हीं त्यांत दोन मुख्य आहेत.

## मध्यअमेरिका.

बेलीझाच्या आसमनांतील देश आणि देरियन संयोगिभूमि

या दोहोंस मध्यअमेरिका असें ह्मणतात; व कधींकधीं ग्वातिमाला असें ही नाव देतात, कारण हीं दोनही मिळून ग्वातिमाला याना-वाचें एथें एक प्रजासत्ताक राज्य होतें. आतां त्याचे ग्वातिमाला, सानसाल्वादोर, हांड्यूरस, निकारागुवा आणि कास्तारिका असे पांच स्वतन्त्र भाग झाले आहेत. हांड्यूरस आणि निकारागुवा या-च्या पुर्वेस समुद्राच्या किनाऱ्यावर मासक्कितो हें इंदियन लोकांचें राज्य आहे.

राकीपर्वत हा उत्तरेकडून इकडे येऊन पुढें जातो. परंतु त्याला एथें हें नाव नाहीं. ग्वातिमाला देश उत्तरेकडे उंच आहे त्यांत ग्वातिमाला ही याची राजधानी आहे. एथील हवा चांगली आहे; परंतु खोल भागाची रोगी आहे. या देशांत ज्वालामुखी फार आहेत व धरणीकंप ही फार होतात.

**निकारागुवा** प्रांतामध्यें त्याच नावाचं एक मोठं सरोवर आहे, त्याला व क्यारेबियन समुद्राला जोडणारी **सानजुवान** नदी आहे या नदीच्या मुखाजवळ **ग्रानजुवान** अथवा **ग्रेतौन** शहर आहे. वरील वर्णनावरून पासिफिक व आतलातिकसागर एथें किती जवळ आहेत हें सहजच लक्षांत येईल. **पनामा** शहरानजीक यां मधील अंतर पंधरा कोशांही नाहीं, ह्मणून गलबतें जाण्याजोग्या कालव्यानें हे दोन सागर जोडून अमेरिकेच्या पूर्व व पाश्चिम भा-गाचा परस्पर व्यवहार लवकर होई असा करावा, या हेतूनें आ-जपर्यंत पुष्कळ कल्पना काढल्या आहेत, परंतु त्यांतून एकही सि-द्धीस गेली नाहीं. अलीकडे तेथें लोखंडी सडक तयार केली आ-हे. नकाशावरून सहज ध्यानांत येईल कीं हा कालवा झाला असतां इंग्लंदास आस्त्रेलियाहून जाणें फार सुलभ पडेल.

हा बेटाचा समूह आतलातिक सागरामध्यें मेक्सिको, युकातन, आणि मध्यअमेरिका यांच्या समोर आहे. एक हेरिज करून बाकी सर्व बेटें युरोपियन लोकांच्या ताब्यांत आहेत.

१ **बाहामा** स्वतन्त्रसंस्थानातील फ्लारिदाजवळ हीं लहान लहान बेटें आहेत. तीं इंग्लिशाचे ताब्यात आहेत. याची राजधानी **नासा** ही न्यूप्राविदन्स बेटामध्यें आहे. यातील **सानसालवादोर** एथें कोलंबस प्रथम येऊन लागला.

२ **मोठी आंतिलास**— वेस्तइंदीस समूहामधील सर्वांत मोठें **क्यूबा, जमेका,** हेती अथवा **सेन्तदोमिंगो** आणि **पोर्तोरिको** इतकीं या नावाखालीं येतात. पहिलें स्पेनाच्या ताब्यात आहे. याची राजधानी **हवाना** आहे. या बेटात तंबाकू उत्तम होतो. याला हवाना तंबाकू असें ह्मणतात. जमेका हें वेस्तइंदिया मधील इंग्रेजाच्या ताब्यातील सर्वांत मोठें व उपयोगी ठिकाण आहे. शेतकी व व्यापार यामध्यें पुष्कळ चालतो साखर, रमदारू, कापूस आणि काफी हीं यातून पुष्कळ इतर देशात जातात. हेती याचा काहीं भाग स्वतन्त्र आहे, व काहीं एका सिद्दी बादशाहाच्या ताब्यात आहे. पोर्तोरिको स्पेनाच्या अमला खालीं आहे.

३ **लहान आंतिलीस**— पोर्तोरिकोपासून ईशान्येकडे **विनिझुवेला** पर्यंत हीं बेटें वर्तुळाच्या अंशाकृति आहेत. यांत उत्तरेकडे जीं आहेत त्यानां **लीवर्द** आणि दक्षिणेकडे आहेत त्यांना **विंदवर्द** बेटें असें ह्मणतात.

वेस्तइंदीस बेटांत उष्ण कटिबंधातील पदार्थ चांगले होतात. माडाचे जातीचीं झाडें, केळी, मसाल्याचे पदार्थ वगैरे फार चांग-

ले होतात. परंतु एथील हवा फार उष्ण व फार रोगी आहे.

## दक्षिण अमेरिका.

अमेरिकेचा दक्षिणभाग हें एक मोठें त्रिकोणाकृति द्वीपकल्प आहे. याच्या उत्तरेस क्यारेबियन समुद्र; पूर्वेस आतलांतिक महासागर; दक्षिणेस दक्षिण ध्रुवसागर; व पश्चिमेस पासिफिक सागर आहे. यामध्यें एक पर्वताची उंचरांग, मोठमोठालीं मैदानें, व नद्या आहेत. ती रांग पासिफिक सागरा जवळ सर्व किनाराभर आहे. या पर्वतास आंदीस अथवा कारदिलरा ह्मणतात. हा पर्वत फार उंच आहे. यातील एक शिखर सुमारें २४,००० फूट उंच आहे. यात अनेक जळत्या ज्वालामुखी आहेत.

बहुतेक खंड आन्दीस पर्वताच्या पूर्वेस आहे. याचे भाग तीन आहेत, आरिनोको नदी जवळील सपाट प्रदेश, आमेझान नदी जवळील सपाट प्रदेश, आणि लापलाता नदी जवळील सपाट प्रदेश. या नद्या फार मोठ्या आहेत. आमेझान अथवा मारेनान इची लांबी २,००० कोशा जवळ जवळ आहे; आणि ही मिसौरी व मिसिसिपी या एकत्र झालेल्या नद्या खेरीज करून सर्व पृथ्वींत लांब आहे. पराना व पाराग्वे या मिळून लापलाता होत्ये. ही हजार कोशाहून अधिक जाऊन बुयेनस एरिस याच्या पलीकडे समुद्रास मिळत्ये. हिच्या पात्राची रुंदी मुखाजवळ सुमार पंधरा कोश आहे. लापलातेच्या तीरच्या सपाट प्रदेशाला पांपस ह्मणतात.

दक्षिण अमेरिकेंत अनेक स्वतंत्र राज्यें आहेत. पूर्वी तीं बहुतेक स्पेन व पोर्तुगाल याच्या अमलात होतीं. सांप्रतचे एथील मुख्य रहिवासी, जे पूर्वी युरोपियन लोक एथें आले, त्यांची संतति आहे. परंतु उत्तर अमेरिकेप्रमाणें अनभागीं मुळचे रहिवासी हीं

पुष्कळ आहेत. या राज्यांची नांवें. न्यूग्रनेदा, इक्वादार व वानेझुला हीं कोलंबियातील तीन प्रजासत्ताक राज्यें, गायाना, ब्रेझील, पिरू, बोलिव्हिया, पारागुवे, उरुगुये, लाप्लाता, चिली, आणि पाटागोनिया अशी आहेत.

प्रथम सांगितलेल्या प्रजासत्ताक राज्यांपैकीं न्यूग्रनेदा हें चालले आहे. यांत आदीस पर्वताच्या तीन रांगा होऊन बहुतेक देशभर पसरल्या आहेत; त्यामुळे हा देश फार डोंगरी व खडकाळ झाला आहे. यात रस्ते फारच वाईट आहेत, आणि डोंगरांतील नद्या हम्मेशा शिखरांतून वसून उतराव्या लागतात. कारेबियन समुद्रावर कारथेजीना आणि देरियन संयोगिभूमीच्या दोन बाजूस पनामा व पोर्तोबेलो हीं मख्य बंदरें आहेत.

वेनिझुलामधून ओरिनोको नदी वाहत्य. हा देश बहुधा लनास नामक मोठ्या मैदानांनीं भरलेला आहे, घाड, खेचरें व गुरांचे कळप चे कळप यामध्यें होतात. काफी व नारळ हे जिन्नस यात पुष्कळ ...

इक्वेडार यांत क्विटो ही राजधानी आहे. आदीस पर्वताचे सर्वांत उच्च शिखर चिंबोराझो आणि कोतोपाक्सी या नावाची जळती ज्वालामुखी ही यात आहेत.

## गायाना.

गायाना हा दक्षिण अमेरिकेच्या ईशान्येस आहे. ब्रिटिश गायाना, डचगायाना व फ्रेंचगायाना असे याचे तीन भाग आहेत. याचा मध्यभाग डोंगरी असून फारसा माहित नाहीं परंतु किनारा सखल व यांतील हवा रोगी आहे. जमीन पिकाऊ आहे, साखर, काफी. लवंगा, आणि मिरीं हें यांतील मुख्य उत्पन्न आहे.

ब्रितिश गायानात जार्जतौन, दच गायानात पारामारिबो, व फ्रेंच गायानाच्या जवळ एका बेटावर केएनो हीं यांत मुख्य शहरें आहेत. यातील लागवड युरोपियन लोक आपल्या देखरेखी खालीं शिद्दी लोकांकडून कारवितात. ब्रितिश गायाना आणि इंग्रेजांच्या ताब्यातील वेस्त इंदिया बेटें यांमध्यें हे शिद्दी स्वेच्छे प्रमाणें वर्तूं शकतात, परंतु दुसऱ्या गायानांत, बहुतेक दक्षिण अमेरिकेंत, व स्वतंत्र संस्थानांच्या दक्षिणभागात हे गुलाम आहेत; ह्मणजे याचे मालक याजवर पाहिजे तसा अमल चालवितात, गरज लागल्यास विकतात, मारझोड करतात, व कधीं नांगराला ही लावतात. ह्या गुलामास आफ्रिकेंतून चोरून आणून इकडे विकतात, तें बंद होण्यासाठीं इंग्रेज व काहीं इतर सरकाराचा यत्न फार चालला आहे, परंतु याचा पक्का बंदोबस्त होत नाहीं.

## ब्रेझील.

ब्रेझील हें विस्तीर्ण राज्य दक्षिण अमेरिकेच्या पूर्वेस व मध्य भागीं आहे. आमेझान नदी याच्या उत्तरेकडून वाहत्ये; इच्या कांठचा देश सखल व सपाट आहे. याच्या मध्यभागीं व आग्नेयीस लहान लहान पर्वत आहेत. या देशांत फार मौल्यवान खनिज पदार्थ आहेत. हिरे, पुष्कराज व इतर रत्नें आणि सोनें फार सापडतें. आस्त्रेलिया व क्यालिफोर्निया यातील सोन्याच्या खाणी या आलीकडच्या, परंतु ब्रेझीलामधून सोनें, प्रथम त्याचा पोर्तुगाली लोकांस शोध लागल्यापासून अद्याप बाहेर जात आहे.

एथें झाडें विशाळ होतात. याच्या मध्यभागीं अटव्यरानें आहेत, त्यातील झाडें फारच उंच होतात; व त्याना फार व सुंदर रितीनें पालवी फुटत्ये. बहुतेक देश लागवडी वाचून आहे; परंतु

साखर, काफी, नारळ व इतर जिन्नस जेथें पिकवितात तेथें चांग-
ले होतात.

एथें राजा राज्य चालवितो; परंतु तो जुलूम व जबरदस्ती करील तर त्याजवर लोकांची देखरेख आहे. हा पोर्तुगाल राजवंशातील आहे, कारण शेंकडों वर्षेंपर्यंत हा देश पोर्तुगालच्या अमलाखालीं होता.

**रायोजनिरो** राजधानी आत्लांतिक सागराच्या किनाऱ्यावर आहे. एथें बंदर चांगलें आहे, व्यापार पुष्कळ होतो आणि दक्षिण अमेरिकेंत व्यापाराविषयीं याचें महत्व सर्वांत विशेष आहे. बाहिया अथवा **सेन्तसालवादोर** व **परनामबुको** हीं याशिवाय दोन मोठीं शहरें आहेत.

## पिरू.

पिरू देश दक्षिण अमेरिकेच्या पश्चिमेस पासिफिक महासागरावर आहे. यामधून आंदीस पर्वत जातो. यांत सोनें, रुपें, आणि पारा पुष्कळ सांपडतो. एथून हे जिन्नस युरोपांत जातात. मुख्य खाणी **पास्को** शहरा जवळ आहेत. **कायनाइन** व दुसऱ्या कांहीं औषधी यांत होतात. एथें पाऊस अगदीं पडत नाहीं, परंतु रात्रीं दंव पडल्यानें, आणि पाणी लावण्याकडे चांगलें लक्ष दिल्यानें खिडीमध्यें बरेंच उत्पन्न होतें.

स्पानियर्ड लोकांनीं जिंकण्याच्या पूर्वीं हा देश **इनकास** या नावाच्या तद्देशीय राजाच्या स्वाधीन होता. त्या राज्यांतील लोक आसपासच्या लोकां पेक्षा अधिक सुधारलेले होते. आंदीस पर्वताच्या पूर्वेकडील **कझ्को** शहर हीं त्यांची राजधानी होती. आता एथे सन१८२५इसवी पासून प्रजासत्ताक राज्य झालें आहे. सांप्रतची याची राजधानी **लिमा** आहे. हें सुंदर शहर पासिफिक

सागरापासून सुमारें बाराकोशावर आहे. कल्लाओ हें याचें बंदर आहे

## बोलिविया.

पिरूच्या आग्नेयीस बोलिविया आहे आंदीस पर्वत याच्या एका टोंकातून जातो. याचाच एक फाटा याच्या मध्यभागीं गेला आहे, त्याला बोलिवियन आंदीस असें ह्मणतात. दुसरें एक इलिमानी ह्मणून शिखर आहे, तें फारच उंच आहे हीं दोन्ही जेथें आंदीस याला मिळतात, तेथें जमीन उंच झाली आहे. व तींत तितिकाका ह्मणून एक मोठें सरोवर आहे. आंदीस पर्वत आणि समुद्र यांमधील सर्व प्रांत निरुत्पन्नाचा आहे.

पिरू प्रमाणेंच यांत खनिज पदार्थांचें उत्पन्न फार आहे. पोतोसी गांवाजवळ एक मोठी रुप्याची खाण आहे. तींत आतां जरी पूर्वी प्रमाणें उत्पन्न होत नाहीं, तरी सोळाव्या शतकापासून तींमधून मगाचेमग रुपें निघत आहे. एवढी मोठी खाण दुसरे कोठें ही नाहीं. या देशांत व्यापार फार नाहीं. यांतील जिन्नस दूर देशीं जाण्यासाठीं पिरूमधील आरिका या बंदरीं जातो

हें राज्य आतां प्रजासत्तक आहे. याला सन १८२४ सांत स्वतंत्रता मिळण्यास बोलिवर हा मनुष्य मुख्य कारण झाला. यावरून बोलिविया हें नाव याला मिळालें. चुकीसाका ही याची राजधानी आहे.

## पाराग्वे.

हा लहानसा देश पाराग्वे व पाराना या दोन नद्यांमध्यें आहे. यांतील राज्य प्राजासत्ताक आहे. एक प्रकारच्या चाहा विषयीं ह्या देशाची प्रख्याति आहे. रबराचें झाड या देशांत आपोआप हुन्नतें. याच्या राजधानीचें नाव आसंपशन आहे.

## उरूगुये.

उरूगुये अथवा बांदाओरियन्तल हें सनइसवी १८२८ सांत

स्वतन्त्र प्रजासत्ताक राज्य झालें. गुरें पाळणें हा एथें लोकांचा मु-
धंदा आहे यांत व्यापार पुष्कळ चालतो, त्यांत कातडी व चरबी यांचा फार होतो. रायोदी लाप्लाता नदीवर मोंतिविदियो ही याची राजधानी आहे

## लाप्लाता

लाप्लाता याला कधींकधीं **आरजेनतैन** प्रजासत्ताक राज्य व कधींकधीं **ब्यूयेनस एरिस** असें ह्मणतात चिली आणि या-च्यामध्यें आंदीस आहे. याचा पश्चिमभाग डोंगरी आहे, परंतु पूर्वेस मोठमोठालीं लांब गवतानें भरलेलीं मैदानें आहेत त्यांना **पांपास** असें ह्मणतात. रानटी गुराचे कळपाचे कळप, घोडे, आणि खेचर पुष्कळ आहेत. एथील लोक पळतापळता या जनावरांना फास घालून धरण्यामध्यें मोठे कुशळ आहेत.

या देशात व्यापार पुष्कळ चालतो तो मुख्यत्वें करून कातडीं, चर्बी, आणि मौल्यवान धातु याचा आहे. याची राजधानी **ब्यूयेनस एरिस** ही लाप्लाता नदीवर आहे.

## चिली

लाप्लाता देश सोडून पश्चिमेकडे **कारदिलरा** पर्वत उतरून गेलें असता चिली देश लागतो हा एक पासिफिक सागर व आंदीस यांमध्यें लांब व अरुंद जमीनीची पट्टी आहे दक्षिण अमेरिकेमध्यें जीं प्रजासत्ताक राज्यें आहेत त्यात हें श्रीमान् आहे

आंदीस पर्वत एथें जितका उंच आहे, तितका दुसरे कोठें नाहीं. एथील **अकांकागुवा** शिखर २४,००० फूटजवळ जवळ उंच आहे. हिमालयाखेरीज करून दुसरा कोणताही पर्वत इतका उंच नाहीं. यांत मोठया प्रज्वलित ज्वालामुखी आहेत. या मध्यें व दक्षिण अमेरिकेचे पश्चिमभागीं पुष्कळ धरणीकंप होतात.

आहे, परंतु जसजसें मध्यरेषेकडे जावें तसतशी वाईट लागूं लागते. गहू व इतरधान्यें पुष्कळ होतात, आणि आंदीस पर्वतांतून निघणाऱ्या पुष्कळ नद्या यांतून वाहतात, यामुळें हा देश इतका पिकाऊ झाला आहे कीं कधींकधीं याला दक्षिण अमेरिकेचें कोठार असें ही ह्मणतात. बटाटे मुळचे एथले, हे खाऊन युरोपांत व अमेरिकेंत पुष्कळ लोक राहतात. सोनें, रुपें, आणि तांबें या देशांत पुष्कळ सांपडतें चिलींत व्यापार आलीकडे पुष्कळ वाढला आहे.

याची राजधानी सांतियागो हें एक सुंदर शहर आहे. आणि वालपरेझो हें चांगलें बंदर आहे.

## पातागोनिया

पातागोनिया देश अगदीं ओसाड आहे या विषयीं माहिती बहुधा कांहीं नाहीं. याच्या उत्तरेकडून नीग्रो नदी वाहते. याच्या पश्चिम व दक्षिण किनाऱ्याभर लहानलहान आखातें व उपसागर आहेत. आंदीस पर्वत एथें समुद्रास लागला आहे. याच्या पश्चिम किनाऱ्याजवळ लहान मोठीं पुष्कळ बेटें आहेत आणि पूर्वेचा भाग लाप्लातांतील पांपसा प्रमाणें दिसतो एथील हवा फारच थंड आहे, आणि लोक सुदर, उंच व लढाऊ आहेत असें ह्मणतात

दक्षिण अमेरिकेच्या दक्षिणेस फार जवळच एक बेटाचा समूह आहे, त्याला तेरादेलफ्यूगो असें ह्मणतात याच्या मध्यें व दक्षिणअमेरिकेच्या मध्यें मागेलन ही अरुंद व वांकडी तिकडी सामुद्रधुनी आहे. याबेटांतील पर्वत सदोदित बर्फानें आच्छादित असतात, आणि हवा तर फारच थंड असते; परंतु असें आहे तथापि झाडें व फुलें चांगलीं होतात.

एथील लोक अगदींच रानटी आहेत. परंतु अशाही ठि·

आणि लोक सुधारण्याच्या परोपकार बुद्धीने स्वदेश सोडून पुष्कळ इंग्रेज लोक तेथें गेले आहेत.

तेरादेलफ्यूगो याच्या दक्षिण टोंकास हार्न भूशिर असें ह्मणतात.

मागेलन सामुद्रधूनीच्या पूर्वेस फाकलंद बेटें आहेत. तीं इंग्रेजांच्या ताब्यांत आहेत. त्यांतील मोठ्या बेटांत एक चांगलें बंदर आहे. हें दक्षिण अमेरिकेला वळसा घालून जाणाऱ्या गलबतास फार उपयोगी पडतें. अलीकडे या बेटात घोडे आणिले आहेत त्यांस रानात मोकळे सोडून दिले असता ते चांगले निपजतात. एथें सील मासे पुष्कळ मरतात

याच्या पुढें दक्षिणेस गेलें असतां जिकडे तिकडे बर्फ नजरेस पडतें. एथें बेटें पुष्कळ आहेत, परंतु त्यांजवर माणसाची वस्ती अगदीं नाहीं, आणि तीं ओसाड व भणभणीत दिसतात याच्याही दक्षिणेस सन१८४७ सालीं आंतार्तिक ह्मणून जमीन सांपडली आहे. इच्या पलीकडे अद्यापि जमीनीचा शोध लागला नाहीं. ही जमीन डोंगरी आहे असें ह्मणतात. तीमध्यें एक भव्य व चालू अशी ज्वालामुखी आहे, ती बारा हजार फूट उंच आहे. तिला एरिबस असें नाव दिलें आहे.

## आस्त्रेलेशिया.

आस्त्रेलेशिया यानावाखालीं, आस्त्रेलिया ह्मणून जें मोठें बेट आहे तें, वांदीमन्सलांद, न्यूझीलंद आणि दक्षिण ध्रुवसागरातील दुसरीं काहीं लहान बेटें इतकीं मोडतात.

आस्त्रेलिया हें सर्व पृथ्वीमध्यें मोठें बेट आहे. हें इतकें मोठें आहें कीं याला कधींकधीं पाचवेंखंड ही ह्मणतात. सतराव्या श

तकाच्या पूर्वी युरोपांतील लोकास हें बेट माहित नव्हतें. पुढें स्पानियर्द, पोर्तुगाल आणि डचलोक तेथें गेले; परतु कपतान कूक ह्मणून इंग्रेजी नावाडी होता, त्याणें याची मोजदाद वगैरे केली तोंपर्यंत याची फारशी माहिती नव्हती. आता एथें बहुधा इंग्रेज जाऊन राहिले आहेत.

या बेटाची अद्यापही पक्की माहिती नाहीं. किनाऱ्या जवळ इंग्रेजांनीं शहरें व गाव वसविले आहेत. अनभागीं रखरखीत वाळवंटें आहेत असा अदमास आहे. यात रानटी लोक राहतात, पर्वत या द्वीपाच्या किनाऱ्याजवळमात्र आहेत. यांतून जो उंच त्यांला आस्त्रेलियन आल्प्स अथवा वारेगाग असें ह्मणतात हा याच्या आग्नेयीस आहे. याच्या उत्तरेस निळे पर्वत आहेत. यां खेरीज दक्षिणेस व पश्चिमेस कांहीं डोंगर आहेत, परंतु ते सागण्या जोगे नाहींत. या खंडाचें विशेष लक्षण हें आहेकीं, यात पाण्याची [illegible] कमताई आहे. कांहीं थोडक्या नद्या आहेत खऱ्या, परतु त्या अगदीं लहान आहेत. यात आल्प्स पर्वतातून निघणारी मरे ही सर्वांत मोठी, परतु तिचीही लांबी विशेष नाहीं. तोरेन्स या नावानें जें सरोवर या बेटाच्या नकाशात लिहिलें असतें तें खारट पाण्यानें भरलेलें मोठें खाजण आहे.

एथील हवा आर्द्र नसून आरोग्य कारक आहे, परतु उन्हाळ्यामध्यें उष्णता फार होत्ये, आणि दिसेंबर महिन्याच्या सुमारास मध्यभागाकडून वारा वाहू लागतो, तो फारच गर्मी करतो. हा हवेचा प्रकार हिंदुस्थानाच्याहून अगदीं उलट होण्याचें कारण असें आहे कीं हें बेट विषुववृत्ताच्या दक्षिणेस असल्यानें या महिन्यात सूर्य उत्तर अक्षांशातील लोकास जितका दूर असतो त्यापेक्षा याला फार जवळ असतो. यात खनिज पदार्थ मौल्यवान व

पुष्कळच आहेत त्यांत सोनें हें आलीकडे फारच सांपडतें. यां-च्या मोठ्या खाणी बाथर्स्ट शहराजवळ आहेत. एथें फारच लटें व आपलपोटेपणा होतो. लोखंड, कोळसे, तांबें, आणि शिसें हीं पुष्कळ निघतात यातील रानांत झाडें चांगलीं होतात; परंतु उदर निर्वाहाच्या उपयोगी असें एथें मूळचें झाड एक ही नव्हतें. या टांत पुष्कळ चमत्कारिक जनावरें व पक्षी आहेत. कांगारु हें वि लक्षण जनावर एथें सांपडतें. यांतील हंसाचा रंग काळा असतो असा पृथ्वीमध्यें दुसरे कोठें ही नाहीं. जे लोक एथें येऊन वसा-हात करून राहिले आहेत, त्यांचा गुरें पाळणें हा मुख्य धंदा आ-हे. त्यापासून ते लोकर व चर्बी उत्पन्न करतात.

आस्त्रेलियाचे चार भाग आहेत, त्यांचीं नांवें न्यूसौथवे-ल्स, पूर्वविक्तोरिया, दक्षिणआस्त्रेलिया आणि पश्चिमआस्त्रेलि-या. सिदनी ही दक्षिण आस्त्रेलियाची राजधानी आहे. इंग्लिश लोक प्रथम एथें येऊन राहिले. सर्व पृथ्वीमध्यें जीं चांगली बंदरे आहेत त्यांतील हें एक आहे मेलबोर्न विक्तोरियाची राजधानी. आदिलेद शहर दक्षिण आस्त्रेलिया मध्यें आहे; आणि पश्चिम आ-स्त्रेलियाची राजधानी पर्थ हा एक भिकार गांव आहे.

* याच्या आणि वान्दीमन्सलांद याच्यामध्यें बास सामुद्रधुनी आहे. हें बेट डोंगरी व पिकाऊ आहे. यांत पाणी पुष्कळ आहे. याची राजधानी होबार्ट तौन आहे.

न्यूझीलंद यामध्यें दोन मोठीं व एक लहान अशीं तीन बेटे आहेत. याचा विस्तार सुमारें इंग्लंद आणि वेल्स याच्या एवढा आहे. यांतील हवा एक सारखी असते व सुख कारक ही आहे. यांत इंग्लिशाचीं पुष्कळ ठाणीं झालीं आहेत; त्यांत अकलंड हें मुख्य आहे. न्यूझीलंदर लोक शूर आणि लढाऊ आहेत. पूर्वी हे

इतके क्रूर व रानटी होते कीं माणसाचें मांस ही खात असत; परंतु आतां ते कांहींसे सुधारत चालले आहेत, आणि त्यांची संख्याही कमी होत चालली आहे.

## पोलिनीशीया.

पासिफिक सागरांतील जीं अनेक लहान लहान बेटें एके ठिकाणीं आहेत तीं या नावाखालीं मोडतात. सोसैती, फ्रेंदल सांदविच, मारकिझा, क्यारोलैन, आणि लाद्रोन हे या बेटांत मुख्य समूह आहेत. यांपैकीं सोसैती आणि सांदविच हीं प्रख्य आहेत. पहिल्यामध्यें ताहिती हें मुख्य बेट आहे. तें फ्रेंचांच ताब्यात आहे; आणि दुसऱ्यामध्यें होनोलुलू ही राजधानी आ या बदरीं पासिफिक सागरांत फिरणारीं ब्रिटिश तारवें पुष्कळ लागत

REFBK-0019717